**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**
**मा.स्थायी समिती सभेची नोटीस (ऑनलाईन)**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ०७/१/२०२२

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा क्रमांक १० मंगळवार दिनांक ११/०१/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता मा.अवर सचिव , महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि. ०३जानेवारी २०२२ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत.

तरी सदर सभेत आपण ऑनलाईन पध्दतीनेच सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-
नगरसचिव
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**मंगळवार दिनांक - ११/०१/२०२२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १४२ | अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदावंर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधनवाढ बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४३ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्याश्यवक सेवेकरिता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदावर अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूकीतील वैद्यकीय अधिकारी, जन संपर्क अधिकारी, लॅब टेक्निशीयन, दोन स्टाफ नर्स यांची सहा महिन्याकरीता पुर्ननियुक्ती करणेकामी मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४४ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर यांची वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४५ | अहमदनगर महनगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४६ | अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (बी.ई.मेकॅकिनल) यापदी जयेश वसंत कोके यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| १४७ | अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवा.अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १] शितल गंगाराम शिंदे ,२] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४८ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन , परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४९ | अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचाऑफिस रिपोर्ट |
| १५० | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५१ | अहमदनगर महानगरपालिका कै.बा. दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५२ | म.न.पा.विद्युत विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या मानधन वायरमन अ.नं.२) श्री. समाधान र. चव्हाण व अ.नं. ३) श्री. मुदस्सीर मुबारक शेख यांना अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५३ | अहमदनगर महानगरपालिका विदुयत विभागाकडील मानधन कनिष्ठ अभियंता श्री. शिवप्रकाशन भार्गवन व श्री. विजय शंकर तिवारी यांना तांत्रिक कालखंड पुढील सहा महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) म्हणुन ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणुकीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५५ | प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.१५ बिल क्र.जुना १५/६८१ नविन मालमत्ता क्र.झेड २१५०८६७४७ अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळेवर उर्दू शाळेच्या नांवे नजरचुकीने आकारण्यात आलेली घरपट्टीचीआकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५६ | अहमदनगर महानगरपालिकेच्या आनंदऋषीजी महाराज व्यापारी संकुल वॉर्ड क्र.१३ बील क्र.जुना १३/९९२ नवीन मालमत्ता क्र.Z२१३००००२२ भोगवटदार श्री.रामदास रावसाहेब बुलाखे गाळा नं.४ वर गाळा महानगरपालिकेने ताब्यात घेतल्याने ताब्यात घेतल्यापासून आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचाऑफिस |
| १५७ | अर्जदार श्री शेख पीरमंहंमद गुलाम हुसेन, रा. वसंतटेकडी,जवळ सावेडी,अ. नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ५८ , मालमत्ता क्र. Z१५८०६१९१७ व Z१५८०६१९१६ हे दोन्ही मालमत्ता एकाच मालकीची असुन मालमत्ता क्र.Z१५८०६१९१७ थकबाकी + शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून सदर बील कायम स्वरूपी रदद करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५८ | अर्जदार श्री. अशोक बन्सीलाल मुथ्था, रा.माणिक नगर,यांना प्र.स.क्र.४ वॉर्ड क्र.२१मालमत्ता क्र. Z४२११०५३०४ व Z४२११०५४२३ हे दोन्ही मालमत्ता एकाच मालकीची असुन मालमत्ता क्र.Z४२११०५४२३ थकबाकी +शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून सदर बील कायम स्वरूपी रदद करणे ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| १५९ | अर्जदार श्री. संभाजी चांगदेव कांबळे, रा. सारसनगर चिपाडे मळा, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ मालमत्ता क्र. Z४२८११०४६४ व Z४२८११०४२८ हे दोन्ही मालमत्ता एकाच मालकीची असुन ओपन प्लॉट वरील आकारणी मालमत्ता क्र. Z४२८११०४२८ वरील थकबाकी + शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून सदर बील कायम स्वरूपी रदद करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६० | अर्जदार श्री. बाळासाहेब माधव म्हस्के, रा. सारसनगर चिपाडे मळा,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ मालमत्ता क्र. Z४२८११०१८२ व Z४२८११०५९१ हे दोन्ही मालमत्ता एकाच मालकीची असुन ओपन प्लॉट वरील आकारणी मालमत्ता क्र. Z४२८११०५९१ वरील थकबाकी + शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून सदर बील कायम स्वरूपी रदद करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६१ | अर्जदार सौ. सुहसिनी सुरेश भापकर, रा. सारसनगर चिपाडे मळा,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२९ मालमत्ता क्र. Z४२९१११५१० व Z४२८११०१३३ हे दोन्ही मालमत्ता एकाच मालकीची असुन ओपन प्लॉट वरील आकारणी मालमत्ता क्र. Z४२८११०१३३ वरील थकबाकी + शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून सदर बील कायम स्वरूपी रदद करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६२ | अर्जदार श्री. आनंद रावसाहेब कदम, रा. सारसनगर चिपाडे मळा,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ मालमत्ता क्र. Z४२८११०४६१ व Z४२८११०२२८ हे दोन्ही मालमत्ता एकाच मालकीची असुन ओपन प्लॉट वरील आकारणी मालमत्ता क्र. Z४२८११०२२८ वरील थकबाकी + शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून सदर बील कायम स्वरूपी रदद करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६३ | अर्जदार श्री. कदरक गोविंद गंगाधर, रा. सारसनगर चिपाडे मळा,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ मालमत्ता क्र. Z४२८११०३४० व Z४२८११०६०९ हे दोन्ही मालमत्ता एकाच मालकीची असुन ओपन प्लॉट वरील आकारणी मालमत्ता क्र. Z४२८११०६०९ वरील थकबाकी + शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून सदर बील कायम स्वरूपी रदद करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६४ | अर्जदार श्री. दत्तात्रय कुशाबा औसरकर , रा. सारसनगर चिपाडे मळा,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ मालमत्ता क्र. Z४२८११०१७८ व Z४२८११०५८६ हे दोन्ही मालमत्ता एकाच मालकीची असुन ओपन प्लॉट वरील आकारणी मालमत्ता क्र. Z४२८११०५८६ वरील थकबाकी + शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून सदर बील कायम स्वरूपी रदद करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६५ | अर्जदार श्री. विनायक उर्फ गणेश विलास ठाकुर , रा. तोफखाना अ.नगर यांना प्रभाग समिती क्र. २ वॉर्ड क्र.२ जुना बील क्र. ७१२ नवीन दुबार नोंद बिल क्र.z२२०७९५२९ या घरपटटी रक्कम + शास्तीसह निर्लेखित मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६६ | अर्जदार रमेश छगनलाल गुंदेचा रा,गौरी घुमट, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र. ९ , बिल क्र. Z२९००००६२६ या नळ कनेक्शन बंद पाणी पटटी कमी करणे व त्यावरील रक्कम + शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६७ | अर्जदार श्री. दिनेश चोपडा , रा. महाजन गल्ली, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.२ बिल क्र. Z २२००००१६ या नावे मिळकत नोंद झालेली आहे. दुबार नोंद रदद करणे व त्यावरील थकबाकी रक्कम + शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६८ | अर्जदार भोग- श्री. मुकेश बाळा साहेब काळंगे , रा. सारसनगर, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१३ वॉर्ड क्र.९९३ या संत आनंदऋषीजी व्यापारी संकुल, अग्निशमन दलाशेजारी गाळा नं.५ यांना दिनांक २७/०१/२०१५ रोजी ताब्यात दिल्याने या पुर्वी असलेली गाळयावरील घरपटटी मालमत्ता कराची थकबाकी रक्कम + शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| १६९ | अर्जदार श्रीमती सुनंदा अनिल कांबळे, रा. हरिजन वस्ती, निलक्रांती चौक,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४३ बिल क्र ५४ व बिल क्र.४८/१ दुबार नळ जोडाची नोंद झाल्याने बिल क्र ४८/१ वरील सन २०२१-२०२२ अखेर रक्कम + शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १७० | अर्जदार अहमदनगर जिल्हा महिला विकास मंडळ, सचिव अहमदनगर यांनी प्रभाग समिती क्र. २ वॉर्ड क्र.८ जुना मालमत्ता बील क्र.८/१५५ मा.क्र.z२८०८१९५४ या मिळकतीचे घरपटटी कमी रक्कम + शास्तीसह निर्लेखित मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| १७१ | अहमदनगर महानगरपालिका वॉर्ड क्र. ३६ मध्ये मिळकतीच्या घरांच्या नोंदी मालमत्ता कर आकारणी साठी घेण्यात आल्या त्यात काही त्याच मिळकतीच्या नोंदी खुला भुखंड (मोकळी जागा) म्हणुन घेण्यात आल्या त्यामुळे एकच मालमत्तेची घरपटटी व प्लॉटपटटीच्या नोंदी दुबार झाल्या आहोत. एकाच मालमत्तेची दुबार झालेली नोंद कमी करून त्यावरील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १७२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक स.नं.४६/१ पैकी या जागेमधील जिर्ण व पडीक झालेली व्यायाम शाळा पाडणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १७३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या माणिक चौक येथील श्री.घनशाम सखाराम घोलप यांना अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या पे & पार्कच्या करारनाम्याची मुदत संपल्याने त्यांना मुदतवाढ बाढवून मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १७४ | अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता खरेदी करण्यात आलेल्या TATA LPT,1918, B.S.6. या चेसिजवर बांधणी करणेबाबत येणा-या खर्चाच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १७५ | ई- निविदा क्र.७२७२७९ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १७६ | ई-निविदा क्र.७२७२६७ अहमदनगर महानगरपालिका पा.लाईन रोड हद्दीतील औ.बाद रोड ते नामदेव चौक श्रीराम चौक ते मनमाड रोड पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.ऑफिस रिपोर्ट. |
| १७७ | ई- निविदा क्र.७२७२५० अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १७८ | ई- निविदा क्र.७२७२७३-१ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.२ व वॉर्ड क्र.४ मधील गुलमोहर पोलीस चौकी ते पाईप लाईन रोड श्रीराम चौक पर्यत रस्ता मजबुतीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १७९ | ई-निविदा सुचना क्र.१४६/७३१३३१ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हा परिषद शाळेपर्यत डी.पी. रोडच्या कडेने ४५० एमएम व्यासाची पाईप गटर करणे व मंदिर ते सिना नंदी दरम्यान ४५० व ९०० एमएम व्यासाची करणे या कामाच्या निविदा मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १८० | ई-निविदा क्र.७३२८१९-१ रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे सन २०२१-२०२२ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील पुणे रोड ते चंदन इस्टेट ते झिंजुर्डे घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| १८१ | अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे (सिध्दीबाग उदयान) चालविण्यास देणे व निवेदेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १८२ | अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या ६२ घंटागाडया व एक कॅाम्पॅक्टर मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडे भाडे तत्वावर देण्यात आलेल्या मनपा वाहनांची दर निश्चिती बाबत मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १८३ | अहमदनगर महानगरपालिका सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता सार्वजनिक बांधकाम व उदयान विभागासाठी आवश्यक असणा-या साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभे पुढे सादर करणेस मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १८४ | अहमदनगर महानगरपालिका बुरूडगांव स.नं. ३४ या मनपा कचरा डेपो मधील Bio-Methanation Plant (१० TPD = ५ TPD X २ no) प्रकल्प देखभाल व दुरूस्ती कामी प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १८५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्यावरील हॉल क्र.२ निविदा धारक श्री. विठ्ठल सुर्यभान लांडगे यांना भाडेतत्वार देणे बाबतच्या निविदे बाबत. |
| १८६ | जुन्या मालमत्ता (०१/०४/२००५ पुर्वीच्या) खरेदी - विक्री मधील नांव नोंदणी फी करीता चालु वर्षाचे रेडीरेटनर दरा नुसार १% आकारणी करणे व विलंब शुल्क रक्कम खरेदी दस्तऐवजाच्या तीन महिन्यानंतर रू.५० ऐवजी रू. १००/- दंडामध्ये वाढ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १८७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता करामध्ये शास्ती माफीच्या घेतलेल्या निर्णयाची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(ड) नुसार सादर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १८८ | अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग आत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्यास्वरूपात श्री.रमेश साहेबराव चौधरी,सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक यांची मानधनावर नियुक्ती करण्यास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

**टिप** :- १] प्रत्येक सदस्यांने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरून Zoom App डाउनलोड करून घ्यावे.

२] Zoom App द्वारे प्रत्येक सदस्यांना मा.स्थायी समिती सभेस उपस्थित राहता येईल.

३] मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन नगरविकासविभाग यांचेकडील दि. ३ जानेवारी २०२२ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन पध्दतीने आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

सही /-
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १४२ मंगळवार दि.११/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदावंर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधनवाढ बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. स्वप्निल प्रताप इंगावले व इतर यांचा दिनांक २२/०२/२०२१ रोजीचा अर्ज

२. मा. प्र.वैद्यकीय अधिक्षक, कै.बा.दे. दवा. यांचेकडील जा.क्र.७९ दि.१९/०३/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वप्निल प्रताप इंगावले व इतर यांनी दि.२२/०२/२०२१ रोजी विनंती अर्ज देवून त्यामध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखानाकरिता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी ए.एन.एम. पदासाठी रू.१०,४००/- व जी.एन.एम. पदासाठी रू.१३,०००/- दरमहा मानधनावर नियुक्ती असून मानधनामध्ये वाढ करून राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी परिचारीका यांचेप्रमाणे जी.एन.एम. पदासाठी रू.२०,०००/- व ए.एन.एम. पदासाठी रू.१८,०००/- याप्रमाणे दरमहा मानधन करणेबाबत नमूद करून मागणी केलेली होती.

सदर मागणी अर्जाच्या अनुषंगाने इकडील जा.क्र. आस्था. ८०५ दि.०९/०३/२०२१ अन्वये मा.प्र.वैद्यकीय अधिक्षक, कै.बा.दे.दवा. यांना पत्र देवुन मानधन वाढ विषयी संदर्भात स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करणे बाबत सुचित केलेले होते.

त्यानुषंगाने मा.प्र. वैद्यकीय अधिक्षक,कै.बाळासाहेब दे. दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र.७९२ दि. १९/०३/२०२१ अन्वयेच्या अहवालपत्रामध्ये सध्या कार्यरत असलेल्या करारावरील परिचारीका यांना तीन वर्षापासून त्यांना मानधन वाढ देण्यात आलेली नाही. जा.क्र. राआसोमुं/ मनुष्यबळ कक्ष / वेतन सुसुत्रीकरण /५०३३३-५४१३०दि.५/१०/२०२० नुसार सध्या आरोग्य विभागामधील एन.यु.एच.एम. विभागामार्फत नियुक्ती करण्यात आलेल्या ए.एन.एम. पात्रता असलेल्या परिचारिकांना रू.१८,०००/- व जी.एन.एम. पात्रता असलेल्या परिचारिकांना रू.२०,०००/-दरमहा मानधन देण्यात येत आहे.सध्याची महागाई व वरील परिचारिकांना दवाखान्यातील कामाचा अनुभव पाहता तसेच आरोग्य विभागामधील एन.यु.एच.एम. विभागामार्फत नियुक्ती करण्यात आलेल्या ए.एन.एम. पात्रता असलेल्या परिचारीकांना रू.१८,०००/-व जी.एन.एम.पात्रता असलेल्या परिचारीकांना रू.२०,०००/-दरमह मानधन मिळत आहे. वरील अर्जदार परिचारीका हया २४तास शिफ्ट डयुटी करत असून, प्रसुती सेवा व ऑपरेशन बाबतीत प्रशिक्षीत आहे. हया सर्वाचे काम उत्तम असून त्यांच्या नियमीत सेवेबाबत कोणतीही तक्रार नाही. या सर्व बार्बीचा विचार करून अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे ए.एन.एम पात्र परिचारीकांना रू.१८,०००/-व जी.एन.एम.पात्र परिचारीकांना रू.२०,०००/-मानधन वाढ करणेस शिफारस आहे.तसेच सदरची मानधनवाढ पुढील ३ वर्षे कालावधीकरिता लागु करावी याबाबत मा.स्थायी समिती पुढे विषय मंजुरीस सादर करणेस शिफारस आहे.असे नमुद करून सुचित केलेले आहे.

कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील वेळोवेळी सादर प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन वेळोवेळी सहा-सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर संबंधीतांची ए.एन.एम. ही शैक्षणीक पात्रताधारक यांना रू.१०,४००/- व जी.एन.एम. ही शैक्षणिक पात्रताधारक यांना रू.१३,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्यांबाबत कार्यवाही करण्यात येत आहेत.

वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील मा.प्र.वैद्यकीय अधिक्षक, कै.बा.दे.दवा. त्यांचेकडील जा.क्र.७९२ दिनांक १९/३/२०२१ अन्वयेच्या अहवालामध्ये नमुद केल्यानुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदावंर एन.एन.एम. ही शैक्षणिक पात्रताधारक यांना रू.१८,०००/- व जी.एन.एम. ही शैक्षणिक पात्रताधारक यांना रू.२०,०००/- या दरमहा मानधनावर नियुक्ती करीता मानधनामध्ये वाढ करून पुर्ननियुक्त्या बाबत कार्यवाही करणे बाबत सुचित केलेले आहे.

तथापी मनपाची आर्थिक बिकट परिस्थिती पहाता सद्यस्थितीमध्ये त्यांना देण्यात येणा-या मानधनामध्ये वाढ करणेस झाल्यास सदरचा देण्यात येणा-या दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करणे झाल्यास सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची याबाबत पुर्व मान्यता घेणे संयुक्तीक होईल.

त्यानुषंगाने दरमहा मानधनवाढी बाबतचा तपशील खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभाग | शैक्षणिक पात्रता | सध्याचे देण्यात दरमहा मानधन रूपये | १०% प्रमाणे प्रस्तावीत मानधन वाढ दरमहा मानधन रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | ए.एन.एम. | १०,४००/- | ११,४४०/- |
| | | | जी.एन.एम. | १३,०००/- | १४,३००/- |

तरी उपरोक्त वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील मा.प्र.वैद्यकीय अधिक्षक, कै.बा.दे.दवा. त्यांचेकडील जा.क्र. ७९२ दिनांक १९/०३/२०२१ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवरील नियुक्तीकरीता वरील दर्शविल्यानुसार १०% प्रमाणे मानधनामध्ये वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे बाबत प्रस्तुत प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर सहा.आयुक्त यांची अभिप्राय की, मुलेप यांचा अभिप्राय घेवून सादर करावे.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांची अभिप्राय की, मा. शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/ प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/८/२००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या स्वरूपात /अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे. प्रस्तावीत परिचारिका पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून "अ" नुसार कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मुलेप यांच्या अहवालानुसार व मा. स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, राष्ट्रीय आरोग्य अभियान नुसार एकुण किती खर्च येईल (मासिक व वार्षिक अंदाजपत्रक)तसेच १०% वाढ करून मासिक व वार्षिक किती खर्च येईल तुलनात्मक सादर करावे.

यावर वैद्यकीय अधिक्षक यांची अभिप्राय की,कै.बा.देशपांडे दवाखाना व सुतिकगृह उपरोक्त अभिप्रायाबाबत मानधन वाढ मासिक व वार्षिक खर्चाचे तक्ते निहाय सादर करावे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, आस्थापना विभाग

यावर आस्थापना प्रमुख यांची अभिप्राय की, उपरोक्त प्रकरणांवरील मा.आयुक्त यांचे दि.१३/७/२०२१ रोजीच्या शेरांकनानुसार मा.प्र.वैद्यकीय अधिक्षक, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै. बा.दे. दवाखाना व सुतिका गृह ४७३ दिनांक ०७/१०/२०२१ अन्वये आस्थापना विभागाकडील तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मानधनावरील नियुक्त तसेच एन.यु.एच.एम. विभागाकडील कंत्राटी परिचारीका मानधनावरील नियुक्त यांचे मानधनाबाबत दरमहा व वार्षिक निहाय तुलनात्मक तक्ता सोबत जोडून सादर केलेला आहे. तरी उपरोक्त वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील मा.प्र.वैद्यकीय अधिक्षक, कै.बा.दे.दवा. त्यांचेकडील जा.क्र.७९२ दिनांक १९/०३/२०२१ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता करारानुसार अटी व शर्ती नुसार प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवरील नियुक्तीकरीता दर्शविल्यानुसार १०% प्रमाणे मानधनामध्ये वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे बाबत मान्यतेस्तव आदेशार्थ सादर./अ

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार पुढील कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांची अभिप्राय की, चर्चा करा, चर्चा केली "अ" नुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदावंर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधनवाढ बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्टचे वाचन करा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर या विषयाची सविस्तर माहिती सांगा.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- सध्या या परिचारीकांचे मानधन किती आहे.मानधनामध्ये वाढ झाल्यानंतर किती मानधन मिळणार आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :- यांचे पगरा आपण महानगरपालिका फंडातून आस्थापना मार्फत काढतो.नियुक्ती सुध्दा आस्थापना विभागामार्फत आहे.एम.एन.सिस्टरला रू.१०,४००/- आणि जी.एन.एम.सिस्टरला १३,०००/- मानधन आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- रक्तपेढी मधील सिस्टर यांना किती पगार आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :- एन.एच.एम.मधील परिचारीकांना ए.एन.एम.मधील परिचारीकांना १८,०००/- व जी.एन.एम.परीचारीकांना २०,०००/-पगार आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- त्यांच्या प्रमाणे वाढ दिली पाहिजे.बी.डी.सी.डी. मध्ये सेवा करत आहेत.आपल्याकडे स्टाफ कमी आहे.त्यांच्या कामाबाबत कोणतीही तक्रार नाही.ज्यांची आपण आत्ताच नियुक्ती केली त्यांना आठरा ते वीस हजार पगार आहे.या परिचारीका पाच सहा वर्षा पासून आहेत त्यांना त्यांच्या प्रमाणात पगार देणे योग्य राहील.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :- तफावत असल्याने आपण प्रस्तावीत केली आहे.

मा.सभापती साहेब :- सध्या कोरोनाची तीसरी लाटा आहे.आपल्याला स्टाफ आवश्यक आहे.मानधनामध्ये किती वाढ करावी लागेल.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- प्रशासनाने किती वाढ करणे बाबत प्रस्तावित केले आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :- सध्याच्या मानधनामध्ये दहा टक्के वाढ सुचित केली आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- गेल्या सहा-सात वर्षापासून काम करीत असल्याने त्यांच्या पगारात कोणतीही पगार वाढ झाली नसल्याने ४५ टक्के वाढ करणे योग्य राहील.

मा.श्री.सचिन शिंदे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना हा अत्यावश्यक सेवेतील असून या ठिकाणी गोरगरीब रूग्ण येतात.आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने परिचारीकांच्या सध्याच्या मानधनामध्ये ४५ टक्के वाढ करण्यात यावी.

मा.श्री.शाम नळकांडे :- मानधनामध्ये ४५ टक्के वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवरील नियुक्तीकरीता वरील दर्शविल्यानुसार १०% प्रमाणे मानधनामध्ये वाढ नगण्य असल्याने परिचारीकांच्या कामाचे स्वरूप व अनुभव पहाता त्यांच्या मानधनामध्ये ४५% वाढ करण्यात येत आहे.

**ठराव :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवरील नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.तसेच त्यांच्या सध्याच्या मानधनामध्ये रक्कम रूपये ४५% ने वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १४३ मंगळवार दि.११/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्याश्यवक सेवेकरिता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदावर अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूकीतील वैद्यकीय अधिकारी, जन संपर्क अधिकारी, लॅब टेक्निशीयन, दोन स्टाफ नर्स यांची सहा महिन्याकरीता पुर्ननियुक्ती करणेकामी मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका रक्त पेढी विभाग

संदर्भ- १. मा.आयुक्त यांच्या दिनांक ०३/०५/२०२१ मंजूर प्रस्तावानुसार

२. रक्तपेढी विभाग जा.क्र.१०० दिनांक ०४/०५/२०२१ रोजीचे कार्यालयीन आदेश

३. रक्तपेढी विभाग जा.क्र.१०७ दिनांक १८/०५/२०२१ रोजीचे कार्यालयीन आदेश

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेमधील रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या तात्पुरत्या स्वरूपात पदावर दिनांक ०४/०५/२०२१ व दिनांक १९/०५/२०२१ पासून सहा महिन्याकरीता खालील अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द करण्यात आले आहे. त्यानुसार रक्तपेढी जा.क्र.१०० दि.०४/०५/२०२१ व जा.क्र.१०७ दि.१८/०५/२०२१ अन्वये खालीलप्रमाणे कर्मचारी यांना मानधनावर नियुक्त करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | रूजू करण्यात आलेले दिनांक | कामाची अंतिम कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.डॉ.सोमनाथ जयराम नंदकर | वैद्यकीय अधिकारी | १९/०५/२०२१ | १७/११/२०२१ |
| २ | सौ. सुनिता संपत पवार | लॅब टेक्नीशियन | ०४/०५/२०२१ | ०३/११/२०२१ |
| ३ | सौ. स्नेहल अशोक गायकवाड | स्टाफ नर्स | ०४/०५/२०२१ | ०३/११/२०२१ |
| ४ | सौ. योगिता सुहास गायकवाड | स्टाफ नर्स | ०४/०५/२०२१ | ०३/११/२०२१ |
| ५ | श्री. संतोष भाउसाहेब काळे | जन संपर्क अधिकारी | ०४/०५/२०२१ | ०३/११/२०२१ |

वरीलप्रमाणे कर्मचारी यांची कामाची मुदत दिनांक १७/११/२०२१ व ०३/११/२०२१ अखेर संपुष्टात येणार आहे. त्याकरीता रक्तपेढीतील अत्यावश्यक कामासाठी तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन वरीलप्रमाणे अनुक्रमे ०१ ला दि.२१/११/२०२१ पासून व अनुक्रमे २ ते ५ कर्मचारी यांना दिनांक ०६/११/२०२१ पासून पुढील सहा महिनेकरीता पुर्नर नियुक्ती आदेश पारित करणेकामी मंजुरीस्तव व सदरील बाब मा. स्थायी समितीकडे मंजुरीकरीता पाठविणेकामी प्रस्तावीतनुसार मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे रक्त संक्रमण अधिकारी यांचा अहवलाअ असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्याश्यवक सेवेकरिता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदावर अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूकीतील वैद्यकीय अधिकारी, जन संपर्क अधिकारी, लॅब टेक्निशीयन, दोन स्टाफ नर्स यांची सहा महिन्याकरीता पुर्ननियुक्ती करणेकामी मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्याश्यवक सेवेकरिता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द वैद्यकीय अधिकारी, जन संपर्क अधिकारी, लॅब टेक्निशीयन, दोन स्टाफ नर्स यांची तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १४४ मंगळवार दि.११/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर यांची वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा.क्र. २८२ दि.२०/०९/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील संदर्भिय प्रस्ताव सादर करून त्यामध्ये इलेक्ट्रीक विभागाकडील करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी दर्शविलेल्या संबंधितांची मानधनावर नियुक्ती केलेली असून त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे नमुद केलेली आहे.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रू. | जा.क्र.आस्था करारबध्द नेमणूक व दिनांक | नियुक्ती कालावधी | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.२१३६ दि.०६/०७/२०२१ | ३०/०५/२०२० ते २९/११/२०२१ | दि.३०/११/२०२१ पासुन |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.२१३६ दि.०६/०७/२०२१ | ३०/०५/२०२० ते २९/११/२०२१ | दि.३०/११/२०२१ पासुन |
| ३ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.२१३६ दि.०६/०७/२०२१ | ३०/०५/२०२० ते २९/११/२०२१ | दि.३०/११/२०२१ पासुन |
| ४ | डहाळे सौरभ भाउसाहेब | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.२१३६ दि.०६/०७/२०२१ | ३०/०५/२०२० ते २९/११/२०२१ | दि.३०/११/२०२१ पासुन |
| ५ | अंकित किशोर कासवा | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.२१३६ दि.०६/०७/२०२१ | ३०/०५/२०२० ते २९/११/२०२१ | दि.३०/११/२०२१ पासुन |
| ६ | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.२१३६ दि.०६/०७/२०२१ | ३०/०५/२०२० ते २९/११/२०२१ | दि.३०/११/२०२१ पासुन |
| ७ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.२१३६ दि.०६/०७/२०२१ | ३०/०५/२०२० ते २९/११/२०२१ | दि.३०/११/२०२१ पासुन |
| ८ | खान शादाब रफिक | वायरमन | १४,२५०/ | जा.क्र.२१३५ दि.०६/०७/२०२१ | २०/०५/२०२१ ते १९/११/२०२१ | दि.२०/११/२०२१ पासुन |

वरील दर्शविल्याप्रमाणे एकुण ८ वायरमन यांची मुदत वरील संदर्भिय आदेशानुसार संपत असल्याने त्यांना ३ दिवसांचा तांत्रिक खंड देवून ६महिन्याकरीता मुदतवाढीस मंजुरी मिळणेस" नमुद करून सुचित केलेले आहे.सदयस्थितीमध्ये मा.स्थायीसमिती ठराव क्र.२८ दि.०३/६/२०२१ अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक २१३६ दि.०६/७/२०२१ अन्वये सुभाष बापुराव सुळ व इतर यांची मानधनावर तांत्रिक खंड देवून दि.३०/५/२०२१पासून सहामहिन्याकरीता व जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक २१३५ दि.०६/७/२०२१अन्वये खान शादाब रफीक यांची मानधनावर तांत्रिक खंड देवून दि.२०/५/२०२०पासून सहा महिन्याकरीता व अटी व शर्तीनुसार दरमहा रू.१४,२५०/-या मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असून सदर नियुक्तीची मुदत ही अनुक्रमे दि.३०/११/२०२१ व २०/११/२०२१ रोजी पासून समाप्त होणार आहे

तरी इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार वरील तक्त्यामधील श्री.सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तात्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजूरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करिता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन सामान्य प्रशासन विभाग ,शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ /प्र.क्र.४७ /०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद क्र.५ मध्ये सर्व पदावरील नियुक्या विहीत मार्गाने /माध्यमा मार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यावर तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.असे नमुद केले आहे. प्रस्तावीत वायरमन यापदी पुढील मुदत वाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करावी.

यावर मा. उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" मधील आस्थापना विभागाचा अभिप्राय व "ब" नुसार मुलेप यांचा अभिप्राय अवलोकन होवून निर्णय घेण्यास मा.स्थायी समिती समोर सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्रायकी, विदयुत विभागाकडून पथदिव्यांबाबत निविदा प्रक्रिया करून बाहय यंत्रणे मार्फत LED पथदिव्यांबाबत देखभाल दुरूस्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे वायरमन मानधनावर नियुक्तीबाबत विदयुत विभागाचा अभिप्राय घेतल्यानंतरच सदरचा विषय मा.स्थायी समितीकडे पाठविणे उचित होईल. तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, विदयुत विभाग अभिप्राय सादर करावी.

यावर विदयुत विभाग प्रमुख यांची अभिप्राय की, ई-स्मार्ट एनर्जी सोल्युशन लिमिटेड या एजन्सीस पथदिवे देखभाल दुरूस्तीचे कामासाठी या कार्यालयाद्वारे पत्र क्र.२९५ दि.५/१०/२०२१ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असून सदर एजन्सीने पुर्ण क्षमतेने कामकाज सुरू केलेले नाही. सदर कामासठी या एजन्सीला चार महिन्याच्या कालावधी देण्यात आलेला आहे. त्या दरम्यान सदरचे काम मनपाचे मानधन वायरमन कर्मचारी यांचे मार्फतच देखभाल दुरूस्तीचे कामे केली जाणार आहे. तसेच मा.स्थायी समिती सभा क्र.०६ ठराव क्र. ८२ दि.०३/०९/२०२१ मधील चर्चेनुसार विदयुत विभागाकडील उर्वरित कामे जसे लाईन मेंटेनस मनपा प्रॉपर्टी अमरधाम गार्ड व इत्यादीचे विदयुत देखभाल दुरूस्तीचे कामाकरीता मानधन वायरमन कर्मचारी यांची आवश्यकता असते तरी मानधन वायरमन यांना तांत्रिक खंड देवुन पुढील मुदतवाढ देणे योग्य वाटते. उपरोक्तनुसार आदेशार्थ सविनय सादर.

यावर आस्थापना प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावावरील मा.आयुक्त यांचे दि.०८/१०/२०२१ रोजीच्या शेरांकनानुसार की, विदयुत विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.३२३ दि.०३/११/२०२१ अन्वये अभिप्राय देवून त्यामध्ये संबंधीत मानधनावरील वायरमन यांची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देणेबाबत सुचित केलेले आहे. तरी प्रस्तु प्रकरणांवरील विदयुत विभागाच्या नमुद अभिप्रायाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार नमुद तक्त्यामधील श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केल्याप्रमाणे व इलेक्ट्रीक विभाग यांच्या फेरसादर अभिप्रायानुसार मा.स्थायी समितीसमोर पाठविणेस मंजुरीस्तव सादर.

यावरम मा.अति. आयुक्त यांची अभिप्राय की, मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका श्री.सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तात्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १४५ मंगळवार दि.११/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महनगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.४८९ दि.१४/१०/२०२१ चा प्रस्ताव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र.बा.दे.दवा.४८९ दि.१४/१०/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.२८/०५/२०२१ ते २७/११/२०२१ अखेर असून सदरची मुदत हि दिनांक २८/११/२०२१ रोजी पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवून दि.०१/१२/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत" सुचित केलेले आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.५२ दिनांक २६/०७/२०२१ अन्वयेच्या पारीत मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये जा.क्र.आस्था कालबध्द नेमणुक २८१४ दि.३०/०८/२०२१ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची रू.१०,४००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.२८/०५/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरची मुदत ही दिनांक २८/११/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार कलम ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची दरमहा रू.१०,४००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०१/१२/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, मान्यतेसतव सादर.

यावर मा.उपायुक्त सा यांचा अभिप्राय की, मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर प्र.लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.प्रस्तावित परिचारिका यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" मुलेअ व प्र. लेखापरिक्षक यांचे अभिप्रायाचे अवलोकन होवून पुढील कार्यवाहीसाठी मा.स्थायी समितीसमोर पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १४६ मंगळवार दि.११/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (बी.ई.मेकॅकिनल) यापदी जयेश वसंत कोके यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- सहा. नगररचनाकार तथा विदयुत विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.विदयुत ३१५ दि.२९/१०/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सहा. नगररचनाकार तथा विदयुत विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. विदयुत विभाग ३१५दि.२९/१०/२०२१अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये श्री. जयेश वसंत कोके , विदयुत विभागामध्ये कनिष्ठ अभियंता (BEमेकॅनिकल)या पदावर कार्यरत असून त्यांची दि.०८/१२/२०२१ रोजी ऑर्डर संपुष्टात येणार आहे. नमूद कंत्राटी पध्दतीने नियुक्त अभियंता यांनी त्यांना नेमून दिलेले काम समाधानकारक केलेले असून अहमदनगर महानगरपालिकेच्या विदयुत विभागामार्फत विविध कामे चालू असून या अनुषंगाने अभियंत्यांची आवश्यकता असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील ६ महिन्याची मुदतवाढ देणे बाबतची पुढील कार्यवाही आस्थापना विभागामार्फत करणे उचित होईल. तसेच श्री. कोके यांनी संदर्भिय अर्जानुसार वेतनवाढ मिळणेबाबत विंनती अर्ज केलेला असून जयेश कोके यांची नियुक्ती Diplomaवर असून सद्यस्थितीत त्यांना रू.२०,०००/-इतके मानधन देण्यात येत आहे, त्यांचे BE मेकॅनिकल इंजिनिअरींगचे शिक्षण पुर्ण झाले असून सदरचे प्रमाणपत्र त्यांनी अहमदनगर महानगरपालिकेत सादर केलेले असून सद्यस्थिती त्यांची BE इंजिनिअर या पदावर नियुक्ती झालेली असून त्यांना त्याप्रमाणे वेतन मिळणेस व ३ दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील ६ महिन्याची मुदतवाढ देणेबाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

यापुर्वी मोटर व्हेईकल विभाग यांचेकडील मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने मोटर व्हेईकल विभागाकरीता ॲटोमोबाईल इंजि. अभियंत्याची आवश्यकता असल्याने दि.३१/०७/२०१४ रोजीच्या दैनिक सार्वमत व पुढारी या वर्तमान पत्रामध्ये सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखतीसाठी जाहिरात प्रसिध्दीस देण्यात आलेली होती. त्यानुसार कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदासाठी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती होवून श्री. जयेश वसंत कोके यांची डिप्लोमा इन ॲटोमोबाईल इंजिनियर ही शैक्षणिक अर्हता असल्याने त्यांची निवड होवून त्यांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ३६२७ दिनांक १३/०८/२०१४ अन्वये सहा महिन्याकरिता करारबध्द पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानंतर मोटर व्हेईकल विभागाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री. जयेश वसंत कोके यांची वेळोवेळी तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननेमणूक देण्यात आलेली होती. सदरची भरती प्रक्रिया ही मोटर व्हेईकल विभागाकरीताच राबविण्यात आलेली होती.

यापुर्वी मोटर व्हेईकल विभागासाठी करारानुसार कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदी श्री. कोके व पवार यांची सहा महिन्याकरिता मानधनावरर नियुक्तीबाबत निर्णयासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे जा.क्र.आस्था. १०११ दि.०४/०१/२०२१ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

त्यानुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.८० दि.०९/०२/२०२१ अन्वये खालील नमूद केल्यानुसार ठराव पारित केलेला होता.

अहमदनगर महानगरपालिका मोटर व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदी श्री. स्वप्निल पवार हे कर्मचारी सद्यस्थितीत मो.व्हे.

विभागाकडे कार्यरत आहेत. त्यांना तांत्रिक खंड देवुन (कोव्हीड-१९ मुळे) दि.३०/०३/२०२० पासून कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांना दि.३०/०३/२०२० पासून तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस व श्री. जयेश कोके (बी.ई. मेकॅनिकल) यांची नियुक्ती घनकचरा विभागाकडे अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सदर मा.स्थायी समिती सभा क्र.०६ ठराव क्र.८० दि.०९/०२/२०२१ च्या पारित ठरावामध्ये नमुद केल्यानुसार श्री. जयेश वसंत कोके यांची घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (बी.ई. मेकॅनिकल) यापदी जा.क्र.आस्था./करारबध्द नेमणूक १६९१ दिनांक ०९/०६/२०२१ चे आदेशानुसार दिनांक ०९/०६/२०२१ पासून सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे व सदर केलेल्या कालावधीतील नियुक्तीची मुदतही दिनांक ०८/१२/२०२१ पासून समाप्त होणार आहे.

तथापी दरम्यानच्या काळात घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.५२०द दिनांक ११/१०/२०२१ चे कार्यालयीन आदेशानुसार श्री.कोके जयेश वसंत , कनिष्ठ अभियंता (बी.ई. मेकॅनिकल , मानधनावर करारबध्द) यांची घनकचरा व्यवस्थापन विभाग व प्रकल्प विभाग येथून विदयुत विभागामध्ये बदली करण्यात आलेली आहे त्यानुसार श्री. कोके हे सदर आदेशानुसार विदयुत विभागामध्ये काम पहात असलेबाबत सुचित होत आहे.

तरी विदयुत विभागाचे जा.क्र.३१५ दि.२९/१०/२०२१ अन्वयेच्या प्रस्तावामध्ये श्री. जयेश वसंत कोके यांची आवश्यकता असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार विदयुत विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (बी.ई. मेकॅनिकल) यापदी जयेश वसंत कोके यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.१२/१२/२०२१ पासून सहा महिन्याकरिता दरमहा रूपये २०,०००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करिता मा. मुख्य लेखधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/ प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/८/२००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या स्वरूपात /अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे. प्रस्तावीत कनिष्ठ अभियंता यापदी तांत्रिक खंड देउन पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करावी./ब

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" व "ब" मधील अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा. आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार श्री.कोके यांनी मानधन वाढी ची मागणी केली आहे.त्यांना सध्या देण्यात येणा-या मानधनामध्ये २५ टक्यांनी वाढ करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता यापदी जयेश वसंत कोके यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस व त्यांना देण्यात येणा-या सध्याच्या मानधनामध्ये २५% वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १४७ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवा.अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १] शितल गंगाराम शिंदे ,२] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर कारारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.५७३ दि.२३/११/२०२१ चा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना ५७३ दि. २३/११/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] शितल गंगाराम शिंदे, २] तृप्ती रावसाहेब बडे यांचा अटी व शर्ती नुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.२४/०१/२०२१ पासुन सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदतही दि.२३/०७/२०२१ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि.२७/०७/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.६८ दि.०३/०९/२०२१ च्या पुर्व मान्यता परित ठरावाच्या अनुषंगाने अनुक्रमे जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ३३१६ दि.१८/१०/२०२१ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] शितल गंगाराम शिंदे, २] तृप्ती रावसाहेब बडे यांची रू.१३०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.२४/०१/२०२१ पासून सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि.२४/०७/२०२१ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरतया स्वरूपात पारिचारीका यापदी १] शितल गंगाराम शिंदे, २] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/०७/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १३०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, मुलेअ व अंलेप यांचे अभिप्रायासह सादर करा.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची अभिप्राय की, प्रस्तावीत मान्यतेस्तव

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस. आर.व्ही. -२००५ /प्र.क्र. ४७/०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद क्र.५"सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अंत्यत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी"

असे नमुद केलेले आहे. प्रस्तावीत परिचारिका पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन कडून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार आदेशार्थ सादर

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरतया स्वरूपात पारिचारीका यापदी १] शितल गंगाराम शिंदे, २] तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १४८ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन , परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. रक्तपेढी विभाग यांचेकडील जा.क्र.२१ दि.१५/०६/२०२० अन्वेचा प्रस्ताव

२. रक्तपेढी विभाग यांचेकडील जा.क्र. ५१ दि.०५/१०/२०२० अन्वेचा अभिप्राय अहवाल,

३. वैद्यकीय अधिकारी, रक्तपेढी विभाग यांचा दि.१५/१२/२०२० रोजीचा अभिप्राय

४. रक्तसंक्रमण अधिकारी जा.क्र. रक्तपेढी १८० दि.१८/११/२०२१ रोजीचा अभिप्राय

उपरोक्त प्रस्तावावरील मा.आयुक्त यांचे दिनांक ०६/०८/२०२१ रोजीच्या शेरांकनानुसार रक्त संक्रमण अधिकारी रक्तपेढी विभाग यांनी जा.क्र.१८० दि.१८/११/२०२१ रोजी प्रस्तु प्रकरणांवर पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. सदरील कर्मचारी यांचे खुलाशेनुसार १] शेख नईम युसुफ ,२] शिल्पा गायकवाड ,३] अनिता तोडमल हे दि.१३/०५/२०२० ते १२/११/२०२० या कालावधीत कामावर हजर होते, तसेच ४] सुलभा पवळ हे दि.१३/०५/२०२० ते १४/१०/२०२० या कालावधीत कामावर हजर होते, सदर कर्मचारी यांना पुर्ननियुक्ती आदेश न मिळाल्यामुळे पुढील कालावधीत गैरहजार राहीले. सोबत सदर कर्मचारी यांचे खुलासा जोडले आहे. प्रस्तावीत नुसार सदरील कर्मचारी यांना दि.१३/०५/२०२० ते दि.१२/११/२०२० या कालवधीत कार्योत्तर आदेश देणेकामी मा.स्थायी समिती यांची मंजुरी घेणे घेणेकामी सादर.

तरी प्रस्तुत प्रकरणांवरील रक्तसंक्रमण अधिकारी, रक्तपेढी विभाग यांनी जा.क्र. रक्तपेढी १८० दिनांक १८/११/२०२१ रोजीच्या शेरांकनानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदांवर खालील दर्शविलेल्या संबंधीताची नमूद केलेल्या कालावधीमध्ये दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुर्नेमणुकीबाबतचा प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ. क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम (हंगामी) | दरमहा मानधन रूपये | कामावर हजर / पुर्नेनेमणूक कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | सुलभा प्रकाश पवळ | परिचारीका | ११,०००/- | दि.१३/०५/२०२०ते दि.१४/१०/२०२० |
| २ | अनिता रमेश तोडमल | परिचारीका | ११,०००/- | दि.१३/०५/२०२०ते दि.१२/११/२०२० |
| ३ | शिल्पा प्रभाकर गायकवाड | परिचारीका | ११,०००/- | दि.१३/०५/२०२०ते दि.१२/११/२०२० |
| ४ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्नीशियन | १६,०००/- | दि.१३/०५/२०२०ते दि.१२/११/२०२० |

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, मुलेअ व अंलेप यांचे अभिप्रायासह सादर करा.

यावर मा.मुख्य लेखाधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. एस.आर.व्ही.-२००५ /प्र.क्र.४७/५/१२ दि.२५/८/२००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अंत्यत तातडीची गरज म्हणून तात्पुत्या / अस्थायी

नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केलेले आहे. प्रस्तावीत लॅब टेक्नीशियन, परिचारीका पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा. अति. आयुक्त यांची अभिप्राय की, आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन , परिचारीका यापदी दरमहा मानधनावर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुर्ननियुक्तीबाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १४९ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचाऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र.१००० दि.२५/११/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणीपुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. पाणीपुरवठा विभाग १००० दि.२५/११/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १] मनिष कैलास सोनवणे , २] संदिप प्रभाकर पुंड,३] गहिनीनाथ अंबादास मेने यांचा अटी व शर्ती नुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.२५/०२/२०२१ ते २४/०८/२०२१ अखेर सहा महिन्याकरीता असुन सदरची मुदतही दि.२५/०८/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने पाणी विभागमध्ये मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने संबंधितांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील नियुक्तीबाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र. ७० दि.०३/०९/२०२१ अन्वये पारित मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने अनुक्रमे जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ३२८४ दि. १२/१०/२०२१ अन्वये पाणीपुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १. संदिप प्रभाकर पुंड , २. मनिष कैलास सोनवणे , ३. गहिनीनाथ अंबादास मेने यांची रूपये १४,०००/- या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवुन दि.२५/०२/२०२१ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.२५/०८/२०२१ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २८/०८/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत प्रस्तावास मा.स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

| अ.क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | संदिप प्रभाकर पुंड | विजतंत्री | १४०००/- | पाणीपुरवठा विभाग |
| २ | मनिष कैलास सोनवणे | विजतंत्री | १४०००/- | पाणीपुरवठा विभाग |
| ३ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | १४०००/- | पाणीपुरवठा विभाग |

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस. आर.व्ही. -२००५ /प्र.क्र. ४७/०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद क्र.५"सर्व पदावरील

नियुक्त्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अंत्यत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी" अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरतया अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केलेले आहे. प्रस्तावीत पंपचालक पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार आदेशार्थ सादर

यावर मा. अति.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समित सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी दरमहा मानधनावर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १५० मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- रक्तपेढी विभाग यांचेकडील जा.क्र.१७७ दि. १७/११/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,रक्तपेढी विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. १७७ दि.१७/११/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "रक्तपेढी विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील नियुक्तीचा कालावधी दि. ०५/०७/२०२१ ते ०४/०१/२०२२ अखेर सहा महिन्याकरिता असून सदरची मुदत ही दिनांक ०५/०१/२०२२ रोजी पासुन समाप्त होत असल्याने संबंधितांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील नियुक्तीबाबत " नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५३ दिनांक २६/०७/२०२१ अन्वये पारीत मंजुरी ठरावाच्या अनुषांगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ३४३८ दि.२७/१०/२०२१ अन्वये रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशीयन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची रू.१६०००/-या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवून दि.०५/०७/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.०५/०१/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार रक्तपेढी विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक ०८/०१/२०२२ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सादर करणेसाठी मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ.क्र | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मोरे पल्लवी दगडू | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | रक्तपेढी विभाग |

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेअ / मुलेप यांचा अभिप्राय

यावर मा.मुख्य लेखाधिकारी यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.प्रस्तावित लॅब टेक्नीशियन यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार आदेशार्थ

यावर मा. अति. आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशीयन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १५१ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका कै.बा. दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- कै.बा.दे. दवा. यांचेकडील जा.क्र.५४८ दि.१०/११/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषन्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र. वैद्यकीय अधिक्षक यांनी त्यांचेकडील जा.क्र. ५४८ दिनांक १०/११/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पारिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांचा अटी व शर्ती नुसार मानधनावरील नियुक्तीचा कालावधी दि.२१/०६/२०२१ ते २०/१२/२०२१ अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदतही दि.२१/१२/२०२१ रोजी पासुन समाप्त होत असल्याने संबंधीतांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील नियुक्तीबाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र. २४ दि.०३/०६/२०२१ अन्वये पारित मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने अनुक्रमे जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक १८९२ दि. १२/१०/२०२१ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची रूपये १३,०००/- या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवुन दि.२१/०६/२०२१ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.२१/१२/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसान खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २४/१२/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सादर करणेसाठी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

| अ.क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिक्ाण |
|---|---|---|---|---|
| १ | अर्चना संदिप क्षत्रिय | परिचारीका | १३,०००/- | कै.बा.दे. दवाखाना |

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" मान्यतेस्तव

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत / मार्गाने / माध्यमार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमूद केले आहे प्रस्तावीत परिचारिका पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करणे यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांची अभिप्राय की, प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बा. दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी अर्चना संदिप क्षत्रिय यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १५२ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- म.न.पा.विद्युत विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या मानधन वायरमन अ.नं.२) श्री. समाधान र. चव्हाण व अ.नं. ३) श्री. मुदस्सीर मुबारक शेख यांना अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभाग

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात खालील एकुण ३ मानधन वायरमन यांची विद्युत विभाग जा.क्र.८५ दि.०३/०६/२०२१ कार्यालयीन आदेशान्वये अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यात आलेली होती.सदर मानधन वायरमन यांची मुदत दि.०२/१२/२०२१ रोजी समाप्त होत असून अ.नं.१ चे मानधन वायरमन हे सतत गैरहजर असल्याने त्यांना वगळून इतर दोन्ही वारमन यांना पुढील सहा महिन्याकरीता मनधनावर मुदतवाढ देणे उचित वाटते.

| अ.नं. | उमेदवारांचे नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.शरद अशोक सोनवणे | वायरमन | १४२५०/- | विद्युत विभाग |
| २ | समानधान रमेश चव्हाण | वायरमन | १४२५०/- | विद्युत विभाग |
| ३ | मुदस्सर मुबारक शेख | वायरमन | १४२५०/- | विद्युत विभाग |

वरील तक्त्यामधील अ.नं.१ श्री.शरत अशोक सोनवणे,मानधन वायरमन हे सतत गैरहजर असल्याने यांना पुढील मुदतवाढ देणे योग्य वाटत नाही.

विद्युत विभागाकडे सद्यस्थिती पाहता कायम वायरमन एकून ९ व मानधन वायरमन १३ आहे.अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील एकुण १७ प्रभागामध्ये पथदिवे देखभाल व दुरूस्तीचे काम तसेच मनपाचे प्रॉपर्टी वरील विद्युत बाबतचे देखभाल दुरूस्ती करणेकरीता वायरमन यांची आवश्यकता आहे.

तरी अ.नं.२) श्री.समाधान रमेश चव्हाण व अ.नं.३) श्री.मुदस्सीर मुबारक शेख यांना वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम५३ च्या तरतुदीनुसार आत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वरील मानधन वायरमन यांना दरमहा रू.१४,२५०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०६/१२/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरिता करारबध्द मुदतवाढ मिळणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्र.उपअभियंता (विद्युत) यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत / मार्गाने / माध्यमार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमूद केले आहे. प्रस्तावीत वायरमन पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून कार्यवाही करणे यावी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,अ.क्र.२ व ३ यांना मुदतवाढ देणेकामी मान्यतेस

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** म.न.पा.विद्युत विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या मानधन वायरमन अ.नं.२) श्री. समाधान र. चव्हाण व अ.नं. ३) श्री. मुदस्सीर मुबारक शेख यांना अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द मुदतवाढ देणे बाबतचा चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १५३ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका विदुयत विभागाकडील मानधन कनिष्ठ अभियंता श्री. शिवप्रकाशन भार्गवन व श्री. विजय शंकर तिवारी यांना तांत्रिक कालखंड पुढील सहा महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभाग

संदर्भ- १. मा.स्थायी समिती सभा क्र.५ विषय क्र.६३ दि.२८/१२/२०२०

२. विदयुत विभाग जा.क्र. १५५ दि.०८/०७/२०२१

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरीता कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या वरील संदर्भ क्र.२ अन्वये दोन सेवानिवृत्त अभियंता १] श्री. शिवप्रकाशन भार्गवन ,२] विजयशंकर तिवारी यांना सहा महिन्याकरीता कार्यालयीन आदेश दिलेला होता. सदरची मुदत दि.०३/०८/२०२१ रोजी समाप्त होत आहे.

महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण पथदिवे मेंटेनस पाहणे कामी कर्मचारी संख्या कमी असल्या कारणाने विदयुत विभागाकडील सेवानिवृत्त इंजिनिअर कंत्राटी करार पध्दतीलने नेमलेले आहे. सदरील सेवानिवृत्त इंजिनिअर विदयुत विभागाकडील असलेली संपुर्ण नगर शहरातील वीज बीले व मीटरचे सर्वे करून प्रत्यक्ष पाहणी करून म.रा.वि.वि.कं.मर्या. अ.नगर यांचेकडे पत्रव्यवहार करून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल या दृष्टीने योग्य काम करत आहे त्यामुळे कंत्राटी इंजिनिअर यांची मुदतवाढ करणे आवश्यक आहे.

सदर अभियंता यांनी मानधनात रू.५०००/- वाढ होणे बाबत मागणी केलेली असुन यापुवी विदयुत विभाग जा.क्र.४३४ दि.२४/०२/२०१९ अन्वये दि.२६/०७/२०१९ पासून त्यांचे मानधन रू. २५०००/- हजारावरून ३१०००/- रूपये करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत त्यांचे मानधन रू.३१०००/- आहे.

तरी विदयुत विभागातील मानधन अभियंता यांच्या मानधनामध्ये रक्कम रूपये ४०००/- वाढ उचित वाटत असून कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या २ सेवानिवृत्त अभियंता यांची मुदत दि.०४/०२/२०२१ ते दि.०३/०८/२०२१ च्या सहा महिने वरील संदर्भिय आदेशानुसार संपत असल्याने १] श्री. शिवप्रकाशन भार्गवन , २] विजयशंकर तिवारी यांना तीन दिवसांचा तांत्रिक कालखंड देवुन दि.०७/०८/२०२१ पासून पुढील ६महिन्याकरिता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ मिळणेकरीता मंजूरी मिळणेस सदरचा रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर./ अ

येणेप्रमाणे विदयुत विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त कर यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १४३ मधिल चर्चे नुसार

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ मधील विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील क्रमांक १४३ ते १५३ हे सर्व विषय करारबध्द नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांना मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर महानगरपालिका विदुयत विभागाकडील मानधन कनिष्ठ अभियंता श्री. शिवप्रकाशन भार्गवन व श्री. विजय शंकर तिवारी यांना तांत्रिक कालखंड पुढील सहा महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ व मानधनामध्ये रक्कम रूपये ४०००/- वाढ मिळणेबाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.तसेच प्रस्तावातील मुदतवाढ दि.०७/०८/२०२१ पासून पुढील ६महिन्याकरिता देण्यात आलेली आहे.सदरची मुदतवाढ ही दिनांक ०७/०२/२०२२ रोजी संपत असल्याने उर्वरीत एक माहिन्याला कालावधी पहाता याच सभेमध्ये पुढील सहा महिन्या करीता मुदतवाढीस मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १५४ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) म्हणुन ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणुकीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. संबंधीत ॲडव्होकट (विधी तज्ञ) यांचे अर्ज

२. मा.श्री. अशोक किसन बडे, नगरसेवक यांचे दि. २३/०९/२०२१ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.श्री.अशोक किसन बडे, नगरसेवक यांनी दिनांक २३/०९/२०२१ रोजीचे पत्र देवुन त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या पॅनलवर कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्ती मिळणेबाबत वकील यांनी अर्ज दिलेले आहेत, सदर अर्जाबाबत पॅनलवर कायदेशीर सल्लागार नियुक्ती करणेकामी सदर बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पॅनलशिपवर विधी तज्ञ (ॲडव्होकेट) म्हणून नियुक्ती बाबत प्राप्त अर्जांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | नाव | पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | निरंजन पी भावके | ३ मजला, बिल्डींग नं.२३३,पेरीन नरीमन रोड बजार गेट, बेलार्ड इस्टेट फोर्ट,मुंबई | मा.उच्च न्यायालय, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर<br>अर्ज प्राप्त दि.१८/१/२०२१ |
| २ | पी.व्ही.तपसे पाटील | कैलास प्लॅट ओनर्स हौसिंग सोसायटी एन.३,सिडको,कामगार चौक, औरंगाबाद | मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद<br>अर्ज प्राप्त दि.२/२/२०२१<br>अर्ज प्राप्त दि.२९/६/२०२१ |
| ३ | एच.एम.चावला | अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.२४/३/२०२१ |
| ४ | अक्षय शरद दांगट | रा. प्लॉट नं.५, अनेय टेरेस, गुजर गल्ली लक्ष्मी कांरजा, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.९/७/२०२१ |
| ५ | विमल शिवाजीराव खेडकर | संकल्प अपार्टमेंट , नालेगांव, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.१३/७/२०२१ |
| ६ | सुमित भरत भोज | आदिशक्ती, दातरंगे मळा, नालेगाव अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.१२/७/२०२१<br>अर्ज प्राप्त दि.२२/७/२०२१ |
| ७ | शशिकांत बी. रकटे | लक्ष्मी नृसिंह कृपा, कोर्ट गल्ली, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर अर्ज प्राप्त दि.२९/७/२०२१<br>अर्ज प्राप्त दि.२७/७/२०२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | अनिल नारायण कवडे | लक्ष्मी नृसिंह कृपा, कोर्ट गल्ली, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.२९/७/२०२१<br>अर्ज प्राप्त दि.२७/७/२०२१ |
| ९ | राहुल एम पावर | लक्ष्मी नृसिंह कृपा, कोर्ट गल्ली, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.२९/७/२०२१<br>अर्ज प्राप्त दि.२७/७/२०२१ |
| १० | सतिश परमेश्वर गिते | शिवाजीनगर कल्याणरोड अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.२६/७/२०२१ |
| ११ | मंगेश वसंतराव दिवाणे | लक्ष्मी नृसिंह कृपा, कोर्ट गल्ली, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगरअर्ज प्राप्त दि.३/८/२०२१ |
| १२ | संदिप ज्ञानदेव जावळे | प्लॉट नं.१७१, वामनभाउ कॉलनी, भगवान बाबा चौक, निर्मलनगर सावेडी अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.२/८/२०२१<br>अर्ज प्राप्त दि. ३/८/२०२१ |
| १३ | तुळशीराम एकनाथ बाबर | अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.१३/९/२०२१ |
| १४ | गोरक्षनाथ व्ही. तांदळे | कोर्ट गल्ली, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.१५/९/२०२१<br>अर्ज प्राप्त दि.२१/९/२०२१ |
| १५ | वृषाली जी तांदळे (काळे ) | कोर्ट गल्ली, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.२१/९/२०२१ |
| १६ | दिपक अंबादास मच्चा | झारेकर गल्ली, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.२३/९/२०२१ |
| १७ | गौरव अशोक भोसले | गंजबाजार, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>अर्ज प्राप्त दि.१/१०/२०२१ |
| १८ | पोपट विठठलराव बडे | नागापुर, एमआयडीसी अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर |
| १९ | सुचिता आ.बाबर(वायकर) | न्यु. बाबर बिल्डींग, माळीवाडा, अहमदनगर | मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर |

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत मा.न्यायालयामधील दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर संल्लागार (विधीतज्ञ) म्हणून सद्यस्थितीमध्ये खालील प्रमाणे ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पॅनलशिपवर नियुक्ती असुन माहिती बाबतचा तपशी्ल पुढील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नाव | तातपुरत्या स्वरूपात पदनाम | जा.क्र.आस्था. कराराबध्द नेमणूक व तारीख | कालावधी | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | ॲड.श्री.एस.के. पाटील | विधी तज्ञ | कोर्ट विभाग जा.क्र. ४६४दि.१३/८/२००३ आस्था.विभाग जा.क्र.४९५४ दि.९/११/२०१६ | दि.१३/८/२००३ पासुन पुढील आदेश होईपय्रत (मा. औद्यो. व कामगार न्याया.) | १२,०००/- मा.स्था. स. ठ.नं. ८५दि.३/९/२०१६अन्वये दि.१५/११/२०१६ मानधनात वाढ दरमहा रू.१७०००/- |
| २ | ॲड.श्री.एस. बेंद्रे | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.७२८२ दि.१६/१/२०१५ | दि.१६/१/२०१५पासून पुढील आदेश होईपर्यत (मा.उच्च न्याय.औरंगाबाद) | २०,०००/- |
| ३ | ॲड.श्री. किशोर एन. लोखंडे | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.३०७२ दि.३०/७/२०१४ | दि.१/८/२०१४ पासून पुढील आदेश होईपर्यत (मा.उच्च न्याय.औरंगाबाद) | २०,०००/- |
| ४ | ॲड. प्रसन्न एम जोशी | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |
| ५ | ॲड. प्रसाद दिलीप गांगर्डे | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |
| ६ | ॲड. महेश शरदराव काळे | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |
| ७ | ॲड. संजय मधुकर वालेकर | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |
| ८ | ॲड. रेणू राजेश कोठारी | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |
| ९ | ॲड. शारदा सुरेश लगड | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | ॲड. बागवान तौसिफ | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |
| ११ | ॲड. स्वाती एस.पाटील | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |
| १२ | ॲड. अनुराधा दिनेश येवले | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |
| १३ | ॲड. केदारनाथ उत्तमराव राजेभोसले | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र. १२७२ दि.८/६/२०२० | दि.१५/६/२०२० पासून तीन वर्षाकरिता (मा.दिवाणी/ फौजदारी न्याया.) | मा.स्था.स.ठ.नं.१६२ दि.२४/२/२०२० अन्वये पुनश्चः नियुक्ती १०,०००/- |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेलः

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य

असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही" असे नमुद केलेले आहे.

संबंधीतांच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने व अहमदनगर महानगरपालिकेच्या पॅनलवर कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) ॲडव्होकेट म्हणुन दरमहा मानधनावर नेमणूक करणेबाबत निर्णय झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ (३) नुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पुर्व मंजुरी करीता निर्णयास्तव पाठविणेस व त्याप्रमाणे मा.स्थायी समितीच्या ठरावाच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर वर्तमान पत्रामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात मा.न्यायायलामध्ये कामकाज पहाणेसाठी नव्याने विधीतज्ञ (ॲडव्होकेट) यांची दरमहा मानधनावर नियुक्ती करीता मुलाखतीसाठी थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार जाहिरात प्रसिध्दीस द्यावी लागेल.

तद्नंतर सदर प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने मा.निवड समिती मार्फत उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन निवड झालेल्या ॲडाव्होकेट यांची यादी नोटीस फलकावर प्रसिध्द करून त्याप्रमाणे निवड झ ाालेल्या ॲडव्होकेट यांची नव्याने दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती आदेश निर्गमित करावा लागेल व त्याच वेळेस यापुर्वी कार्यरत विधी तज्ञ पैकी दरमहा मानधनावर वरील केलेल्या यापुर्वीची विधीतज्ञ यांची नियुक्ती संपुष्टात येत असल्या बाबतचा आदेश संबंधीताना निर्गमित करावा लागेल. सदरची वरील विहीत पध्दतीची प्रक्रिया ही एकाच वेळेस होणे तांत्रिक दृष्टया योग्य होईल.

उपरोक्त प्रकरणी आर्थिक व धोरणात्मक बाब असल्याने याबाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन याबाबत निर्णय होणे उचित वाटते.

तरी उपरोक्त संबंधीताच्या अर्ज व मा.श्री.अशोक किसन बडे ,नगरसेवक यांचे दिनांक २३/०९/२०२१ रोजीचे पत्राच्या अनुषंगाने सदर प्रकरणी अहमदनगर महानगरपालिकेमध्ये नव्याने (विधीतज्ञ ) ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती बाबत निर्णय झाल्यास उमदेवारांच्या थेट पध्दतीने मुलाखतीसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन मा.निवड समिती मार्फत उमेवारांच्या मुलाखती घेवुन विहीत पध्दतीने कार्यवाही करणे बाबतच्या प्रस्तावास पुर्व मंजुरी मिळणेकरीता सदर प्रकरणी मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन मा.स्थायी समितीकउे निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव पाठविणेसाठी मंजुरीकरीता आदेशार्थ सादर

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचे अभिप्रायासह सादर करा.

यावर लेखापरिक्षक / मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अहमदनगर महानगरपाकि सद्यस्थितीत मा.न्यायालमधील दाव्यासंदर्भात कामकाज पाहणेकरिता एकुण १३ कायदेशीर सल्लगार (विधीतज्ञ) यांची नियुक्ती असल्याचे दिसुन येते प्रस्तावात १७ नवीन विधी सल्लागार यांचे नियुक्ती बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.मात्र अहमदनगर महानगरपालिकेतील मा.न्यायायातील दाव्यांची संख्या किती आहे त्यासाठी आवश्यकता कायेदशीर सल्लागार किती नियुक्ती करावी लागेत.?तसेच सदयस्थितीमध्ये असणारे विधी सल्लागार हयांचे कडे किती दावे आहेत ? किती दाव्यांचा निपटारा झाला ? हयाबाबत कोर्ट विभागाने माहिती दयावी. याबाबत कामगार अधिकारी आणि कोर्ट विभाग प्रमुख यांचे स्वयंस्प्ट अभिप्राय घेउन प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे जाहिरात प्रसिध्दीस देउन विहीत पध्दतीने कार्यवाही करणेकामी मान्यतेस्तव सादर./अ

उपरोक्त विषयाबाबत अनुसरून सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या कामगार विभागाचे ॲड. श्री.एस.के.पाटील यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. नवीन नेमणूकीकामी आलेल्या

अर्जांमध्ये एकही अर्ज मा.औद्योगिक व कामगार न्यायालयात नेमणूकी कामी आलेला दिसुन येत नाही. मा. औद्योगिक व कामगार न्यायालयात पुढील प्रमाणे केसेस प्रलंबित आहेत.

| अ.क्र. | वकीलांचे नाव | मा. औद्योगिक न्यायालय | मा.कामगार न्यायालय | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.एस.के.पाटील | ३७ | २३ | ६० |

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात ॲड. श्री.व्ही.एस. बेंद्रे व ॲड.श्री.के.एन. लोखंडे यांची नेमणूक करण्यात आलेली असुन त्यांचेकडेस पुढील प्रमाणे केसेस आहेत.

| अ.क्र. | वकीलांचे नाव | कोर्ट विभाग | कामगार विभाग | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. व्ही.एस. बेंद्रे | ६६ | २९ | ९५ |
| २ | श्री. के.एन. लोखंडे | ३३ | २५ | ५८ |
| | | | एकुण | १५३ |

मा.जिल्हा न्यायालय अहमदनगर येथे पुढील प्रमाणे वकील नेमण्यात आलेले असुन त्यांचेकडेस तक्त्यात नेमल्यानुसार केसेस आहेत.

| अ.क्र. | वकीलांचे नाव | एकुण केसेस | प्रलंबित | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | प्रसन्न एम.जोशी | ५५ | ५४ | |
| २ | शारदा सुरेश लगड | ३४ | २९ | |
| ३ | प्रसाद दिलीप गांगर्डे | ६६ | ६६ | |
| ४ | महेश शरदराव काळे | ४१ | ३९ | |
| ५ | रेनु राजेश कोठारी | २३ | १९ | |
| ६ | संजय मधुकर वालेकर | ३७ | ३६ | |
| ७ | केदारनाथ उत्तमराव राजेभोसले | ३४ | २९ | |
| ८ | अनुराधा दिनेश येवले | ३३ | ३३ | |
| ९ | स्वाती एस. पाटील | ४७ | ४२ | |
| १० | तौसीफ मुश्ताक बागबान | ३९ | ३७ | |
| | एकुण | ४०९ | ३८४ | |

उपरोक्त प्रमाणे परिस्थिती पहाता नवीन वकील पॅनलवर घ्यावयाचे झाल्यास ज्येष्ठ विधिज्ञांना तसेच महानगरपालिका कामकाजाचा अनुभव असलेल्या वकीलांना प्राधान्य देणे योग्य होईल तथापी सदरची बाब ही धोरणात्मक असल्याने व याबाबत यापुर्वी महानगरपालिका पॅनलवर वकील नेमणूकीबाबतचे सर्व निर्णय वरिष्ठ स्तरावर घेण्यात आलेले असल्याने याबाबतचा निर्णय देखील वरिष्ठ पातळीवर होणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सादर/ ब

येणेप्रमाणे प्रभारी कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" मधील मुलेप यांचे अहवाल व "ब" मधील प्र. कामगार अधिकारी यांचे अहवालानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.अति. आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, यापुर्वीच्या नियुक्त्या केव्हा व किती कालावधी केला आहेत. तसेच नियुक्त्या रद्द करण्याचे कारण काम समजून येत नाही सविस्तर अभिप्राय सादर ------

यावर आस्थापना प्रमुख यांची अभिप्राय की, प्रस्तुत प्रकरणावरील मा.आयुक्त साहेब यांचे दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या शेरांकनानुसार की, अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) म्हणुन मा.स्थायी समिती ठराव क्र.१६२ दिनांक २४/०२/२०२० अन्वयेच्या पारित ठरावानुसार जा.क्र.आस्था.१२७२ दि.०८/०६/२०२० चे आदेशानुसार ॲड.प्रसाद दिलीप गांगर्डे व इतर ९ यांची दि.१५/०६/२०२० ते १४/०६/२०२३ अखेर तीन वर्षाकरीता पॅनलशिप

दरमहा मानधनावर ॲडव्होकेट यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मा.श्री.अशोक किसन बडे,सभागृह नेते यांनी दिनांक २३/०९/२०२१ रोजी पत्र देवुन त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या पॅनलशिपवर कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्ती मिळणेबाबत वकील यांनी अर्ज दिलेले आहेत. सदर अर्जाबाबत पॅनलशिपवर कायदेशीर सल्लगार नियुक्ती करणेकामी सदर बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी. असे नमुद करून सुचित केलेले आहे. त्यानुषंगाने प्रस्तुत प्रकरण मा.स्थायी समिती कडे सादर करणेबाबतचा प्रस्ताव प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी आदेशार्थ सादर./अ

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.अति. आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, 'अ' बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) म्हणुन ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणुकीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- विभाग प्रमुख सविस्तर माहिती सांगा.मा.उच्च न्यायालयातील औरंगाबाद खंडपीठ येथे Standing Counsel बाबत माहिती सांगा.

कोर्ट विभाग प्रमुख श्री.अबरार शेख :- हाय कोर्टाच्या पॅनलवर दोन वकील आहेत ॲड.व्ही.एस.बेंद्रे व किशोर एन.लोखंडे काही केसेसे च्या बाबतीत सिनीयर काउन्सील यांची गरज भासते.त्यावेळी आपण त्यांची नियुक्ती करतो.या करीता मागील काही केसेसे साठी ॲड.होन,ॲड सपकाळ व ॲड.सुबोध शहा यांनी कामकाज पाहिले आहे.

मा.सभापती साहेब :- सर्व वकील नामांकीत असून .मा.उच्च न्यायालयातील औरंगाबाद खंडपीठ येथे Standing Counsel ची नियुक्ती करण्यात यावी.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- महानगरपालिकेच्या एकुण किती केसेस आहेत.महानगरपालिकेच्या बाजुने जिल्हा न्यायालयात व उच्च न्यायालय येथे किती निकाल लागले आहेत.विरोधात किती निकाल लागले आहे.सध्याच्या केसेस बाबत काय परिस्थती आहे व वकीलांना दिल्या जाणा-या मानधनाबाबत माहिती सांगा.

कोर्ट विभाग प्रमुख श्री.अबरार शेख :- महानगरपालिकेच्या एकुण ४२७ केसेस आहेत.महानगरपालिककेच्या बाजुने २९ व विरोधात १७ निकाल झाले असून प्रलंबीत ३८१ केसेस आहेत.उच्च न्यायालयामध्ये १०२ केसेस आहेत त्यापैकी ७१ केसेस बाकी आहे.जिल्हा न्यायालयातील वकीलांना प्रती महा रक्कम रूपये १०,०००/- व उच्च न्यायालयातील वकीलांना रक्कम रूपये २०,०००/- प्रती महा मानधन अदा केले जाते.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- जे १७ निकाल विरोधात गेले आहेत त्याविरोधात आपण उच्च न्यायालयात अपील करतो का?

कोर्ट विभाग प्रमुख श्री.अबरार शेख :- हो,अपील केले आहे.काही केसेस मध्ये अपील केले नाही तरी चालते.त्या मालक /भाडेकरूच्या केसेस असतात.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- या सर्व केसेस करीता कोणाच्या अधिपत्या खाली कामकाज चालते.

कोर्ट विभाग प्रमुख श्री.अबरार शेख :- ज्या विभागाच्या केस असतील त्या विभागाचे प्रमुख यांच्या कडून केसेस बाबत माहिती व कागदपत्रांची पुर्तता केली जाते व संबंधीत वकीला कडे केस दिली जाते.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- या पुर्वीच्या वकीलांच्या नियुक्त्या कशा पध्दतीने केल्या आहेत.

कोर्ट विभाग प्रमुख श्री.अबरार शेख :- उच्च न्यायालव व जिल्हा न्यायालय याकरीता ॲड.यांची स्थायी समितीच्या ठरावाने नेमणूका केल्या आहेत.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- सध्या नियुक्त असलेल्या वकीलांपैकी काहीची नियुक्ती कायम ठेवणे, कमी करणे अथवा नव्याने नियुक्ती करणे बाबतचे सर्व अधिकारी मा.सभापती साहेब यांना देण्यात यावेत.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथे एक Standing Counsel नेमण्यात यावा.व सध्याच्या वकीलांची नियुक्ती कायम ठेवणे, कमी करणे अथवा नव्याने नियुक्ती करणे बाबतचे सर्व अधिकारी मा.सभापती साहेब यांना देण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- वकिलांच्या नियुक्ती बाबत आपण जे चांगले व कार्यक्षम वकील असतील अशांच्या ॲडव्होकेट पॅनलवर नियुक्या करण्यात येतील. ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद असलेले अर्जदार मला प्राप्त अधिकारा नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या ॲडव्होकेट पॅनलवरील मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर, येथील काम पहाणारे ॲड.बागवान तौसीफ मुश्ताक, यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे. व ॲड.शशिकांत रकटे, ॲड.मंगेश दिवाणे,ॲड. तुळशीराम बाबर,ॲड.दिपक अंबादास मच्चा , ॲड.गौरव अशोक भोसले,ॲड.श्रीमती सुचीता आ.बाबर(वायकर) या वकीलांच्या नव्याने नियुक्त्याकरण्यात याव्यात.या नियुक्त्या पुर्वीच्या मानधनावर करण्यात याव्यात. ॲड. प्रसन्न एम.जोशी , ॲड.प्रसाद दिलीप गांगर्डे, ॲड.महेश शरदराव काळे ,ॲड.संजय मधुकर वालेकर, ॲड.रेणू राजेश कोठारी ,ॲड.शारदा सुरेश लगड, , ॲड.स्वाती एस.पाटील(वाघ), ॲड.अनुराधा दिनेश येवले, ॲड. केदारनाथ उत्तमराव राजेभोसले, यांच्या पुर्वीच्या नियुक्त्या कायम ठेवण्यात याव्यात.तसेच मा उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथील कामकाजासाठी कार्यरत असलेले मानद विधीज्ञ ॲड.व्ही.एस.बेद्रे ,ॲड.किशोर लोखंडे , यांची मानद नियुक्ती कायम ठेवण्यात यावी. मा.औदयोगीक व कामगार न्यायालय येथील कामकाज पहाणारे विधिज्ञ ॲड. एस.के.पाटील यांची नियुक्ती कायम ठेवण्यात यावी. मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथे एक Standing Counsel नेमणूक करण्यात यावी.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार व स्थायी समितीच्या सभेमध्ये मा.सदस्यांच्या वतीने सभापतींना प्राप्त झालेल्या अधिकारा नुसारअहमदनगर महानगरपालिकेच्या मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता ॲडव्होकेट पॅनलवरील कायदेशीर सल्लागार (विधीज्ञ) म्हणून ॲडव्होकेट यांची दरमहा माधनावर पॅनलवर नेमणूकी बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामधील एकुण अर्जांमधून सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१) मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर, येथील काम पहाणारे विधीज्ञ यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर,ॲडव्होकेट पॅनलवर ॲड. प्रसन्न एम.जोशी , ॲड.प्रसाद दिलीप गांगर्डे, ॲड.महेश शरदराव काळे ,ॲड.संजय मधुकर वालेकर, ॲड.रेणू राजेश कोठारी ,ॲड.शारदा सुरेश लगड, , ॲड.स्वाती एस.पाटील(वाघ), ॲड.अनुराधा दिनेश येवले, ॲड. केदारनाथ उत्तमराव राजेभोसले,ॲड.शशिकांत रकटे, मा.ॲड.मंगेश दिवाणे,ॲड.तुळशीराम बाबर,ॲड.दिपक अंबादास मच्चा,ॲड.गौरव अशोक भोसले,ॲड.श्रीमती सुचीता आ.बाबर(वायकर) यांची यापुर्वीच्या मानधनानुसार (प्रती मानद विधीज्ञ रक्कम रु.१०,०००/- प्रमाणे) मानद विधीज्ञ म्हणुन नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

३) मा उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथील कामकाजासाठी कार्यरत असलेले मानद विधीज्ञ ॲड.व्ही.एस.बेद्रे ,ॲड.किशोर लोखंडे , यांची मानद नियुक्ती पुर्वीच्या मानधनावर कायम ठेवण्यात येत आहे. मा.औदयोगीक व कामगार न्यायालय येथील कामकाज पहाणारे विधिज्ञ ॲड. एस.के.पाटील यांची नियुक्ती पुर्वीच्या मानधनावर कायम ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे.खर्च मंजूर.

४) मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथे एक Standing Counsel नेमणूक करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १५५ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.१५ बिल क्र.जुना १५/६८१ नविन मालमत्ता क्र.झेड २१५०८६७४७ अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळेवर उर्दू शाळेच्या नांवे नजरचुकीने आकारण्यात आलेली घरपट्टीचीआकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली

संदर्भ- सन २०१९-२०२० चे कराचे बिल

प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१५ वसुली लिपिक यांजकडून विनंती प्रस्ताव देण्यात येतो की, वॉर्ड नं.१५ बील नं.६८१ अहमदनगर महानगरपालिका उर्दु शाळा या नावे वसुली अभिलेख नोंद आहे.

सादर मिळकतीचे सन २०१९-२०२० थकबाकीसह चालु कराचे बिल रक्कम रू.१,७२,२७४/- बिल बजाविणे कामी गेलो असता कराचे बिल स्विकारले नाही. सदर ठिकाणी दि.२९/०४/२०१९ रोजी बील बजावणे कामी गेलो असता आज मितीस उर्दु शाळा असल्याचे आढळुन आलेले आहे. तथापी सदर मिळकत ही मनपाची असलेने यापुर्वी सदरहू मिळकत ही कोणाचे नावे करारनामा करून घेतलेला आहे व यानंतर कोणाचे नाव करारनामा केलेला आहे या उदबोध होत नसलेने कराची थकबाकी कोणाकडून वसुल करावयाची याबाबत संभ्रम निर्माण झालेला असुन याबाबत करारनामे झालेले असल्यास मनपा मार्केट विभागाकडून उपलब्ध झालेस करारनामे प्राप्त करून देणेस व करारनामे झालेले नसल्यास करारनामे करण्यास अहवाल मंजुरीस्तव म्हणजे कर वसुल करणे सोईचे होईल. तथापी अहवाल मान्यतेस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांचे प्रस्तावानुसार प्रस्ताव नमुद मिळकतीचे करारनामे असल्यास वसुली विभागाकडे टॅक्स वसुली कार्यवाही करणे कामी मार्केट विभागास आदेश होणेकामी तसेच करारनामे न झालेस योग्य त्या कार्यवाही करिता आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्रभाग समिती क्र.२ यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मार्केट विभाग पुर्वपृष्ठावरील "अ" मध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी सदरची मिळकत पुर्वी कोणाला दिली होती. त्याचा करारनामा व करारनामा कालावधी संपला कधी व तो संपल्यानंतर कोणत्या दिवशी / वर्षी दुस-याला दिला त्याचा करारनामा इत्यादीबाबत वसुली विभागाला तात्काळ कळवावे व त्याबाबतचा अहवाल उपायुक्त कार्यालयात समक्ष येवुन सादर करावा.

यावर सहा. कर मुल्य निर्धारक यांचा अभिप्रायकी, श्री. माने अहवाल दयावा.

यावर वसुली लिपिक यांचा अभिप्राय की, फेरसादर, दिनांक २९/६/२०१९ अन्वये देण्यात आलेल्या शेरांकनानुसार वसुली विभागाकडील वसुली लिपिक यांचे वर्कशीट नं.४२ दिनांक २७/६/२०१९ अन्वये महानगरपालिका मार्केट विभागास तसेच महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना जा.क्र.६४ दिनांक १५/७/२०१९ अन्वये करारनामे देण्याबाबत कळविणेत आलेले होते. याबाबत मार्केट विभागाकडून जा.क्र.१०४ दिनांक १०/७/२०१९ अन्वये महानगरपालिका उर्दु शाळा भाडेतत्वावर दिल्याची नोंद इकडेस नाही असे कळविले आहे.तसेच महानगरपालिका प्रशासनाधिकारी शिक्षण मंडळ यांनी सद्यस्थितीत चालु असलेली मनपा शाळा क्र. २२ झेडींगेट अहमदनगर या शाळेमध्ये मनपा शाळा क्र.९ हि शाळा हातमपुरा येथे भरत होती परंतु सदर शाळा बंद झालेने सदर शाळेचे मनपा शाळा क्र.२२ झेडींगेट या शाळेत समायोजन करण्यात आलेले आहे. मनपा शाळा क्र.२२ झेडींगेट शाळेस पत्र देवुन विचारणा केली असता त्यांनी या कार्यालयास सादर केलेले पत्र

पत्रासोबत झेरॉक्स प्रत सोबत देण्यात येत आहे असे कळविले आहे. तथापी मार्केट विभाग व महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना पत्र देवुन देखील कागदपत्रे उपलब्ध होत नसलेने तसेच सदरहु मिळकत महानगरपालिकेची असलेने भविष्यात महानगरपालिकेच्या मिळकती संदर्भात कायदेशीर अडचणी निर्माण होवु नये व सदरच्या मिळकती संदर्भातील टॅक्स कोणत्या भोगवटादाराकडून वसुल करावा या संभ्रमावस्था निर्माण होत असुन याबाबत मार्केट विभाग व महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना योग्य त्या कार्यवाही करिता आदेश होणेस सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकरी क्र.२ यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर सहा. कर मुल्य निर्धारक यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार शहर गावठाण हद्दीतील सि.स.नं.२३६९ ही मालमत्ता महानगरपालिकेच्या मालकीची आहे. त्याठिकाणी उर्दु शाळा होती आता ती बंद स्थितीत आहे. सदर शाळेस सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात कर आकारणी करण्यात आली होती. सन २००३-२००४ पुर्वी आकारणी झालेली नव्हती.

सदर शाळेची इमारत महानगरपालिकेच्या मालकी आहे आणि तो कोणत्या ताब्यात नाही त्यामुळे त्यावर झ ाालेली कराची आकारणीची रक्कम वसुल होणार नाही त्यामुळे ती रक्कम म.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करून ती आकारणी रदद करावी लागणार आहे.तरी सदरची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे सादरचा प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय क्रमांक १५५ ते १७१ सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.समद खान :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून हे सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री. दिनेश चोपडा , रा. महाजन गल्ली, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.२ बिल क्र. Z २२००००१६ हे दुबार नोंद झालेले बील रदद करणे व त्यावरील थकबाकीची रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १६८ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अर्जदार भोग- श्री. मुकेश बाळा साहेब काळंगे , रा. सारसनगर, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१३ वॉर्ड क्र.९९३ या संत आनंदऋषीजी व्यापारी संकुल, अग्निशमन दलाशेजारी गाळा नं.५ यांना दिनांक २७/०१/२०१५ रोजी ताब्यात दिल्याने या पुर्वी असलेली गाळयावरील घरपटटी मालमत्ता कराची थकबाकी रक्कम + शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग

शहर वसुली विभाग वॉर्ड नं.१३च्या वसुली मदतनीस यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,संत आनंद ऋषीजी व्यापारी संकुल,अग्नीशमन दला शेजारी गाळा नं.५ चे भोग श्री.मुकेश बाळासाहेब काळंगे यांनी दि.११/०९/२०१८ रोजी इकडील कार्यालयाकडे अर्ज देवून कळविले आहे की,सदरचा गाळा मी ३०/०१/२०१५रोजी भाडे तत्वावर घेतलेला आहे.सदरच्या गाळयावर पुर्वीची थकबाकी आहे.पुर्वीचे भाडेकरी रूपेश संपतलाल गुंदेचा /म्हस्के यांची थकबाकी भरण्याचे काहीच कारण नाही.मी ज्या तारखेपासून गाळा घेतला आहे तेव्हापासून घरपट्टी भरण्यास तयार आहे.असे कळविले आहे.

वॉर्ड नं.१३ बिल नं९९३ या मालमत्तेवर थकबाकी असतांना मनपा मार्केट विभागाने सदरचा गाळा हा मुकेश बाळासाहेब काळंगे यांना दि.२७/०१/२०१५ रोजी ताब्यात दिलेला आहे.पुवी्र सदरचा गाळा रूपेश संपतलाल गुंदेचा /म्हस्के यांजकडे सादरचा गाळा भाडयाने होता.अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग जा.क्र.१८३ दि.०५/०८/२०१६ ने शहर वसुलीला कळविले आहे की,रूपेश संपतलाल गुंदेचा यांना सदरचा गाळा दि.०७/०९/२००२ रोजी वितरीत करण्यात आला होता.तदनंतर दि.१३/०३/२०१४ रोजी थकबाकी पोटी सदर गाळा पंचनामा करून मार्केट विभागाने ताब्यात घेतला आहे.सदर गाळयाची थकबाकीची रक्कम रू.४६३३७२/- व मालमत्ता करापोटी रक्कम रू२१९१६०/- + शास्ती मार्च २०१४ अखेर थकबाकी आहे.सदरची थकबाकी गाळा बंद असल्योन व गाळा धारकाचा तपास केला असता इकडील दिलेल्या पत्यावर रहात नसल्याचे मार्केट विभाग जा.क्र.२८३ दि.२७/१०/२०१४ अन्वये संबधीत गाळे धारकावर दावा दाखल करणे बाबत कोर्ट विभागास कळविण्यात आले आहे.सदर गाळा मार्केट विभागाने ताब्यात घेतल्यानंतर मनपाचे आर्थिक नुकसान हावू नये म्हणून सदर गाळयाची निविदा काढणे करीता तत्कालीन आयुक्त साहेब यांनी दि.२०/०९/२०४ रोजी मान्यता दिली असून निविदा मध्ये श्री.मुकेश बाळासाहेब काळंगे यांना दरमहा रू.७०००/- प्रमाणे निविदा मंजूर होवून सदरचा गाळा दि.२७/०१/२०१५ रोजी ताब्यात देण्यात आला आहे.असे मार्केट विभागाने इकडे कळविले आहे.

सदर मालमत्तेचे पुर्वीचे करयोग्य मुल्य २८,७८२/- ऐवढे होते व आता नविन करयोग्य मुल्य ७५६०० ऐवढे येत आहे.तयुानसार सदर गाळयावर घरपट्टीची मार्च २०१४ अखेर मालमत्ता कराची थकबाकी रू.२१९१६०/-+ शास्ती तशीच ठेवून श्री.मुकेश बाळासाहेब काळंगे यांना दि.२७/०१/२०१५ पासून दरमहा ७०००/- प्रमाणे आकारणी करण्यास व त्यांच्या नांवे स्वतंत्र्य घरपट्टीचे बिल देण्यास रिपोर्ट मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,श्री.गुंदेचा/म्हस्के यांचा पत्ता व ठावठिकाणा नसल्यामुळे श्री.मुकेश काळंगे यांना ताब्यात दिल्यापासून गाळयाची घरपट्टी आकारणी करणे व पुर्वीची थकबाकी २०१५ पुर्वीची श्री.म्हस्के /गुंदेचा यांच्या नांवे तसेच ठेवणे उचित होईल.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.२ यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार घरपट्टी बील दुरूस्तीस हरकत नाही तथापी आदेशार्थ सादर.

यावर सहा.मुल्यनिर्धारण अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक /कर निरीक्षक यांनी प्रस्तावित केले नुसर व प्रभाग अधिकारी यांच्या अभिप्राया नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कराधान प्रकरण ८ चे नियम २०(१) क नुसार दुरूसती करणेस आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,वसुली मदतनीस,कर निरीक्षक ,प्रभाग अधिकारी व सहाय्यक मुल्य निर्धारक व कर संकलन अधिकारी यांनी शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावित अ नुसार विभागाला उचित निर्णय घेता येईल.

मागील थकबाकी भरण्या बाबत कार्यवाही करूनच विभागाला उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,१.टि-१ वरील अ मधील तत्कालीन मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेबाबचे कागदपत्रे अवलोकनार्थ ठेवा.

२.गाळे धारकावर दावा दाखल केला आहेकिंवा केले याबाबत कोर्टविभागकडून माहिती घून सादर करावे ३.सदर गाळयाचा २०१४मध्ये पंचनामा करून ताबा घेतल्याची कागदपत्रे सादर करावीत.त्यावेळी गाळयातध्ये साहित्य व इतर माल असेल तर त्याचे काय केले.

४.श्री काळंगे यांना गाळा लिलावात देणे बाबत सदर लिलावास कोणाची मंजूरी घेतली होती.(मा.स्थायी समिती की मा.आयुक्त) कागदपत्रे अवलोकनार्थ ठेवावीत.

यावर वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,पृष्ठक्रमांक १५ ते ४९ दि.१५/०३/१९ रोजी मार्केट विभागाने कागदपत्रे ओदशीत केलेप्रमाणे सविनय छायांकितप्रति सादर तथा गठित केलेल्या समितीपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार संत आनंदऋषी व्यापारी संकुल मध्ये श्री.काळंगे यांनी दि.२७/०१/२०१५ पासुन ताबा दिला आहे तेव्हा पासून मालमत्ता कराची आकारणी करून मागील थकबाकी बाबत मा.स्थायी समितीकडे कलम १५२ नुसार निर्लेखित होणारी रक्कम कमी करणेस प्रस्ताव पाठवावा त्यास मान्यता देणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,निर्लेखित करावयाची रक्कम व २७/१/२०१५ पासून स्थीती काळंगे यांना दयावयाच्या बिलाची रक्कम (शास्ती बाबत) संपूर्ण माहिती सादर करावी.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर १.निर्लेखीत करावयाची रक्कम रू२१९१६०/- + शास्ती पृष्ठ क्र.७ व १९ सन १३-१४ अखेर २.मुकेश बाळासाहेब काळंगे यांना दि.२७/१/१५ रोजी ताबा दिला असून दरमहा रू.७०००/- भाडे प्रमाणे आकारणी तक्ता.

७०००
x १२
------
८४०००/-
- १०%८४०० /-
-------------------
RV ७५६००/-

| | १६-१७ | १९-२० |
|---|---|---|
| सं.कर- | २०४१२/- | ८५३३४/- |
| पथ- | १५१२/- | ६३२१/- |
| जल - | २०४ | ८५३/- |
| मल- | २०४ | ८५३/- |
| घनकचरा- | १२००/- | ५०१७/- |
| वृक्ष- | ३७८/- | १५८०/- |
| पाणी- | २५०/- | १०४६/- |
| शिक्षण- | ९०७२/ | ३७९२६/- |
| रोज- | २२६८/- | ९४८२/- |
| | ३५५००/- | १४८४१२/- |

दिनांक २७/१/१५ ते सन १९-२० अखेर रू.१४८४१२/- एवढया रकमेचे स्वतंत्र्य घरपटटीचे बिल देण्यात आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,उपरोक्त A नुसार + रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविणकामी मान्यता मिळणेकामी व B नुसार स्वतंत्र्य घरपट्टीचे बिल नवीन गाळेधार यांना देणेसाठी मंजूरी मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, १.B प्रमाणे नवीन आकारणी करणेस हरकत नाही.२. A नुसार निर्लेखित करणेपुर्वी थकीत रकमेच्या वसुली बाबत न्यायालयात दावा दाखल करावा.

यावर प्रभाग अधिकारी ,कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,मुद्दा क्र.३ नुसार स्वतंत्र्य घरपट्टी बील देण्या बाबतची नविन धारकाला देण्याची कार्यवाही चालू आहे.मुद्दा क्र. A नुसार रक्कम निर्लेखित करणे पुर्वी थकीत रकमेच्या वसुली बाबत न्यायालयात दावा दाखल करावा असे आदेशीत केले आहे.

परंतु ॲड.मंगेश दिवाणे यांनी दि.२०/२/१९ रोजी कायादेशीर कागदपत्रे ,करारनामा ,पत्ता,निविदा इ.शिवाय दावा दाखल करणे शक्य नाही.असे अभिप्राय पृ.क्र.१३ वर दिलेला आहे.

तसेच रूपेश संपतलाल गुंदेचा यांची शहर वसुली अंतर्गत मालमत्ता आढळून येत नाही.असे दि.२८/७/१४ पृ.क्र.४३ वर नोंद आहे.

रूपेश संपतलाल गुंदेचा यांचे नातेवाईकांकडे चौकशी केली असता त्यांचा पत्ता मिळत नाही.त्यामुळे त्यांना कोणत्या पत्यावर नोटीस पाठवावी हा प्रश्न निर्माण झालेला आहे.सन २०१३-२०१४ अखेर घरपट्टी रक्कम रू.२१९१६०/- निर्लेखित करणे बाबत आदेशार्थ फेरसादर.

मुकेश काळंगे यांना स्वतंत्र्य घरपट्टी बिल दिलेले आहे.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, A नमुद केलेनुसार संपुर्ण शहर क्षेत्रामध्ये श्री.गुंदेचा यांची मालमत्ता आहे का?या बाबत सर्व प्रभाग अधिकारी यांचे अभिप्राय घेणे.२. जर मालमत्ता नोंद गुंदेचा यांच्या नावाची आढळत नसेल तर त्यांचे विरूध्द रक्कम थकबाकी असताना गायब झालेबाबत पोलीस स्टेशनमध्ये पुढील तपासकामी व आवश्यक कार्यवाही करीता गुन्हा दाखल करणे उचित होईल.

उपरोक्त २ मुद्याबाबत पुढील निर्णयास्तव सादर.

यावर वसुली लिपीक,कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर,मा.उपायुक्त साहेब यांचे दि.२१/०६/२०१९ चे शेरांकनानुसार मुद्दा क्र.१ बाबत संपुर्ण शहर क्षेत्रामध्ये श्री.रूपेश संपतलाल गुंदेचा यांची मालमत्ता आहे काय अशा बाबत प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ ते ४ यांना विचारणा केली असता श्री.रूपेश संपतलाल गुंदेचा यांचे नावे कोणत्याही प्रकारची मालमत्ता आढळून येत नसल्याचे कळविले आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान प्रकरण ८ नियम ४१ बिलाच्या न दिलेल्या रकमेवर आकारलेली शास्ती कराधान प्रकरण८ नियम ५१ नुसार आयुक्तास आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल त्यामुळे सदर नियमानुसार श्री.रूपेश संपतलाल गुंदेचा यांना वितरीत करण्यात आलेला गाळा नांव - भोग विकास रामदास म्हस्के यांचे नांवे सन २०१३-१४ अखेर असणारी थकबाकी रक्कम रू.२१९१६०/- + त्यावरील शास्ती माफ करणेकामी तसेच संगणकावर व तत्सम अभिलेखात तशी नोंद घेण्याकामी प्रस्तव मान्यतेस्तव सविनय सादर तसेच

मुद्दा क्र.२ बाबत जा.क्र.कोर्ट विभाग ३६२ दि.१८/०२/२०१९ अन्वये महानगरपालिकेचे विधीतज्ञ यांचे मत घेतले असता कायदेशीर कामदपत्रे,करारनामा ,पत्ता निविदा इ.शिवाय दावा दाख करणे शक्य नाही असे अभिप्राय पृष्ठ क्र.१३ वर दिलेले आहेत

तसेच मार्केट विभागाकडून श्री.मुकेश बाळासाहेब काळंगे यांना दि.२७/०१/२०१५ पासुना गाळयाचा ताबा दरमहा भाडे रक्कम रू.७०००/- प्रामणे देण्यात आलेला आसून त्याप्रमाणे करयोग्य कर आकारणी करण्यात येत आहे.त्यानुसार एकुण वार्षिक कर रक्कम रू.३५५००/- प्रमाणे सुधारीत मालमत्ता कर आकारणी करण्यात येत आहे.त्यानुसार त्यांनी १५००००/- चा भरण केलेला आहे.

तरी श्री.मुकेश बाळासाहेब काळंगे यांनी दि.२७/०१/२०१५ सुधारीत आकारणी नुसार नविन बिल देण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियत १९४९ मधील प्रकरण कराधान ८ चे नियम २०/१/क नुसार दुरूस्ती बिल देण्यास व संगणकावर व तत्सम अभिलेखात दुरूस्ती नांदी घेण्यास मंजूरी मिळणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

यावर सहा.मुल्यनिर्धारण अधिकारी यांचा अभिप्राय की,१. विभागाने फेर सादर केलेल्या प्रस्तावा नुसार सदर बिला वरील शास्ती नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांना स्वेच्छानिर्णयानुसार अंशतः अथवा पुर्ण माफ करता येईल.

तसेच सदर बिलावरील रक्कम निर्लेखित करणेसाठी कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती कडे पाठविणे योग्य होईल.

२.श्री.मुकेश काळंगे यांना सदरचा गाळा दि.२७/१/२०१५ रोजी मार्केट विभागाने भाडे रूपये ७०००/- प्रमाणे ताब्यात दिलेला असून मनपा अधि.१९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम २०(१)(क) नुसार स्वतंत्र्य बिल देण्यास हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,श्री.चाफे समक्ष चर्चा करा

चर्चा केली अ व ब मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेप यांनी तपासून सादर करणे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षका यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक व सहाय्यक कर मुल्य निर्धारण अधिकारी यांचे अ व ब प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीनी रक्कम निर्लेखित करणे बाबत उचित कार्यवाही करावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय क्रमांक १५५ ते १७१ सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.समद खान :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून हे सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार भोग- श्री. मुकेश बाळा साहेब काळंगे , रा. सारसनगर, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१३ वॉर्ड क्र.९९३ या संत आनंदऋषीजी व्यापारी संकुल, अग्निशमन दलाशेजारी गाळा नं.५ यांना दिनांक २७/०१/२०१५ रोजी ताब्यात दिल्याने या पुर्वी असलेली गाळयावरील घरपट्टी मालमत्ता कराची थकबाकी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १६९ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अर्जदार श्रीमती सुनंदा अनिल कांबळे, रा. हरिजन वस्ती, निलक्रांती चौक,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४३ बिल क्र ५४ व बिल क्र.४८/१ दुबार नळ जोडाची नोंद झाल्याने बिल क्र ४८/१ वरील सन २०२१-२०२२ अखेर रक्कम + शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१सावेडी वसुली विभाग

वरील विषयान्वये वॉर्ड क्र.४३ चे वसुली लिपीक यांज कडून विनंती पुर्व क रिपोर्ट देण्यात यतो की,रीमती सुनंदा अनिल कांबळे रा.हरीजन वस्ती ,निलक्रांती चौक ,अहमदनगर यांनी इकडील कार्यालयास दिनांक ०९/०४/२०२१ रोजी आर्ज देवून असे कळविले आहे की,मला आपल्या मालमत्ता कराचे बिल वॉर्ड क्र.४३ बिल क्र.५४(Z १४३०४४३६५) ने सर्व करांसहीत येते त्यात पाणीपट्टीचे बिल देखील येते.सेच वॉक्र.४३बिल क्र.४८/१ (Z १४३०४४३५८) हे जादा येणारे पाणीपट्टीचे बिल रद्द करून मिळावे अशा स्वरूपाचा अर्ज दिलेला आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जानुसार दिनांक ०६/०७/२०२१ रोजी समक्ष जागेची स्थ पाहणी तसेच संगणकीय प्रणालीची व तत्सम कागदपत्रांची पडताळणी केली असता अर्जदार यांना मालमत्ता कराचे व पाणीपट्टी कराचे बिल क्र४८/१ (Z १४३०४४३५८) ने नियमानुसार जाते व ते नियमीत प्रमाणे बिल भरतात.त्यांना जाणारे मालमत्ता कराचे बिल क्र.४३/५४ यामध्ये पाणीपट्टी (नळजोड) आहे.सोबत पाणीपुरवठा विभागातील फिटर यांचा रिपोर्ट जोडला आहे.तरी अर्जदार याना जादा जाणारे पाणीपट्टीचे बिल क्र. ४८/१ (Z १४३०४४३५८) हे रद्द करण्यास पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,सादर,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक सुनंदा अनिल कांबळे यांना मालमत्ता कराच्या बिला मध्ये पाणीपट्टी कर आकारणी करण्यात आलेली आहे.तसेच त्यांना पाणीपट्टी कराचे स्वतंत्र्य बिल दिले जात आहे.मनपा फिटर यांच्या पहाणी अहवालानुसार मालमत्ता धारक यांच्या कडे एकच नळकनेक्शनची नोंद असल्याने जादा आकारण्यात येणारे बिल क्र.४८/१ थकबाकी सह रद्द करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांनी दिलेला अभिप्राय तसेच मनपा फिटर यांचा अहवाल व वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार जादा आकारणी झालेली नळकनेक्शन ची नोंद कमी करणे उचित वाटते.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,सदर प्रकरणी शास्ती माफीचे अधिकारी मा.आयुक्त साहेब यांना आहेत.तसेच निर्लेखित करावयाची रक्कम हि मा.स्थायी समिती पुढे पाठवावी लागेल तरी अधिनियमातील तरतुदी नुार रक्क्म नमुद करून फेरसादर करा.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, फेरसादर,सुनंदा अनिल कांबळे यांना एकाच नळजोडाचे दोन स्वतंत्र्य बिले अदा करण्यात येत आहेत.बिल क्र.४८/१ यावर असलेली थकबाकी रूपये २८७०६/- व त्यावर आकारलेले व्याज रूपये ३८४८२/- + शास्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये निर्लेखित करणे व कलम २०(१)(क) अन्वये सदर बिल रद्द करणे उचित वाटते.तसेच कलम ५१ अन्वये शास्ती माफिचे अधिकार मा.आयुक्त साहेब यांना असल्याने आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ सावेडी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच वसुली लिपीक यांचा रिपोर्ट व मनपा फिटर यांचा पहाणी अहवालानुसार दुबार झालेली नळाची नोंद रद्द करणे उचित होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,सदर प्रकरणी पाणीपुरवठा फिटर यांचे पाहणी अहवालानुसार एकच १/२ " कने.असल्याने अर्जदार यांना जादा आकारण्यात येणारे बील क्र.४८/१ करणेस हरकत नाही.सदर बीलावरील शास्ती माफीचे अधिकार मा.आयुक्त यांना नियम ५१ अन्वये असल्याने तसेच अधिनिममातील कलम १५२ नुसार सदर बीलावरील थकबाकीची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय क्रमांक १५५ ते १७१ सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.समद खान :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून हे सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्रीमती सुनंदा अनिल कांबळे, रा. हरिजन वस्ती, निलक्रांती चौक,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४३ बिल क्र ५४ व बिल क्र.४८/१ दुबार नळ जोडाची नोंद झाल्याने बिल क्र ४८/१ वरील सन २०२१-२०२२ अखेर रक्कम निर्लेखीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १७० मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अर्जदार अहमदनगर जिल्हा महिला विकास मंडळ, सचिव अहमदनगर यांनी प्रभाग समिती क्र. २ वॉर्ड क्र.८ जुना मालमत्ता बील क्र.८/१५५ मा.क्र.Z२८०८१९५४ या मिळकतीचे घरपटटी कमी करून रक्कम + शास्तीसह निर्लेखित मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग

विनंती रिपोर्ट शहर वसुली विभाग कडुन देण्यात येते की,अर्जदार डॉ.शकीला फातेमा नसीर अहमद शेख सचिव महिला विकास मंडळ यांचे ३०/७/२०१८ रोजीचे अर्जानुसार वॉर्ड नं.८ बिल नं.१५५ नांव जिल्हा महिला विकास मंडळ सदर मिळकती चे घरपट्टी कमी करणे व शास्ती माफ करणे बाबत इकडेस कळविले आहे.सदर बिलावर आज अखेर रू२४५७०१/- इतकी थकबाकी होती.त्यामुधन रू.३००००/- भरलेली आहे.पावती सोबत जोडली आहे.

शेख यांचे अर्जानुसार दि.०१/१०/२०१८ रोजी सदर जागेचे समक्ष पहाणी केली असता सदर जागा वॉर्ड नं८ बिल नं१५५ नांव जिल्हा महिला विकास मंडळ अर्बन बॅक रोड येथे आहे.सदर जाग ही नोंदणीकृत ट्रस्ट रजिस्टर्ड महिला मंडळ आहे.सदर जागेचा वापर महिला सामाजिक आर्थिक आरोग्य व शैक्षणिक विकास करीता व्यवसाय प्रशिक्षण वर्ग विनामुल्य मोफत समाज कार्य केले जाते.सदर जागेमध्ये कुठलाही व्यावसायीक वापर होत नाही.संपुर्ण जागेचा वापर सामाजिक कामासाठी होत आहे.तरी मा.साहेबांनाी कलम १३२ (१ ) क प्रमाणे कर आकारणी करणेस व शास्ती माफ करणेस मंजूरी मिळावी सोबत सोसायटी रजि.सर्टीफिकेट ,ट्रस्ट नोंदणी दाखला व संस्थेची नियमावली व दाखला जोडत आहे.

१३२ (१ ) क प्रमाणे सार्वजनिक वापर नुसार वार्षीक मागणी RV१६००७

सं.क.-------

रस्ता कर------

मल लाभ ४३

जल लाभ ४३

ड्रेनेज टॅक्स ८००

घ.कचरा १२००

वृक्ष ८०

पाणीपट्टी १५००

शिक्षण कर --

**एकुण ३६६६/-**

सदर बिलाची पुर्वीची वार्षीक मागणी ९९०९ इतकी होती. १३२ (१ ) क प्रमाणे दुरूस्ती नुसार होणारी वार्षीक मागणी ३६६६ इतकी होत आहे.तरी मा.साहेब जागेला कलम १३२ (१ ) क प्रमाणे कर आकारणी करणेस मंजूरी मिळावी

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील निर्देशीत केलेले तरतुदी नुसार कलम १३२ (१ ) क प्रमाणे नुसार दुरूस्ती करण्यास तसेच सदरचे नोंदी परिशिष्ट अ रिव्हीजन रजिष्टर व संगणकावर घेणेस तसेच सदरची दुरूस्ती सन २००३-२००४ पासुन करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर कर निरीक्षक याचा अभिप्राय की,वॉर्ड क्र.८बिल क्र१५५ जिल्हा महिला शिक्षण मंडळ ,महाजन गल्ली अ.नगर यांचे नांवे वसुली अभिलेखा मिळकत नोंद असुन अर्जदार यांनी महानगरपालिकेकडे दाखल केलेल्या

अर्जा सोबत सहा.धर्मदाय आयुक्त यांचे कडील नोंदणीचे प्रमाणपत्र २९/०५/८५ दाखल केलेले आहे.सोसायटी रजिष्टर सर्टिफिकेट १ ते १२ जोडून देण्यात आलेले असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम . १३२ (१ ) क तरतुदी नुसार तसेच अर्जदार यांनी अर्जात शास्ती माफि बाबत नमुद केले प्रमाणे प्रकरण ८ कराधान नियम कलम ५१ शास्ती फि किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल.

आयुक्तास आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फि किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल या प्रकारे तरतुद असून अर्जदार यांचे दाखल अर्ज व दस्तऐवज व स्थळ पहाणीनुसार अहवाल सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.२ यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार दुरूस्तीस मान्यतेस्तव सादर.

यावर सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक अधिकारी याचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सदर शाळा ही विना मोबदला शैक्षणिक कार्य करीत आहे.असे दिसते उक्त अधिनियमानुसार सदर शाळा सार्वजनिक ,सामाजिक कार्य करत असल्याने सर्व साधारण कर,रस्ता कर व शिक्षण करात सुट देणेस पात्र आहे.सुट देणेत येणा-या रकमेवर होणारे २ टक्के शास्तीची आकारणी त्या प्रमाणात कमी करता येईल उर्वरित शिल्लक रकमेचा भरणा करून घेणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,

१.अर्जदाराला घरपट्टीचे बिल कोणत्या वर्षापासुन दिले सुरू केले आहे.(थकबाकी कोणत्या वर्षा पासुन आहे.)

२.अधिनियमातील तरतुदी अवलोकनार्थ ठेवून चर्चा करावी.

३.२०१८ मध्ये अर्जदाराने अर्ज केला आहे हयापूर्वी अर्जदाराने अर्ज केले आहेत

४.२०१८-१९ सालीच एकुण कराचे बिल थकबाकीसहित पाठविले आहे किवा कसे.

यावर करनिरीक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर,दि.१७/५/१९ रोजी दिलेल्या शेरांकनानुसार मद्दे क्र १ ते ४ ची माहिती खालील प्रमाणे.

१.अर्जदार यांना नविन बांधकाम केल्यापासुन कर आकारणी बिले देण्यात येतात.सन २०१९ -२० कराचे थकबाकी पहाता २००१-२००२ पासुन बिले देण्यात येतात.तसेच थकबाकी पडताळणी केली असता सन २००१-२००२ पासुन असल्याचे आढळून येते.

२.अधिनियमातील तरतुदीबाबत छायांकीत प्रत सोबत जोडत आहे.

३.इकडील कार्यालयाकडील पडताळणी केली असता यापुर्वी अर्जदाराने अर्ज केलेबाबत आढळून येत आहे.२३/०९/०३ रोजीचा अर्ज.

४.अर्जदार यांना दर आर्थीक वर्ष थकबाकी सह कराची बिले बजावण्यात आलेली आहेत.

सबब फेरसादर सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,कर निर्धारण व मुल्य निर्धारण अधिकारी यांचे मार्फत सादर करावे.तत्पुर्वी टि -१ वर अ मध्ये सुट केलेनुसार आकारणी ज्यावेळी प्रथम दिले असलेल्या तारखेपासुन २००१-२ पासून उपरोक्त अ मध्ये उल्लेख केलेनुसार केली तर आकारणी बिल एकुण किती रकमेचे होते व पुर्वीच्या बिलामधून सदरची आकारणी रक्कम कमी करून (यापुर्वी भरलेली रक्कम धरून) उर्वरित शिल्लक राहणारी व निर्लेखित करावयाची रक्कम किती होते हे सादर करावे.

यावर वसुली लिपीक यांचा अभिप्राय की,फेरसादर,प्रस्तुत प्रकरणी मा.उपायुकत (कर) यांचे दि.३१/८/१९ चे शेरांकनानुसार वॉ.क्र.८ बिल क्र.१५५ अ.नगर जिल्हा महिला विकास महामंडळ या मालमत्तेवर सन २०१९-२० अखेर थकबाकी रू.२३७८८०/- असुन कलम १३२ (१ ) क प्रमाणे दुरूस्ती नुसार सन २००३-०४ पासुन आज

अखेर एकुण डिमांड ५५७२०/- इतकी होत आहे.सोबत पान क्र.४ वर तक्ता जोडत आहे.सदर मिळकत धारकाने २०/०३/०४ पासुनल आज अखेर ६६८२९/- रूपये झालेली आहे.पान क्र.५ वर तक्ता जोडलेला आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार राहिलेली रक्कम २३७८८०/- निर्लेखित करणे कामी येते सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार दूरूस्तीस व निर्लेखित करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक अधिकारी याचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार टि.२ वर सन २०११ -०२ केल्याचा तक्ता सादर केलेला आहे.त्याची रक्कम सन २००१ ते २०२० अखेर १५०३४१/- इतकी होते.त्यातुन रू.६६८२९/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे.रू.८३५१२/- इतकी रक्कम त्यावरील शास्ती १६७२८५/- अशी २५०७९७/-इतकी उर्वरित रक्कम आहे.ती कमी होणारी रक्कम असल्याने स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करावी लागणार आहे.त्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,रक्कम परिगणनेबाबत कर निर्णारक व संग्रहक यांनी चर्चा करावी.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,परिशिष्ट अ वर सदर मालमत्तेचा वापर शोरूम दुकान व ऑफिस असा आहे तरी पहाणी करावी.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी दिनांक ७/११/२०२० चे शेरांकनानुसार दिनांक २/१२/२०२० रोजी जागेची समक्ष पाहणी केल असता सदयस्थितीतील परिस्थिती खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| तळघर क्षेत्र आर.सी.सी. २०.९१ चौ.मी. | वापर कार्यालयीन अडगळीचे सामान अहमदनगर |
| त.म. क्षेत्र आर.सी.सी.२१.७३ चौ.मी. | जिल्हा महिला मंडळ संचलित विविध व्यवसाय प्रशिक्षण केंद्र कार्यालय |
| प.म. क्षेत्र आर.सी.सी. १७.६३चौ.मी. | विविध व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यामधुन तयार केलेल्या कपडयांची ना नफा ना तोटा तत्वावर विक्री केंद्र |
| दु.म. क्षेत्र आर.सी.सी.०८.६१ चौ.मी. | मोफत शिवन वर्ग -योगासन केंद्र व महिला बाल संस्कार वर्ग |

सोबत उक्त मिळकतीचे फोटो जोडणेत आलेले आहे.येणे प्रमाणे पाहणी अहवाल सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,फेरसादर नुसार स्थायी समिती मान्यतेस्तव निर्लेखीत कराची रक्कम व शास्ती २०-२१ अखेर किती आहे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्रा की,प्रस्तुत प्रकरणी दिनांक ४/१२/२०२० शेरांकनानुसार सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील डिसेंबर २०२० संगणकीय नोंदी वरून अर्जदार मालमत्ता धाकर यांचे मिळकतीवर खालील प्रमाणे थकबाकी रक्कम तपशील

सन २०२०/२०२१ अखेर एकुण रक्कम -२६७७८७/-

सन २०२०/२०२१ अखेर वसुलपात्र रक्कम रु ०

सन २०२०/२०२१ अखेर निर्लेखित करावयाची रक्कम - ९३,७७७/-

शास्तीची रक्कम रु १७४०१०/-

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,निर्लेखित रक्कम फेरसादर नुसार मा.स्थायी समितीच्या आदेशार्थ सादर शास्ती निर्णय मा.आयुक्त यांचे निर्णयार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, चर्चा करा.

यावर सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक अधिकारी याचा अभिप्राय की, सादर,प्रस्तुत प्रकरणातील जिल्हा महिला विकास मंडळ अ.नगर,हि संस्था धर्मदाय संस्थेकडे नोंदणी केलेली आहे.सदर संस्थेने स्वतःची नियमावली केलेली आहे.त्यानुसार ते गोरगरीब गरजु पिडीत महिलांना शिवण कामात मोफत प्रशिक्षण देवून त्यांचे उदर निर्वाहचे साधन निर्माण करून देण्याचे काम करत आहे.त्यामुळे हि संस्था महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १३२ (१ ) क नुसार इमारत केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणा-या व व्यापारासाठी किंवा फायदा मिळविण्यासाठी वापरण्यात येत नसल्याने सार्वसाधारण कर ,१४८ क नुसार रस्ताकर व महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी कायदा १९६२ नुसार शिक्षण करात सुट देणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,मान्य

यावर वसुली लिपीक,कर निरीक्षक,सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी दि.४/१२/२०२० चे शेंरांकनानुसार सन २०२१/२०२२ या आर्थिक वर्षातील डिसेंबर २०२१ संगणकीय नोंदीवरून अर्जदार मालमत्ताधारक यांचे मिळकतीवर खालील प्रमाणे थकबाकी रक्कम तपशील.

सन २०२०-२०२१ अखेर एकुण रक्कम -२५४५१४/-

सन २०२०-२०२१ अखेर वसुलपात्र रक्कम -०

सन २०२०-२०२१ अखेर निर्लेखित करावयाची रक्कम -८३८६८/-

शास्तीची रक्कम - १७०६४६/-

यावर सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक अधिकारी याचा अभिप्राय की, सदरची संस्था हि सार्वजनीक प्रयोजनासाठी काम करत असल्याने सन २००३ पासुन २०२१ पर्यत सदर संस्थेने रू.६८८२९/- चा भरणा केलेला आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कमल १५२ नुसार रूपये ८३८६८/- ची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविणे योग्य होईल.

तसेच सदर बिलावर आजपर्यत १७०६४६/- इतकी शास्ती असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम१९४९ मधिल प्रकरण -८ कराधान नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांना स्वेच्छा निर्णयानुसार वसुलीचा खर्च पुर्ण किंवा अंशतः माफ करता येईल अशी तरतुद आहे.

तरी शास्ती माफी व तद्नंतर सदरची रक्कम निर्लेखित करणे साठी मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य होईल.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,स्थायी समिती पुढे सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय घेवून फेरसादर करावे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की,मनपा अधिनियम १९४९ मधील कलम १५२ प्रमाणे निर्लेखित करणे कामी मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविणे तसेच शास्ती बाबत अनुसुची ड प्रकरण -८ मधिल नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांच्या स्तरावर कार्यवाहीस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय क्रमांक १५५ ते १७१ सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.समद खान :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून हे सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार अहमदनगर जिल्हा महिला विकास मंडळ, सचिव अहमदनगर यांनी प्रभाग समिती क्र. २ वॉर्ड क्र.८ जुना मालमत्ता बील क्र.८/१५५ मा.क्र.Z२८०८१९५४ या मिळकतीवरील जागेचा वापर महिला सामाजिक आर्थिक आरोग्य व शैक्षणिक विकास करीता व्यवसाय प्रशिक्षण वर्ग विनामुल्य मोफत समाज कार्य केले जाते.सदर जागेमध्ये कुठलाही व्यावसायीक वापर होत नसल्याने संपुर्ण जागेचा वापर सामाजिक कामासाठी होत असल्याने ऑफिस रिपोर्ट नुसर कलम १३२ (१ ) क प्रमाणे कर आकारणी करणेस व जादा आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १७१ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका वॉर्ड क्र. ३६ मध्ये मिळकतीच्या घरांच्या नोंदी मालमत्ता कर आकारणी साठी घेण्यात आल्या त्यात काही त्याच मिळकतीच्या नोंदी खुला भुखंड (मोकळी जागा) म्हणुन घेण्यात आल्या त्यामुळे एकच मालमत्तेची घरपट्टी व प्लॉटपट्टीच्या नोंदी दुबार झाल्या आहोत. एकाच मालमत्तेची दुबार झालेली नोंद कमी करून त्यावरील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका केडगाव उपकार्यालय प्रभाग समिती क्र.४

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्र. ३६ मध्ये सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात अहमदनगर महानगरपालिकेने मालमत्ता कर आकारणी साठी संपुर्ण अहमदनगर शहरातील मिळकतीचे रिव्हीजन सर्व्हे केला होता. त्यावेळी संबंधीत रिव्हीजन ऑफिसर / असि, रिव्हीजन ऑफिसर यांनी अस्तित्वात असणा-या घरांच्या नोंदी मालमत्ता कर आकारणी साठी घेतल्या होत्या, याच बरोबर रिव्हीजन सर्व्हे मध्ये खुल्या भुखंडाच्या नोंदी (मोकळी प्लॉट ) गाव पातळी वरील तलाठी कार्यालय येथुन मिळकतीचे सर्व्हे नंबर व प्लॉट नंबर यांची कागदोपत्री माहिती संकलीत करून खुल्या भुखंडाच्या देखील नोंदी घेण्यात आल्या परंतु यामध्ये ज्या मिळकतीच्या नोंदी खुल्या भुखंड मोकळी जागा म्हणून घेण्यात आल्या, यामुळे एकाच मालमत्तेची घरपट्टी व प्लॉटपट्टीच्या नोंदी अशा दुबार नोंदी झालेल्या आहेत.

वास्तविक पहाता या मालमत्तेवर तत्कालीन ग्रामपंचायतीपासुन घरपट्टीच्या नोंदी होत्या परंतु खुल्या भुखंडाच्या नोंदी घेता वेळी त्यावर इमारत बांधकाम आहे की नाही याची खातरजमा नकरता खुल्या भुखंडाची नोंदी काही अशी घेण्यात आल्या त्यामुळे दुबार झालेल्या नोंदीची प्लॉट पटटी ही वसुल न होणारी असण्याने व चुकीने आकारणी झालेल्या प्लॉट पटटीच्या नोंदी रद्द कराच्या लागतील यांचा तपशिल सोबत जोडलेल्या दुबार नोंदीची यादी त्यामध्ये दर्शविलेल्या दुबार नोंदी व त्यावर अदयापपर्यत असणारी मालमत्ता कर आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम अन्वये प्रकरण ८ कराधान नियम २०(१) (फ) नुसार दुरूस्ती करणेस किंवा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेस व तसेच प्रस्ताव मंजुरीप्रमाणे परिशिष्ट अ व रिव्हीजन रजिस्टर, व संगणकांस घेणेस मंजुरी मिळणे बाबत सदरचा रिपोर्ट सविनय आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे वसुली लिपिक , विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, विभाग प्रमुख , वसुली लिपिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सोबत जोडलेल्या यादीनुसार दुबार झालेल्या नोंदी महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील कराधान प्रकरण ८ नियम २० (१) (फ) नुसार दुरूस्ती व नियम १५२ नुसार रक्कम रूपये ३६९६६४/- वसुल न होणारी असल्याने सदर रक्कम निर्लेखित करणे कामी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा. सहा. मुल्य निर्धारक तथा कर संग्राहक यांची अभिप्राय की, दुबार झालेली १७ बीलावरील शास्तीची रक्कम महाराष्ट्र मनपा अधि. मधील प्रकरण-८ कराधान नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांना माफ करता अधिनियमातील कलम १५२ नुसार निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सादर./अ

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- विषय क्रमांक १५५ ते १७१ सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.समद खान :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १५५ ते १७१ हे सर्व विषय घरपट्टी -पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून हे सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका वॉर्ड क्र. ३६ मध्ये मिळकतीच्या घरांच्या नोंदी मालमत्ता कर आकारणी साठी घेण्यात आल्या त्यात काही त्याच मिळकतीच्या नोंदी खुला भुखंड (मोकळी जागा) म्हणुन घेण्यात आल्या त्यामुळे एकच मालमत्तेची घरपटटी व प्लॉटपटटीच्या नोंदी दुबार झाल्या आहोत. एकाच मालमत्तेची दुबार झालेली नोंद कमी करून त्यावरील रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १७२ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक स.नं.४६/१ पैकी या जागेमधील जिर्ण व पडीक झालेली व्यायाम शाळा पाडणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग

संदर्भ- १. मा.उपमहापौर श्री. गणेश पुंडलिक भोसले यांची दि.२१/१०/२०२१ रोजीचे पत्र
२. पंचनामा दिनांक २०/११/२०१९
३. मा.महासभा सभा क्र.०१ प्रस्ताव क्र.०१ दिनांक २५/६/२०२१

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर की, मा. उपमहापौर यांचे संदर्भिय पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील चाहुराणा बुद्रुक स.नं.४६/१ पैकी या ठिकाणी अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीची गेल्या ४० वर्षापुर्वीची जुनी व्यायामशाळा आहे. सदरील व्यायामाशाळेमध्ये या परिसरातील तरूण मुले व्यायाम करण्यासाठी नियमितपणे येत होते. सदरील व्यायामशाळेची मोठया प्रमाणात दुरावास्था झालेली असून सदरील ठिकाणची परिस्थिती पहाता सदरील इमारत ही धोकादायक झालेली आहे. ही वास्तू पडीक व जीर्ण झाल्याने अचानकपणे सदरील इमारत कोसळून दुर्घटना घडण्याच्या शक्यतेमुळे याठिकाणी ब-याच वर्षापासून व्यायामाकरीता वापर होत नाही. त्यामुळे या जागेचा गैरवापर होत असल्याने सदरील इमारत पाडणे आवश्यक आहे.

दि.२०/११/२०१९ रोजी मा. शहर अभियंता समवेत समक्ष पाहणी केली असता अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्र.४ कार्यालयाच्या मागील मोकळया पटांगणामध्ये चौरसाकृती जुनी दोन मजली आर.सी.सी.प्रकारातील इमारत मुख्य दरवाजा दक्षिण दिशेस असलेली व आसपास मोठया प्रमाणात झुडपे वाढलेल्या अवस्थेत आहे. सदर इमारतीचे आयुष्यमान सुमारे ४५ ते ५० वर्ष असून तळमजल्यामध्ये व्यायामासाठीचा कुस्तीचा हौद आहे. भिंतीला मोठे तडे गेलेले असून बाल्कनी केलेली आहे. दरवाजे, खिडक्या कोणताच अवशेष आढळुन आला नाही. प्रथम मजल्याचे स्लॅबचे स्टील खालील बाजुने उघडे पडलेले आहे व स्लॅब मध्यामध्ये झुकलेला आहे. बाहेरील भिंतीमध्ये झाडे उगलेले असून भिंतीमध्ये ओलावा असून प्लॅस्टर ब-यापैकी निघालेले आहे. भिंत व कॉलम एकमेकांपासून वेगळे होवून मोठे तडे गेलेले आहेत. तळमजल्याची व बाल्कानीची शहाबाद फरशी संपुर्ण निखळलेली असून अस्तावस्त झालेली आहे.इमारतीचे आसपासची जमीन वर आल्याने इमारत ब-यापैकी खाली गेलेली आहे. सदर इमारतीचे बांधकाम जिर्ण झाल्याने इमारत धोकादायक झालेले असून मोडकळीस आलेली असून केव्हाही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मा.महासभा सभा क्र.०१ प्रस्ताव क्र.०१ दि.२५/६/२०२१ अन्वये नगरसेवक मा.श्री.गणेश भोसले यांनी सुचित केलेनुसार शाहू व्यायामशाळा पाडून त्याठिक्‍णी महिला जीम किंवा उदयान करणेकामीचा प्रस्ताव तयार करून यासाठी येणार खर्च नवीन इमारत या लेखाशिर्षकामधून करण्यात यावा असा ठराव पारित झालेली आहे.

बांधकाम विभागाकडे धोकादायक इमारतीचे बांधकाम पाडणेकामी यंत्रासामुग्री उपलब्ध नसल्याने बांधकाम विभागाकडून निविदा काढून बाहययंत्रणेमार्फत काम करणे उचित होईल. मटेरिअल उचलणे व वाहतूक करून सुरक्षित स्थळी नेवून टाकणे इत्यादी कामे करून घ्यावी लागणार आहेत. बाहय यंत्रणेकडून काम करून घ्यावयाचे झाल्यास धोकादायक इमारतीपासून काही नुकसान किंवा धोका निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहिल अशी अट नमूद करणे गरजेचे आहे. सदरचे काम तांत्रिक दृष्टया अडचणीचे

असल्याने कुशल कामगारांकडून करून घेणे योग्य. सदर धोकादायक इमारत पाडणेकामी बांधकाम विभागाकडे दरसुची उपलब्ध नसल्याने जाहिर निवेदन देवून तुलनात्मक दृष्टया दराचा लाभ घेणेसाठी जाहिर निविदा मागविणे योग्य.

तरी सदरचे जाहिर निवेदन अहमदनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस व नागरिकांना व ठेकेदारांस माहिती होण्यासाठह एका स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निवेदन प्रसिध्दी देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर तसेच प्रथम निर्लेखनासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेवून इमारत पाडणेची कार्यवाही करणे योग्य तथापी आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर./अ

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरील अहवालानुसार सदर इमारत निर्लेखन करण्यासाठी प्रथम मा.स्थायी समितीकडेस सादर करणे व तदनंतर वरील "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही. तथापी आदेशार्थ सादर./ब

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" व "ब" प्रमाणे मा.स्थायी समिती समोर सादर करण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक स.नं.४६/१ पैकी या जागेमधील जिर्ण व पडीक झालेली व्यायाम शाळा पाडणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक स.नं.४६/१ पैकी या जागेमधील जिर्ण व पडीक झालेली व्यायाम शाळा इमारत पाडणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक स.नं.४६/१ पैकी या जागेमधील अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीची ४० वर्षापुर्वीची जुनी, जिर्ण व पडीक होवून दुरावस्था झालेली व्यायाम शाळा निर्लेखन करणेस व इमारत पाडणेची कार्यवाही करण्यातस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १७३ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिकेच्या माणिक चौक येथील श्री.घनशाम सखाराम घोलप यांना अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या पे & पार्कच्या करारनाम्याची मुदत संपल्याने त्यांना मुदतवाढ बाढवून मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

संदर्भ- श्री. घनशाम सखाराम घोलप यांचा दि.७/७/२०२१ रोजीचा अर्ज

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, माणिक चौक येथील पे & पार्ककरिता तीन वर्षाच्या मुदतीकरिता श्री. घनशाम सखाराम घोलप यांना मा.महासभा ठराव क्र.२२ दि.१४/९/२०१७ अन्वये देण्यात आली होती. सदरील पे & पार्कची मुदत दि.१८/८/२०२१ रोजी संपत आहे. त्या अनुषंगाने करारनाम्याची मुदत वाढवून मिळणेबाबत श्री. घनशाम सखाराम घोलप यांनी दि. ७/७/२०२१ रोजीचा अर्ज देउन कराराची मुदत दि.१८/८/२०२१ रोजी संपत आहे मला पे & पार्कची पाच वर्षेकरिता मुदत वाढवुन मिळावी नियमानुसार जे भाडे मनपा आकारेल तसेच मुदतवाढीच्या अटी व शर्ती मला मान्य राहील असा विनंती अर्ज इकडेस प्राप्त झाला आहे.

अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या माणिक चौक येथील पे & पार्कचा ठेका तीन वर्षेकरीता श्री. घनशाम सखाराम घोलप यांस वार्षिक १०% भाडे वाढीनुसार देण्यात आला होता सदर कराराची मुदत दि.१८/८/२०२१ रोजी संपली असुन श्री. घोलप यांनी दि.१८/८/२०२१ अखेर पे & पार्कचे भाडे अदा केले आहे.

तरी माणिक चौक येथील पे & पार्कचे मुदतीपुवी्रचे दरमहा भाडे रू.७२६०/- इतके असुन त्यामध्ये १०% वाढ करून म्हणजेच दरमहा भाडे रू.७९८६/- घेउन दर वर्षी वार्षिक १०% भाडे वाढीनुसार नेहमीच्या अटी व शर्ती नुसार दि.१८/८/२०२१ पासून श्री. घनशाम सखाराम घोलप यांस पे & पार्कला मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र. मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्ताव उशिरा का सादर केला ? मुदतवाढ देणेची ताकद कशात आहे सविस्तर प्रस्ताव सादर करणे

यावर प्र.मार्केट विभाग प्रमुख यांची अभिप्राय की, फेरसादर, उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट फेरसादर येतो की, या विभागाकडील इतर कार्यालयीन कामकाजमुळे तसेच या विभागाकडील पुर्वीचे प्र. विभाग प्रमुख हे रजा घेवुन सेवानिवृत्त झाले असल्याने सदरचा प्रस्ताव सादर करण्यास उशीर झाला आहे. परंतु कराराची मुदत संपली असली तरी श्री. घनशाम सखाराम घोलप यांनी सदर पे & पार्कचा इकडेस ताबा न देता मुदतवाढीबाबत दि.७/७/२०२१ रोजी अर्ज दिलेला आहे. त्यामुळे पुर्वीच्या भाडयामध्ये १०% वाढ करून भाडे आकारणी करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अ नुसार महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता, एकावेळी जास्तीत जास्त बारा महिन्याच्या कालावधीसाठी पटटयाने देता येईल अशी तरतुद आहे. तरी माणिक चौक येथील पे & पार्कचे मुदतीपुर्वीचे दरमहा भाडे रू.७२६०/- इतके असुन त्यामध्ये १०% वाढ करून म्हणजेच दरमहा भाडे रू.७९८६/- घेउन दर वर्षी वार्षिक १०% भाडे वाढीनुसार नेहमीच्या अटी व शर्ती नुसार दि.१८/८/२०२१ पासून श्री. घनशाम सखाराम घोलप यांस पे & पार्कला मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या माणिक चौक येथील श्री.घनशाम सखाराम घोलप यांना अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या पे & पार्कच्या करारनाम्याची मुदत संपल्याने त्यांना मुदतवाढ बाढवून मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या माणिक चौक येथील श्री.घनशाम सखाराम घोलप यांना अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या पे & पार्कच्या करारनाम्याची मुदत संपल्याने त्यांना मुदतवाढ देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे माणिक चौक येथील पे & पार्कचे मुदतीपुर्वीच्या दरमहा भाडेपट्टया मध्ये १०% वाढ करून दर वर्षी वार्षिक १०% भाडे वाढीनुसार अटी व शर्ती नुसार दि.१८/८/२०२१ पासून श्री. घनशाम सखाराम घोलप यांस माणिक चौक येथील पे & पार्कच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १७४ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता खरेदी करण्यात आलेल्या TATA LPT,1918, B.S.6. या चेसिजवर बांधणी करणेबाबत येणा-या खर्चाच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभाग

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता खरेदी करण्यात आलेल्या अग्निशमन वाहनासाठी TATA LPT १९१८ या चेसीज वर बांधणी करणेकरीता GEM पोर्टल वर बीड नं.GEM/२०२१/B/१/१४८९३०२ दि.०३/०९/२०२१ अन्वये प्रसिध्द केले असता मुदतीत

१] श्री गुरूप्रसाद फायर सर्व्हीसेस, सोलापूर

२] साई अग्रो इम्प्लिमेंट , कोल्हापूर

३] प्रगती स्टील फॅब्रीकेशन ॲण्ड फायबर, सोलापूर

याप्रमाणे एकुण तीन निविदा दर पत्रके प्राप्त झालेले असुन उपरोक्त ग्राहय निविदाकारांचे दराचे लिफाफे उघडण्यात आलेले असून TATA LPT १९१८ या चेसीज वर अग्निशमन वाहन बांधणीकामी खालील तक्त्यात कॉलम पाच मध्ये नमूद केल्याप्रमाणे लघुत्तम किंमत प्राप्त झालेली आहे.

**लघुत्तम किंमतधारक निविदाधारकाचे नाव- श्री गुरूप्रसाद फायर सर्व्हीसेस, सोलापूर**

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | परिमाण | बीड क्र.. | GEM पोर्टल वरील प्राप्त एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | TATA LPT १९१८ या चेसीज वर अग्निशमन साधन सामुग्री बांधणीकरणे बाबत | १ | GEM/२०२१/B/१/१४८९३०२ दि.०३/०९/२०२१ | रक्कम रूपये ६९,५०,५७८/- |
| | | | एकुण रक्कम | ६९,५०,५७८/- |

वरील तक्त्या मधील कॉलम क्र.२ करीता कॉलम क्र.३ नुसार एका चेसिजवर कॉलम क्र.५ मध्ये नमूद GEM पोर्टल वरून लघुत्तम किंमतीत सदर वाहन बांधणीस रक्कम रूपये ६९,५०,५७८/- इतका खर्च येईल.

मा. महाराष्ट्र शासन उदयोग ,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण ३ २०१६/प्र.क्र.२१५/उदयोग-४ दि.२४/८/२०१७ अन्वये केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GEM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबतच्या शासन निर्णयातील अ.नं ५ खेरदीदार विभागास गव्हर्नमेंट ई- मार्केटप्लस (GEM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांची रू. ३ लाख व त्यावरील खरेदी सदर पोर्टरवरील पुरवठादारांकडून वस्तू व सेवांची गुणवत्ता, विनिर्देश आणि पुरवठा कालावधी इ. आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदाद्वारे (Online bilding) किंवा रिव्हर्स ऑकशन पध्दतीने खरेदी करण्यात यावी अशी तरतुद असून त्याप्रमाणे खरेदी प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

प्रसिध्द करण्यात आलेल्या बीडींग मध्ये दिलेल्या सर्व अटी व शर्ती प्रमाणे निविदाकार श्री. गुरूप्रसाद फायर सर्व्हीसेस, सोलापूर अग्निशमन वाहन बांधणी नतर सदर वाहनाचा ऑनसाईट वार्षिक देखभाल दुरूस्ती एका वर्षाकरीता वॉरंटी कालावधी करीता विनामुल्य करणार असून त्याबाबत त्यांनी मान्य केलेले आहे.सबब मा. केंद्र शासनाने विकसीत केलेल्या गव्हर्नमेंट ई- मार्केटप्लस (GEM) पोर्टलवरील प्राप्त लघुत्तम दरामध्ये

TATA LPT १९१८ या चेसीज वर अग्निशमन वाहन बांधणी करीता येणा-या रक्कम रूपये ६९,५०,५७८/- (अक्षरी रक्कम रूपये एकोणसत्तर लक्ष पन्नास हजार पाचशे अठठयात्तर फक्त) खर्चास मंजुरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर करणेस मंजुरी मिळावी ही विनंती./अ

अंदाजपत्रकीय तरतुद-२०२१-२०२२

लेखाशिर्ष- सार्वजनिक सुरक्षिता

नवीन वाहन खरेदी

अंदाजपत्रकीय तरतुद- रक्कम रू. १ कोटी ५ लक्ष

आतापर्यत झालेला खर्च- निरंक

प्रस्तावीत खर्च- रू.६९,५०,५७८/-

उपलब्ध निधी- रक्कम रू.१ कोटी ५ लक्ष

येणेप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, लेखा शाखे करून तपासणी ---

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांची अभिप्राय की, मुलेअ यांचे अभिप्राय घेवुन फेरसादर करावे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत नुसार सन २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार रक्कम रूपये १ कोटी ५ लक्ष "नवीन अग्निशमन वाहन खरेदी " लेखाशिर्षावर तरतुद करण्यात आलेले असुन या लेखाशिर्षामधुन 'महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान' या नवीन लेखाशिर्षावर रू.६१,२०,०००/- इतकी तरतुद वर्ग करणे बाबत मा.स्थायी समिती सभा क्र.८ विषय क्र.११७ दि.२५/१०/२०२१ रोजीच्या सभे अन्वये मंजुरी प्राप्त झालेली असुन सदर रू. १ कोटी ५ लक्ष या रकमेमधुन रू.६१.२० लक्ष वजा जाता रूपये ४३,८०,०००/- इतकी रक्कम शिल्लक रहाते अग्निशमन वाहन बांधानीकरिता शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (जोईट पोर्टल) राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये लघुत्तम दर रू.६९,५०,५७८/- इतका प्राप्त झालेला असुन शिल्लक रू.४३,८०,०००/- रक्कम पाहता यामध्ये सन २०२१-२०२२ च्या सुधारित व सन २०२२-२०२३ च्या प्रस्तावीत अंदाजपत्रकामध्ये रू.२५,७०,५७८/- इतकी तरतुद करून लघुत्तम दरांबाबत प्राप्त झालेला रू.६९,५०,५७८/- इतका खर्च भागवावा लागेल. अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असुन अग्निशमन विभाग सुसज्ज असणे क्रमप्राप्त असल्याने प्रस्तावीत निविदेचे अटी व शर्ती चे अवलोकन करता सदर वाहन बांधणीस किमान तीन महिन्याचा कालावधी लागण्याचा शक्यता ग्रहित धरून सदर प्रस्तावास मान्यता देणेकामी व येणा-या खर्चास रक्कम रूपये ६९,५०,५७८/- मा.स्थायी समिती सभे पुढे सादर करणेस उचित व योग्य राहील.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की. विभागाने प्रसतावीत केल्याप्रमाणे तसेच मुलेअ यांचे अभिप्रायानुसार "अ" प्रमणे

यावर मुख्य अग्निशन अधिकारी यांची अभिप्राय की, फेरसादर, मा.आयुक्त यांचे दि.२५/१०/२०२१ चे शेरांकणानुसार मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेबाबत सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त(कर) यांची अभिप्राय की, मा.स्थायी समितीकडे सादर करणेस मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता खरेदी करण्यात आलेल्या TATA LPT,1918, B.S.6. या चेसिजवर बांधणी करणेबाबत येणा-या खर्चाच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ माहिती दया.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- घसारा निधीतुन आपण अग्निशमन वाहन चेसीज खरेदी केली होती.सध्या आपल्या अग्निशमन विभागाकडे दोन गाडया शिल्लक आहे.या गाडया १० वर्षा पुर्वीच्या आहेत.त्यामुळे या गाडया वारंवार नादुरूस्त होत आहेत.मागच्या वर्षी घसारा निधीतुन टाटा एल.पी.टी.वाहन खरेदी केले आहे.या वाहनावर बिल्टप करण्याकरीता आपण टेंडर काढले होते.जी.एम.पोर्टलवरून या मध्ये श्री. गुरूप्रसाद फायर सर्व्हीसेस, सोलापूर एजन्सी चे दर एल १ आहेत.यांचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव सादर करण्यात आलेला आहे.सदरचे वाहन आपल्याला तीन महिन्यामध्ये बांधून देणार आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- कोणत्या लेखाशीर्षकामधून खर्च करणार आहे.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- म.न.पा. फंडातून खर्च करणार आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- देयक देण्याच्या स्टेज ठेवल्या आहेत का?

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- पुर्ण काम झाल्यानंतर पेमेंट अदा करायचे आहे.रक्कम ५० लाखाच्या पुढे आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- म.न.पा.फंडातुन आपण पेमेंट करू शकतो का?म.न.पा.फंडातुन पेमेंट होण्याची शाश्वती नसल्याने काम होणे अवघड आहे.त्या करीता मा.उपायुक्त यांनी पेमेंट बाबत तजवीज करणे आवश्यक आहे.हा खुप महत्वाचा विषय आहे.

मा.सभापती साहेब :- नगर शहर झापाटयाने वाढत आहे.पुर्वीच्या गाडया १० वर्ष जुन्या झाल्या आहे.चार प्रभागाकरीता ४ गाडया घेणे आवश्यक आहे.सिव्हील हॉस्पीटल मध्ये दुर्घटना झालेली आहे.केव्हा कोठे र्दुघटना होईल हे सांगता येत नाही.हा अत्यंत गंभीर विषय आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- देवाच्या कृपेने कोणतीही र्दुघटना होवू नये. परंतु जर एखादी र्दुघटना घडलीतर त्यामधे होणा-या नुकसानी करीता आपण कोणावर जबाबदारी निश्चीत करणार.तुम्ही आश्वासन दया.तीन महिन्यात आम्ही पेमेंट अदा करू व गाडी ताब्यात घेवू.पेमेंट अभावी गाडी पडून राहिली नाही पाहिजे.

मा.सभापती साहेब :- एखादी मोठी घटना घडल्यास सर्वाची नाचक्की होणार आहे.

मा.शाम नळकांडे :- ब-याच दिवसांपासून प्रलंबीत असलेला विषय आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- तीन महिन्याचा कालावधी आहे.आपण त्याला वर्कऑर्डर देवू.आपण विषय मंजूर करावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- चार झोन करीता चार गाडया घ्या.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव करा चार झोन करीता चार गाडयांचा.नगरशहर झपाटयाने मोठे होत आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- १४ व्या वित्त आयोगातून घेता येत असेल तर पहा.

मा.सभापती साहेब :- घरपट्टी मध्ये अग्निशमन कर लावून येणारा निधी फक्त अग्निशमन विभगाकरीता वापरण्यात यावा.बजेट मध्ये हा विषय घ्या.

मा.श्री.मनोज कोतकर :- कर्मचारी भरती बाबत काय झाले.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- आउटसोर्सीगने कर्मचारी भरती करीता टेंडर काढण्यात आले होते.परंतु त्यास प्रतिसाद मिळालेला नाही.परत आपण त्यास मुदत वाढ देणार आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- आपण दर वेळी तेच करतो.मानधनावर आपल्याला घेता येत नाही का?आपण आरोग्य विभागा मध्ये व इतर विभागमध्ये मानधनावर घेतो.मग या विभागामध्ये का घेता येणार नाही.

मा.सभापती साहेब :- फायर ब्रिगेड मध्ये प्रशिक्षीत कर्मचारी,मानधनावर प्रशिक्षीत कार्मचारी येण्यास तयार आहे.आपण त्यांना घेत नाही.आउटसोर्सीगच्या निवीदेस प्रतिसाद मिळत नाही.यावर काहीतरी मार्ग निघाला पाहिजे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- अग्निशमन विभाग हा आपल्कालीन विभाग असून या कडे प्रशासन गांभीर्याने पहाण्यास तयार नाही.प्रत्येक सभेमध्ये हा विषय होतो. आपण दुर्घटना होण्याची वाट पहातो आहे का?आपल्या अग्निशमन विभागाशेजारी महानगरपालिकेची वास्तु जळुन खाक झाली ती आपण वाचवू शकलो नाही.ही अत्यावश्यक बाब आहे.आपण इतर विभागामध्ये मानधनावर कर्मचारी घेतो.

मा.सभापती साहेब :- निधी कोणता आहे.पैशाची शाश्वती नसल्याने कोणी टेंडर भरत नाही.

मा.श्री.मनोज कोतकर :- आपण प्रत्येक सभेमध्ये हा विषय घेतो.मागच्या सभेमध्ये आपण ठरविले होते की,गाडयांकरीता मा.शासनाकडे पाठपुरावा करायचा.काय झाले त्याचे?

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- फायर ब्रिगेड सारख्या अति संवेदनशिल विभागामध्ये मानधनावर कर्मचारी भरती करता येत नाही असा काही जी.आर.आहे का शासनाचा.

मा.श्री.मनोज कोतकर :- मागे काहीही झालेले नाही,या कामाकरीता एखादा अधिकारी नियुक्त करा.सदस्यांनी सभेमध्ये बोलायचे ,प्रश्न मांडायचे व निघून जायचे. अधिका-यांनी फक्त ऐकायचे व सोडून दयायचे.नगरसेवक हा सांगकाम्या झाला आहे.नागरीक नगरसेवकांना सांगतात,नगरसेवक पालिकेमध्ये येवून अधिका-यांना सांगतात.अधिका-यांनी सांगायचे चालू आहे.होत आहे,होईल.अहो पण कधी होईल.याला काही वेळ ,मर्यादा काही आहेत की नाही?नागरीक नगरसेवकांना रोज बोलतात.आमची सुध्दा इच्छा आहे की, आमच्या प्रभागामध्ये काही तरी कामे झाली पाहीजे.या करीता आम्ही बोलतो.परंतु प्रत्येक सभेमध्ये विषय होते.मागील वेळी एक समिती नेमण्यात आली होती.महानगरपालिकेमध्ये जे भंगार सामान पडले आहे.ते सर्व लिलाव करून त्यामधून गाडी घेण्यात यावी.काय झाले त्याचे.या करीता समिती नेमली होती.

मा.सभापती साहेब :- किती कर्मचा-यांचे आउटसोर्सीग व्दारे भरण्याचे टेंडर काढले होते.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- वीस कर्मचा-यांचे टेंडर काढले होते.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- संचालक अग्निशनम सेवा,आपण पत्रव्यवहार केला आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :- काय झाले गाडयांबाबतचे.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- आपण प्रस्ताव पाठविलेला आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :- तुम्ही प्रस्ताव पाठविला त्याची ओ.सी.आहे का तुमच्या कडे.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- हो,आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :- त्यावर तुम्ही काही पाठपुरावा केला का?

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- दोन वेळा त्यांना पत्र दिले आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :- या बाबत तुम्ही मा.आमदार,मा.महापौर,मा.सभापती यांच्या कडे भेटनू काही पाठपुरावा केला का?

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- प्रशासकिय पातळीवर पत्रव्यवहार केले आहेत.

मा.श्री.मनोज कोतकर :- तुम्ही फक्त पत्रव्यवहार करीत रहा.काम होणार कधी सर्व सदस्य या विषयावर पोटतीडकीने प्रश्न मांडत आहेत.मा.श्री.कुमार वाकळेंनी सुध्दा या विषयावर प्रश्न विचारले होते.कृती काहीच झालेली नाही.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- महाराष्ट्र सुरक्षा अधियान अंतर्गत आपल्याला अनुदान मिळत असते.वाहन खरेदी करीता आपल्याला अनुदान मिळत नाही.त्यामुळे ब-याच वेळा अडचणी येतात.

मा.श्री.मनोज कोतकर :- तुम्ही पदाधिका-यांकडे पाठपुरावा करा.त्यांच्या कडे जा.आपण एक गाडी घेवू शकत नाही का?मागणी करा,आपले प्रकरण या स्टेज वर आहे.तुम्ही या बाबतची फाईल घेवून मा.सभापती साहेब यांच्या कडे किती वेळा गेल आत्तापर्यत.आपल्याला गाडया घेण्याकरीता निधी उपलब्ध करून घेणे बाबत.त्यांना तरी काय कळणार आहे.तुम्ही काय काम करता.पुन्हा हा विषय सभेमध्ये आला नाही पाहिजे.ज्या पध्दतीने लाईट चा प्रश्न मार्गी लागला त्या पध्दतीने हा विषय सुध्दा मार्गी लागला पाहिजे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आउट सोर्सीग व्दारे निवीदेस प्रतीसात मिळत नसेल तर कोणत्या रोख निधीतुन यांना कर्मचारी उपलब्ध होतील याची माहिती घ्या.१४ ,१५व्या वित्त आयोगातुन निधी उपलब्ध होतो का ते पहा.प्रत्येक सदस्याची इच्छा आहे की,काही घटना घडू नये.त्यामध्ये जिवित हानी होवू नये.तुम्ही मा.आमदार साहेबांकडे किंवा जिल्हा नियोजन कडे पाठपुरवा करता येईल.संपुर्ण अदयावत माहिती घ्या.

मा.सभापती साहेब :- या विषयावर आपण मिटींगचे आयोजन करू.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.आवश्यक असलेला निधी तात्काळ उपलब्ध करणे बाबत कार्यवाही करण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.अत्यावश्यक सेवा असल्याने निधी बाबत कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता खरेदी करण्यात आलेल्या TATA LPT,1918, B.S.6. या चेसिजवर बांधणी करणेबाबत GEM पोर्टल वर बीड नं.GEM/२०२१/B/१/१४८९३०२ दि.०३/०९/२०२१ अन्वये स्पर्धात्कदृष्टया नमूद निविदाधारक श्री गुरूप्रसाद फायर सर्व्हीसेस, सोलापूर यांच्या सर्वात कमी दराच्या निविदेस व येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असुन अग्निशमन विभाग सुसज्ज असणे क्रमप्राप्त असल्याने सदर कामा करीता आवश्यक असलेला निधी तात्काळ उपलब्ध करण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १७५ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- ई- निविदा क्र.७२७२७९ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

विषय- ई-निविदा क्र.७२७२७९ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुर रोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजूने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती ठराव क्र. १२४ दि.२५/१०/२०२१ ची मान्यता

२. निविदा क्र. ई-निविदा क्र. ७२७२७९ सन २०२१-२०२२ (मनपाच्या संकेतस्थळावर दि.९/१०/२०२१)

३.निविदा विक्री कालावधी :- दि. ९/१०/२०२१ ते २०/१०/२०२१

४.निविदा स्विकारण्याची तारीख - दि. ९/१०/२०२१ ते २०/१०/२०२१

५.निविदा उघडणेचा तारीख - २२/१०/२०२१

६.कामाची मुदत - ०६ महिने

दिनांक २७/१०/२०२१ रोजी झालेल्या छाननी समितीने निविदा अटी व शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदारांच व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केली आहे.त्यानुसार सदरची निविदा दिनांक २९/१०/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे.प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| जाहिर ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम GST व्यतीरीक्त (सुधारीत अंदाजपत्रक ) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दरचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई निविदा क्र. ७२७२७९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुर रोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजूने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | १५७८९४७४ | मे.ए.पी. सोनीमंडलेचा ,अ.नगर | निविदा दरापेक्षा १५.००% जादा दराने | समीर शब्बीर शेख, अ.नगर , निविदा दरापेक्षा ५.३२% जादा दराने |
| | | | समीर शब्बीर शेख, अ.नगर | निविदा दरापेक्षा ५.३२ % जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५मध्ये नमुद निविदा धारक समीर शब्बीर शेख,अ.नगर यांची निविदा ५.३२% जादा दराने आलेली असुन ती अवाजवी वाटत असल्यामुळे संबंधीतांस इकडील सार्व. बांध. विभाग जा.क्र.१९९१ दि.२९/१०/२०२१अन्वये दराच्या वाटाघाटी याबाबत पत्र देउन विचारणा केली असता त्यांनी दि.१२/११/२०२१ रोजी इकडेस पत्र देउन **निविदा दराने** काम करणेस तयार आहे. परंतु प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी असे कळविले आहे.

सदरच्या कामास चालू दरसुचीचा वापर अंदाजपत्रक बनविताना केला असलेने तसेच ई-निविदा मधील अटी व शर्ती मधील अट क्र. २९ नुसार भाववाढ देता येणार नाही.

तरी सदर दर वाजवी वाटत असल्याने समीर शब्बीर शेख, अ.नगर यांनी कळविले नुसार निविदा दराने निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस सादर /क

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरील 'क' नुसार निविदा दराने निविदा मान्य करणेस हरकत नाही तथापी आदेशार्थ सादर. /ख

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार निविदा दराने निविदा मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सभेकडे सादर करणे बाबत कार्यवाहीस्तव सादर./ ड

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "क" "ख" व "ड" मधील अभिप्रायानुसार निविदा दराने निविदा मंजुरीसाठी मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर करणेस मान्येतस्तव.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- ई- निविदा क्र.७२७२७९ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १७५ ते १७८ या विषयांमधील कामे उपनगरातील नागरीकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे रस्ते असून या सर्व रस्त्याची खुप दुरावस्था झालेली आहे.मा.आ.संग्रामभैय्या जगताप यांच्या सुचनेनुसार सदरचे रस्ता होणे अत्यंत गरजेचे आहे.त्यामुळे ठेकेदाराने डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी ही मागणी रास्त असून त्यानुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार देयक अदा करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- विषय क्र. १७५ ते १७८ मधील सर्व कामांच्या निविदा रिकॉल केल्यास नव्याने येणा-या निविदा या डांबराच्या आजच्या वाढीव दरानुसार येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व फेर निविदा मागविल्यास निविदा प्रक्रियेमध्ये जाणा-या कालावधीचा विचार करता या सर्व निविदांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १७५ ते १७८ निविदेबाबत सर्व निविदा धारकांनी प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी असे कळविले आहे. यावर झालेल्या चर्चे नुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जो भाव कंपनी बीला प्रमाणे असेल त्याप्रमाणे GST सहीत दराचा फरक देण्यात येईल. सदर भाव हा प्रत्यक्ष बील करते वेळीच देण्यात यावा.तसेच जर प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जर कामामध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त काम झाले तर त्या कामास मान्यता देण्यात येत आहे.निविदा धारक समीर शब्बीर शेख,अ.नगर यांच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिका ई- निविदा क्र.७२७२७९ तारकपुररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत निविदा धारक समीर शब्बीर शेख,अ.नगर यांच्या निविदेबाबत प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार बीलावर असलेल्या GST सहीत जो दर असेल कमी अधिक त्याप्रमाणे भाव मिळावा असे कळविले आहे.यावर झालेल्या चर्चे नुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जो भाव कंपनी बीला प्रमाणे असेल त्याप्रमाणे GST सहीत दराचा फरक देण्यात येईल. सदर भाव हा प्रत्यक्ष बील करते वेळीच देण्यात यावा.तसेच जर प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जर कामामध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त काम झाले तर त्या कामास मान्यता देण्यात येत आहे.निविदा धारक समीर शब्बीर शेख,अ.नगर यांच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १७६ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- ई-निविदा क्र.७२७२६७ अहमदनगर महानगरपालिका पा.लाईन रोड हद्दीतील औ.बाद रोड ते नामदेव चौक श्रीराम चौक ते मनमाड रोड पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

विषय- ई-निविदा क्र.७२७२६७ अहमदनगर महानगरपालिका पाईप लाईन रोड हद्दीतील औरंगाबाद रोड ते नामदेव चौक श्रीराम चौक ते मनमाड रोड पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती ठराव क्र. १२६ दि.२५/१०/२०२१ ची मान्यता

२. निविदा क्र. ई-निविदा क्र. ७२७२६७ सन २०२१-२०२२ (मनपाच्या संकेतस्थळावर दि.९/१०/२०२१)

३.निविदा विक्री कालावधी :- दि. ९/१०/२०२१ ते २०/१०/२०२१

४.निविदा स्विकारण्याची तारीख - दि. ९/१०/२०२१ ते २०/१०/२०२१

५.निविदा उघडणेचा तारीख - २२/१०/२०२१

६.कामाची मुदत - ०६ महिने

दिनांक २७/१०/२०२१ रोजी झालेल्या छाननी समितीने निविदा अटी व शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदारांच व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केली आहे.त्यानुसार सदरची निविदा दिनांक २९/१०/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे.प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| जाहिर ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम GST व्यतीरीक्त (सुधारीत अंदाजपत्रक ) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दरचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई निविदा क्र. ७२७२६७ | अहमदनगर महानगरपालिका पाईप लाईन रोड हद्दीतील औरंगाबाद रोड ते नामदेव चौक श्रीराम चौक ते मनमाड रोड पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | ३२५९९११९/- | मे.ए.पी. सोनीमंडलेचा ,अ.नगर | निविदा दरापेक्षा २०.००% जादा दराने | अभिजीत अशोक काळे, अ.नगर , निविदा दरापेक्षा १५.००% जादा दराने |
| | | | अभिजीत अशोक काळे, अ.नगर | निविदा दरापेक्षा १५.०० % जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५मध्ये नमुद निविदा धारक अभिजीत अशोक काळे, अ.नगर यांची निविदा १५.००%जादा दराने आलेली असुन ती अवाजवी वाटत असल्यामुळे संबंधीतांस इकडील सार्व. बांध. विभाग जा.क्र.१९९० दि.२९/१०/२०२१अन्वये दराच्या वाटाघाटी याबाबत पत्र देउन विचारणा केली असता त्यांनी दि.११/११/२०२१ रोजी इकडेस पत्र देउन **निविदा दराने** काम करणेस तयार आहे. परंतु प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी असे कळविले आहे.

सदरच्या कामास चालू दरसुचीचा वापर अंदाजपत्रक बनविताना केला असलेने तसेच ई-निविदा मधील अटी व शर्ती मधील अट क्र. २९ नुसार भाववाढ देता येणार नाही.

तरी सदर दर वाजवी वाटत असल्याने अभिजीत अशोक काळे ,अ.नगर यांनी कळविले नुसार निविदा दराने निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस सादर /क

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरील 'क' नुसार निविदा दराने निविदा मान्य करणेस हरकत नाही तथापी आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार निविदा दराने निविदा मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सभेकडे सादर करणे बाबत कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "क" शहर अभियंता ,मुलेअ, अंतर्गत ले.प यांचे अभिप्रायानुसार निर्णयार्थ मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १७५ मधील चर्चे नुसार

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १७५ ते १७८ या विषयांमधील कामे उपनगरातील नागरीकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे रस्ते असून या सर्व रस्त्याची खुप दुरावस्था झालेली आहे.मा.आ.संग्रामभैय्या जगताप यांच्या सुचनेनुसार सदरचे रस्ता होणे अत्यंत गरजेचे आहे.त्यामुळे ठेकेदाराने डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी ही मागणी रास्त असून त्यानुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार देयक अदा करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- विषय क्र. १७५ ते १७८ मधील सर्व कामांच्या निविदा रिकॉल केल्यास नव्याने येणा-या निविदा या डांबराच्या आजच्या वाढीव दरानुसार येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व फेर निविदा मागविल्यास निविदा प्रक्रियेमध्ये जाणा-या कालावधीचा विचार करता या सर्व निविदांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १७५ ते १७८ निविदेबाबत सर्व निविदा धारकांनी प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी असे कळविले आहे. यावर झालेल्या चर्चे नुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जो भाव कंपनी बीला प्रमाणे असेल त्याप्रमाणे GST सहीत दराचा फरक देण्यात येईल. सदर भाव हा प्रत्यक्ष बील करते वेळीच देण्यात यावा.तसेच जर प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जर कामामध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त काम झाले तर त्या कामास मान्यता देण्यात येत आहे.निविदाधारक अभिजीत अशोक काळे,अ.नगर यांच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव** :- ई-निविदा क्र.७२७२६७ अहमदनगर महानगरपालिका पा.लाईन रोड हद्दीतील औरंगाबाद रोड ते नामदेव चौक श्रीराम चौक ते मनमाड रोड पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत निविदा धारक अभिजीत अशोक काळे,अ.नगर यांच्या निविदेबाबत प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार बीलावर असलेल्या GST सहीत जो दर असेल कमी अधिक त्याप्रमाणे भाव मिळावा असे कळविले आहे.यावर झालेल्या चर्चे नुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जो भाव कंपनी बीला प्रमाणे असेल त्याप्रमाणे GST सहीत दराचा फरक देण्यात येईल. सदर भाव हा प्रत्यक्ष बील करते वेळीच देण्यात यावा.तसेच जर प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जर कामामध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त काम झाले तर त्या कामास मान्यता देण्यात येत आहे.निविदा धारक अभिजीत अशोक काळे,अ.नगर यांच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १७७ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- ई- निविदा क्र.७२७२५० अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

विषय- ई-निविदा क्र.७२७२५० अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती ठराव क्र. १२३ दि.२५/१०/२०२१ ची मान्यता

२. निविदा क्र. ई-निविदा क्र. ७२७२५० सन २०२१-२०२२ (मनपाच्या संकेतस्थळावर दि.९/१०/२०२१)

३.निविदा विक्री कालावधी :- दि. ९/१०/२०२१ ते २०/१०/२०२१

४.निविदा स्विकारण्याची तारीख - दि. ९/१०/२०२१ ते २०/१०/२०२१

५.निविदा उघडणेचा तारीख - २२/१०/२०२१

६.कामाची मुदत - ०६ महिने

दिनांक २७/१०/२०२१ रोजी झालेल्या छाननी समितीने निविदा अटी व शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदारांच व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केली आहे.त्यानुसार सदरची निविदा दिनांक २९/१०/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे.प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम GST व्यतीरीक्त सुधारीत अंदाजपत्रक | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दरचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई निविदा क्र. ७२७२५० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ३९७३६८४२ | मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अ.नगर | निविदा दरापेक्षा २.०० % जादा दराने | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अ.नगर, निविदा दरापेक्षा २.००% जादा दराने |
| | | | अभिजीत अशोक काळे, अ.नगर | निविदा दरापेक्षा १०.०० % जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अ.नगर यांची निविदा २.०० % जादा दराने आलेली असुन ती अवाजवी वाटत असल्यामुळे

संबंधीतांस इकडील सार्व. बांध. विभगा जा.क्र. १९९२ दि.२९/१०/२०२१ अन्वये दराच्या वाटाघाटी याबाबत पत्र देउन विचारणा केली असता त्यांनी दि.११/११/२०२१ रोजी इकडेस पत्र देउन निविदा दराने काम करणेस तयार आहे. परंतु प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी असे कळविले आहे.

सदरच्या कामास चालू दरसुचीचा वापर अंदाजपत्रक बनविताना केला असलेने तसेच ई-निविदा मधील अटी व शर्ती मधील अट क्र. २९ नुसार भाववाढ देता येणार नाही.

अ/ तरी सदर दर वाजवी वाटत असल्याने मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन ,अ.नगर यांनी कळविले नुसार निविदा दराने निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस सादर /ड

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरील 'ड' नुसार निविदा दराने निविदा मान्यत करणेस हरकत नाही तथापी आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेप्रमाणे निविदा दराची निविदा "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "ड" शहर अभियंता ,मुलेअ, अंतर्गत ले.प यांचे अभिप्रायानुसार मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवण्यास सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १७५ मधील चर्चे नुसार

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १७५ ते १७८ या विषयांमधील कामे उपनगरातील नागरीकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे रस्ते असून या सर्व रस्त्याची खुप दुरावस्था झालेली आहे.मा.आ.संग्रामभैय्या जगताप यांच्या सुचनेनुसार सदरचे रस्ता होणे अत्यंत गरजेचे आहे.त्यामुळे ठेकेदाराने डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी ही मागणी रास्त असून त्यानुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार देयक अदा करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- विषय क्र. १७५ ते १७८ मधील सर्व कामांच्या निविदा रिकॉल केल्यास नव्याने येणा-या निविदा या डांबराच्या आजच्या वाढीव दरानुसार येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व फेर निविदा मागविल्यास निविदा प्रक्रियेमध्ये जाणा-या कालावधीचा विचार करता या सर्व निविदांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १७५ ते १७८ निविदेबाबत सर्व निविदा धारकांनी प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी असे कळविले आहे. यावर झालेल्या चर्चे नुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जो भाव कंपनी बीला प्रमाणे असेल त्याप्रमाणे GST सहीत दराचा फरक देण्यात येईल. सदर भाव हा प्रत्यक्ष बील करते वेळीच देण्यात यावा.तसेच जर प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जर कामामध्ये अंदाज पत्रकापेक्षा

जास्त काम झाले तर त्या कामास मान्यता देण्यात येत आहे.निविदाधारक मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अ.नगर यांच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव** :- ई- निविदा क्र.७२७२५० अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत निविदा धारक मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अ.नगर यांच्या निविदेबाबत प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार बीलावर असलेल्या GST सहीत जो दर असेल कमी अधिक त्याप्रमाणे भाव मिळावा असे कळविले आहे.यावर झालेल्या चर्चे नुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जो भाव कंपनी बीला प्रमाणे असेल त्याप्रमाणे GST सहीत दराचा फरक देण्यात येईल. सदर भाव हा प्रत्यक्ष बील करते वेळीच देण्यात यावा.तसेच जर प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जर कामामध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त काम झाले तर त्या कामास मान्यता देण्यात येत आहे.निविदा धारक मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अ.नगर यांच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे      सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान      सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १७८ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- ई- निविदा क्र.७२७२७३-१ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.२ व वॉर्ड क्र.४ मधील गुलमोहर पोलीस चौकी ते पाईप लाईन रोड श्रीराम चौक पर्यत रस्ता मजबुतीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती ठराव क्र. १२५ दि.२५/१०/२०२१ ची मान्यता

२. निविदा क्र. ई-निविदा क्र. ७२७२७३-१ सन २०२१-२०२२

३.निविदा विक्री कालावधी :- दि. ९/१०/२०२१ ते २०/१०/२०२१

४.निविदा स्विकारण्याची तारीख - दि. ९/१०/२०२१ ते २०/१०/२०२१

५.निविदा उघडणेचा तारीख - २२/१०/२०२१

६.कामाची मुदत - ०६ महिने

दिनांक २७/१०/२०२१ रोजी झालेल्या छाननी समितीने निविदा अटी व शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदाराचा व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केली आहे.त्यानुसार सदर ची निविदा दिनांक २९/१०/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे.प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| जाहिर ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम GST व्यतीरीक्त (सुधारीत अंदाजपत्रक ) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दरचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई निविदा क्र. ७२७२७३-१ सन २०२१-२०२२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.२ व वॉर्ड क्र.४ मधील गुलमोहर पोलीस चौकी ते पाईप लाईन रोड श्रीराम चौक पर्यत रस्ता मजबुतीकरण करणे. | ३०,८३,७००/- | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन ,अ.नगर | निविदा दराने | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन ,अ.नगर निविदा दराने |
| | | | अभिजीत अशोक काळे, अ.नगर | निविदा दरापेक्षा १०.०० % जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५मध्ये नमुद निविदा धारक मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन ,अ.नगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे.

सदर कमी दराची ई - निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस सादर. "ब"

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरील 'ब' प्रमाणे सर्वात कमी दराची ,अंदाजपत्रकीय दराची निविदा स्वीकरणेस हरकत नाही तथापी आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखाधिकारी अभिप्राय की,मान्यतेस्तव

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम ७३ क प्रमाणे विभागाने कार्यवाही करावी.

प्रस्तावानुसार निविदादराने निविदा मंजूरीबाबत कार्यवाहीस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "ब" प्रमाणे अंदाजपत्रकीय निविदा दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर मंजूरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

विषय क्रमांक १७५ मधील चर्चे नुसार

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १७५ ते १७८ या विषयांमधील कामे उपनगरातील नागरीकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे रस्ते असून या सर्व रस्त्याची खुप दुरावस्था झालेली आहे.मा.आ.संग्रामभैय्या जगताप यांच्या सुचनेनुसार सदरचे रस्ता होणे अत्यंत गरजेचे आहे.त्यामुळे ठेकेदाराने डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी ही मागणी रास्त असून त्यानुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार देयक अदा करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- विषय क्र. १७५ ते १७८ मधील सर्व कामांच्या निविदा रिकॉल केल्यास नव्याने येणा-या निविदा या डांबराच्या आजच्या वाढीव दरानुसार येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व फेर निविदा मागविल्यास निविदा प्रक्रियेमध्ये जाणा-या कालावधीचा विचार करता या सर्व निविदांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रिकेतील विषय क्रमांक १७५ ते १७८ निविदेबाबत सर्व निविदा धारकांनी प्रत्यक्षात साईटवर काम करत वेळी डांबर खरेदी केलेल्या दरानुसार भाववाढ मिळावी असे कळविले आहे. यावर झालेल्या चर्चे नुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जो भाव कंपनी बीला प्रमाणे असेल त्याप्रमाणे GST सहीत दराचा फरक देण्यात येईल. सदर भाव हा प्रत्यक्ष बील करते वेळीच देण्यात यावा.तसेच जर प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जर कामामध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त काम झाले तर त्या कामास मान्यता देण्यात येत आहे.निविदाधारक अभिजीत अशोक काळे, अ.नगर यांच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव** :- ई- निविदा क्र.७२७२७३-१ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.२ व वॉर्ड क्र.४ मधील गुलमोहर पोलीस चौकी ते पाईप लाईन रोड श्रीराम चौक पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार ठेकेदाराने प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जो भाव कंपनी बीला प्रमाणे असेल त्याप्रमाणे GST सहीत दराचा फरक देण्यात येईल. सदर भाव हा प्रत्यक्ष बील करते वेळीच देण्यात यावा.तसेच जर प्रत्यक्षात साईटवर काम करते वेळी जर कामामध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त काम झाले तर त्या कामास मान्यता देण्यात येत आहे.निविदाधारक मे.बेस्ट कंस्ट्रक्शन,अ.नगर यांच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १७९ मंगळवार दि.११/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** ई-निविदा सुचना क्र.१४६/७३१३३१ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत डी.पी. रोडच्या कडेने ४५० एमएम व्यासाची पाईप गटर करणे व मंदिर ते सिना नंदी दरम्यान ४५० व ९०० एमएम व्यासाची करणे या कामाच्या निविदा मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

विषय- ई-निविदा सुचना क्र. १४६/७३१३३१ अहमदनगर महानगरपालिका हददीतील प्रभाग क्र. ७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत डी.पी.रोडच्या कडेने ४५० एमएम व्यासाची पाईप गटर करणे व मंदिर ते सिना नदी दरम्यान ४५० व ९०० एमएम व्यासाची करणे या कामाच्या निविदा मंजुरी बाबत

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती सभा क्र. ०७ ठराव क्र.९७ दि.२०/९/२०२१(ऑनलाईन झुम)

२.फेर निविदा क्र. ई-निविदा क्र. ७३१३३१ सन २०२१-२०२२

३.निविदा विक्री कालावधी :- दि. २२/१०/२०२१ ते २८/१०/२०२१

४.निविदा स्विकारण्याची तारीख - दि. २२/१०/२०२१ ते २८/१०/२०२१

५.निविदा उघडणेचा तारीख - ०१/११/२०२१

६.कामाची मुदत - ०४ महिने

दिनांक १२/११/२०२१ रोजी झालेल्या छाननी समितीने निविदा अटी व शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदारांच व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केली आहे.त्यानुसार सदरची व्यापारी लिफाफा दिनांक २५/११/२०२१रोजी उघडण्यात आलेली आहे.प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम GST व्यतीरीक्त | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दरचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| जाहिर निविदा क्र.४१६/७ ३१३३१ सन २०२१-२०२२ | अहमदनगर मनपा हददीतील प्रभाग क्र. ७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हा परिषद शाळेपर्यत डी.पी.रोडच्या कडेने ४५० एमएम व्यासाची पाईप गटर करणे व मंदिर ते सिना नदी दरम्यान ४५० व ९०० एमएम व्यासाची करणे | ३५,९३,५०६/- | मे. ओमसाई कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर | ०.०० % जादा दराची म्हणजेच अंदाजपत्रक दराप्रमाणे | मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन, अंदाजपत्रक दराप्रमाणे |
| | | | एस.एफ. शेख कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर | निविदा दरापेक्षा ५% जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५मध्ये नमुद निविदा धारक मे. ओमरसाई कंन्स्ट्रक्शन,अ.नगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया ०.००% जादा दराची म्हणजे निविदा दराने प्राप्त झालेली आहे.

तरी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची मे. ओमसाई कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांची निविदा दराची निविदा मा.स्थायी समितीने पुढे ठेवणेस प्रशासकीय मान्यतेसाठी ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./अ

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सादर, वरील "अ" प्रमाणे अंदाजपत्रकीय दराची निविदा मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, BOQ च्या पत्रातील रकमेत व कामाचे नावात बदल असलेबाबत खात्री केली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण-७ मधील कलम ७३ क प्रमाणे कार्यवाही कडून अंदाजपत्रकीय दराची निविदा निविदा दराने कार्यवाहीस्तव

यावर मा.उपायुक्त (सा.) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ई-निविदा सुचना क्र.१४६/७३१३३१ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत डी.पी. रोडच्या कडेने ४५० एमएम व्यासाची पाईप गटर करणे व मंदिर ते सिना नंदी दरम्यान ४५० व ९०० एमएम व्यासाची करणे या कामाच्या निविदा मंजुरी बाबतचा प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

मा.श्री.प्रकाश भागानगरे:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ई-निविदा सुचना क्र.१४६/७३१३३१ अहमदनगर मनपा हद्दीतील प्र. क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत डी.पी. रोडच्या कडेने ४५० एमएम व्यासाची पाईप गटर करणे व मंदिर ते सिना नंदी दरम्यान ४५० व ९०० एमएम व्यासाची करणे या कामाच्या बाबतचा निविदा धारक मे. ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अ.नगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया ०.००% जादा दराची म्हणजे निविदा दराने प्राप्त झालेली आहे. स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार ई-निविदा सुचना क्र.१४६/७३१३३१ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये केशव कॉर्नर ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत डी.पी. रोडच्या कडेने ४५० एमएम व्यासाची पाईप गटर करणे व मंदिर ते सिना नंदी दरम्यान ४५० व ९०० एमएम व्यासाची करणे या कामाच्या बाबतचा निविदा धारक मे. ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अ.नगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया ०.००% जादा दराची म्हणजे निविदा दराने प्राप्त झालेली आहे.या स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १८० मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- ई-निविदा क्र.७३२८१९-१ रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे सन २०२१-२०२२ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील पुणे रोड ते चंदन इस्टेट ते झिंजुर्डे घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

विषय- रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे सन २०२१-२०२२ अंतर्गत ई- निविदा क्र.७३२८१९-१ अहमदनगर मनपा हददीतील प्रभाग क्रमांक १४ मधील पुणे रोड ते चंदन इस्टेट ते झिंडुर्डे घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे या निविदेच्या मंजुरीबाबत.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त, अ.नगर मनपा यांची दि.१४/१०/२०२१ रोजीची मंजुरी

२.ऑनलाईन ई-निविदा क्र. ७३२८१९-१/ सन २०२१-२०२२ दि.२७/१०/२०२१

३.निविदा विक्री कालावधी :- दि. २७/१०/२०२१ ते ०३/१०/२०२१

४.निविदा स्विकारणेचा कालावधी - दि. २७/१०/२०२१ ते ०३/१०/२०२१

५.निविदा उघडण्याचा तारीख - दि. ०८/१०/२०२१

६.कामाची मुदत - ०४ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल- दि.१२/११/२०२१ रोजीच्या तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदरची निविदा उघडणेत आलेली आहे.

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दरचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बां.वि./ई-निविदा क्र. ७३२८१९-१/२०२१-२२ | ई- निविदा क्र.७३२८१९-१ अहमदनगर मनपा हददीतील प्रभाग क्र.१४ मधील पुणे रोड ते चंदन इस्टेट ते झिंडुर्डे घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ४३,८५,६४६/- (GST व्यतिरिक्त) | श्री. रोहित रत्ना अंधारे, अहमदनगर | अंदाजपत्रकीय दराने | श्री. रोहित रत्ना अंधारे, अहमदनगर व निविदा दराने |
| | | | मे.ए.पी. सोनीमंडलेचा, अहमदनगर | निविदा दरापेक्षा ५.१७०% जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५मध्ये नमुद निविदा धारक श्री. रोहित रत्ना अंधारे, अहमदनगर यांची निविदा दराने आलेली असुन सर्वात कमी दराची आहे.

तरी सदरचे दर वाजवी असून श्री. रोहित रत्ना अंधारे, अहमदनगर यांची निविदा दराची निविदा मंजुरीसाठी मान्यतेस्तव मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर. /ड

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सादर, वरील "ड" नुसार निविदा दराची निविदा मा.स्थायी समिती समोर सादर करणे योग्य आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ मधील कलम ७३-क नुसार विभागाने कार्यवाही करावी. विभागाने प्रस्तावीत केलेप्रमाणे निविदा दराची निविदा "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवण्यास मान्यतेस्तव

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- ई-निविदा क्र.७३२८१९-१ रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे सन २०२१-२०२२ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील पुणे रोड ते चंदन इस्टेट ते झिंजुर्डे घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेबाबतचा प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ई-निविदा क्र.७३२८१९-१ रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे सन २०२१-२०२२ अंतर्गत अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील पुणे रोड ते चंदन इस्टेट ते झिंजुर्डे घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेबाबतचा निविदा धारक श्री. रोहित रत्ना अंधारे, अहमदनगर यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने आलेली असल्याने या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार ई-निविदा क्र.७३२८१९-१ रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे सन२०२१-२०२२ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील पुणे रोड ते चंदन इस्टेट ते झिंजुर्डे घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेबाबतचा निविदा धारक श्री. रोहित रत्ना अंधारे, अहमदनगर यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने आलेली असल्याने या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १८१ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे (सिध्दीबाग उदयान) चालविण्यास देणे व निवेदेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.उदयान विभाग

संदर्भ :- १)फेर ई- निविदा जाहिरात क्र.७३५७४७ दि.०३/११/२०२१

२)तांत्रिक लिफाफा ओपनिंग दि.२५/११/२०२१

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की,तांत्रिक लिफाफा उघडणे वेळी संदर्भिय क्र.२ अन्वये निवेदाकार आर आर गार्डन संस्थेने त्यांची संस्थेची आर्थिक लिफाफा न उघणेबाबत व इतर निवेदाधारकांबाबत हरकत नसलेचे समितीकडे कळविले आहे.त्या अनुषंगाने इतर पात्र संस्था यांची आर्थिक लिफाफा उघडण्यात आला.खालील संस्था निहाय आलेले दर आहेत.

| अ.क्र. | कै.बाळासाहब देशपांडे (सिध्दीबाग उदयान ) | प्रतिवर्ष मनपा मध्ये आगाउ स्वरूपात भरण्यास तयार असलेली रक्कम | शेरा. |
|---|---|---|---|
| १ | ओम डिजीटल | ५१,०००/- | जादा दर |
| २ | धनराज एन्टरप्रायजेस | ३८,०००/- | |
| ३ | कृष्णा एस्कोटा | ४०,०००/- | |

उपरोक्त तक्त्यामध्ये ओम डिजीटल ही संस्था महानगरपालिकेस जादा दराने भरण्यास तयार आहेत.त्यामुळे जादा रक्कम भरण्यास तयार असलेल्या संस्थांना कार्यारंभ आदेश देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर,तथापी सदरहु उदयान प्रभाग क्र.९ मध्ये येत असुन निवडणूक आचारसंहीता असल्याने आचारसंहिता संपल्यानंतर कार्यारंभ आदेश देणेस हरकत नाही.

येणे प्रमाणे उदयान विभाग प्रमुख यांचा अहवाल आहे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती पुढे सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे (सिध्दीबाग उदयान) चालविण्यास देणे व निवेदेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- किती रक्कम आपल्याला देणार

उपायुक्त श्री.डांगे :- ५१ हजार रूपये प्रतिवर्ष देणार.

मा.श्री.मुदस्सर शेख :- नागरीकांना कोणत्या सोई सुविधा करणार.

उपायुक्त श्री.डांगे :- मेंटनन्स ठेकेदार पहाणार आहे.नागरीकांकडून प्रवेश फि रू.५ ,१० वसूल करणार.

मा.श्री.मुदस्सर शेख :- देखभालीची कामे होत नसल्यामुळे सध्या उदयानाची दुरावस्था झालेली आहे.उदयानामध्ये नागरीकांच्या गरजेनुसार सुधारणा करण्यात यावी.उद्यानामध्ये गेल्यावर तेथील वातावरण प्रसन्न असायला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- आत्ताच मा.आ.संग्रामभैय्या जगताप यांनी भुईकोट किल्ला विकसीत करण्याकरीता दोन कोटी रूपयांचा निधी मंजूर करून आणला आहे.या धर्तीवर एखादा निधी प्राप्त झाल्यास सिध्दीबाग येथे सोई-सुविधा उपलब्ध होतील.सिध्दीबाग ही शहराच्या मध्यवस्तीमधील एकमेव व सर्वात जुने उदयान असुन या उदयानामध्ये रोज लहान मुले,नागरीक,जेष्ठ नागरीक येत असतात.भविष्यात एखादया योजने अंतर्गत या ठिकाणी समाजउपयोगी कामाकरीता मा.खासदार निधी ,मा.आमदार निधी किंवा मा.शासनाच्या निधीअंतर्गत सुधारणा करणे आवश्यक आहे. या पुर्वी कै. बाळासाहेब देशपांडे (सिध्दीबाग उदयान) चालविण्यास देणे बाबत चे मागील काळातील स्थायी समितीमध्ये झालेले ठराव रद्द करण्यात येत आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- फेर ई- निविदा जाहिरात क्र.७३५७४७ दि.०३/११/२०२१ निविदाकार ओम डिजीटल ही संस्था महानगरपालिकेस जादा दराच्या निविदा दरास अटी व शर्ती नुसार ११वर्षा करीता चालविण्यास देणेस मान्यता देण्यात येत आहे.उदयानामध्ये नागरीकांच्या गरजेनुसार सुधारणा करण्यास तसेच भविष्यात एखादया योजने अंतर्गत या ठिकाणी समाजउपयोगी कामाकरीता मा.खासदार निधी ,मा.आमदार निधी किंवा मा.शासनाच्या निधीअंतर्गत सुधारणा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार फेर ई- निविदा जाहिरात क्र.७३५७४७ दि.०३/११/२०२१ निविदाकार ओम डिजीटल यांच्या जादा देकार रकमेच्या दरास अटी व शर्ती नुसार ११वर्षा करीता चालविण्यास देणेस मान्यता देण्यात येत आहे.उदयानामध्ये नागरीकांच्या गरजेनुसार सुधारणा करण्यास तसेच भविष्यात एखादया योजने अंतर्गत या ठिकाणी समाजउपयोगी कामाकरीता मा.खासदार निधी ,मा.आमदार निधी किंवा मा.शासनाच्या निधीअंतर्गत सुधारणा करणेस मान्यता देण्यात येत आहे. या पुर्वी कै. बाळासाहेब देशपांडे (सिध्दीबाग उदयान) चालविण्यास देणे बाबत चे मागील काळातील स्थायी समितीमध्ये झालेले ठराव रद्द करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १८२ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या ६२ घंटागाडया व एक कॅाम्पॅक्टर मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडे भाडे तत्वावर देण्यात आलेल्या मनपा वाहनांची दर निश्चिती बाबत मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

**संदर्भ-** १] मा.स्थायी समिती ठराव क्र.४ विषय क्र.८८ दिनांक १२/९/२०१९ रोजीचा मंजुर ठरावानुसार

२] स्वयंभु ट्रान्सपोर्ट , पुणे यांचे पत्र क्र.७० दिनांक २४/१२/२०२० रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार विनंती अहवाल देण्यांत येतो की, संदर्भिय क्र.१ नुसार मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांना संपुर्ण शहरातील कचरा संकलन व वाहतुकीचे काम देण्यात आलेले आहे. सदरचे कामामधील अटी व शर्ती नुसार महानगरपालिकेची मालकीची वाहने वापरणे बंधनकारक असुन त्याकामी त्यांना महानगरपालिकेचे मालकीची एकुण ६० वाहने माहे ऑगस्ट २०२० पासुन दिलेली असुन सदरचे वाहनांची भाडे दर निश्चित करून मग भाडे आकारणी करणेबाबत मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांची मागणी आहे. याबाबत सद्यस्थितीमध्ये संपुर्ण नस्ती वैद्यकीय आरोग्य विभागाने चौकशीकामी मा.उपायुक्त श्री. दिनेश सिनारे यांचेकडे सादर केलेली आहे. त्या नस्तीची समक्ष अवलोकन केले असता याबाबत १] फेर ई- निविदा क्र.२१२४ २] मा.स्थायी समिती सभा क्र.४ विषय क्र.८८ दिनांक १२/०९/२०१९ रोजीचा मंजुर ठरावानुार मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांना दर लघुत्तम असल्याने त्यांना सदरचे काम देण्यात आलेले असुन मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठरावानुसार व ई- निविदेतील तरतुदीनुसार प्रति वर्ष ८ कोटी ४३ लक्ष या प्रमाणे तीन वर्ष कालावधी करीता रक्कम रू.२५ कोटी २९ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी महानगरपालिकेची वाहन व्यवस्था वापरलेवर २ कोटी २५ लक्ष या प्रमाणे ३ वर्ष कालावधी करीता वाहन व्यवस्था वापरल्यावर रू. २ कोटी २५ लक्ष या प्रमाणे ३ वर्ष कालावधी करीता मनपास ठेकेदार कडून ६ कोटी ७५ लक्ष अनुज्ञेय राहतील असे स्पष्ट नमुद आहे. याबाबत तत्कालीन अहवालानुसार वाहनाचे भाडे रक्कम रू.२४०००/- प्रति महिना प्रति मनपा कचरा गाडया वाहन नमुद आहे. सदरचे भाडे ठेकेदाराने मनपास देणे आवश्यक आहे. याकामी ठेकेदाराकडून प्रति वाहन प्रति महिना रू.२४,०००/- घेणे योग्य वाटते. तसेच मनपा मालकीचे एक कॉम्पक्टर आहे याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

सदरचे दर नियमानुसार ठरावात नमुद केल्यानुसार वसुल करणे योग्य वाटते. मनपा घंटागाडया भाडे रक्कम रूपये २४,०००/- व मनपा कचरा कॉम्पक्टर भाडे रक्कम रू.६०,०००/- प्रति वाहन प्रति महिना तसेच मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांनी मागणी केल्यानुसार दर ठरविण्याचे अधिकार या विभागास नाहीत तसेच मा.स्थायी समिती ठरावात सुध्दा या बाबत स्पष्ट उल्लेख नसल्याने दर निश्चिती बाबत खालील अधिकारी यांची समितीची नियुक्ती करणे उचित वाटते./अ

१] मा.उपायुक्त (कर), अहमदनगर महानगरपालिका

२] मा.मुख्य लेखाधिकारी, अहमदनगर महानगरपालिका

३] मा.मॅकेनिकल इंजिनिअर, अहमदनगर महानगरपालिका

४] मा. आरोग्य अधिकारी , घनकचरा व्यवस्थापन विभाग, अहमदनगर महानगरपालिका

सदरचे समिती मार्फत मनपा कचरा वाहन भाडे आकारणी बाबत योग्य तो निर्णय घेणेस अथवा सदर बाबत मा.स्थायी समिती सभा यांचेकडेस दर आकारणी बाबत पुन्हा प्रस्ताव ठेवणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार पुढील आदेशार्थ सादर.

यावर लेखापरिक्षक / मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मुळ निविदेतील अटी व शर्ती बाबत विभागाने खात्री करून प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाहीस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्याप्रमाणे (१ ) सदरचे दर हे आपल्या Request for proposal to selection of operators for DLD Caption And Transportation upto Processing Plant AMC मध्ये पान नंबर P-१७ या पृष्ठावार नमुद केल्या प्रमाणे

(A) Mini Truck - २४,०००/ Month And B Compactor ₹ ६००००/ असे दिसुन येत आहे. ,(२) उपरोक्त प्रमाणे Contract Agrement (दिनांक ८/११/२०१९) झालेले आहे. याप्रमाणे ठरवलेले दर उचित वाटते.,(३) तरी उपरोक्त प्रमाणे Tender Document / form व Agrement प्रमाणे वरील दर कायम करावे किंवा पुन्हा समिती स्थापन करून दर ठरवावे किंवा मा.स्थायी समिती सभे समोर प्रस्ताव ठेवावा याबाबत पुढील मार्गदर्शनार्थ तथा आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, Teander doecument and Agreement प्रमाणे करावे

०००

संदर्भ- १. मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांची दिनांक २७/०१/२०२१ रोजीची मान्यता

२. स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे यांचे पत्र क्र.७० दि.२४/१२/२०२० रोजीचे पत्र

३. घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.३९४ दि.०१/०२/२०२१ रोजीचे कार्यालयीन पत्र

४. स्वंयभु ट्रान्सपोर्ट पुणे यांचे पत्र क्र.७७ दि.०४/०२/२०२१ रोजीचे पत्र

५. वैद्यकीय आरोग्य अधिकारी विभाग जा.क्र.७६ दि.२५/०८/२०२० रोजी कार्यालयीन पत्र

६. वैद्यकीय आरोग्य अधिकारी विभाग जा.क्र.५२१ दि.२७/०८/२०२० रोजी कार्यालयीन पत्र

उपरोक्त संदर्भकिंत विषयानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. शासनाकडील डी.पी.आर मंजुरीनुसार शासनाने दिलेल्या सुचनांनुसार Gem Portal वरून ६४ वाहने खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे यांना मनपा एक कॉम्पॅक्टर दिनांक ११/११/२०१९ पासून कचरा संकलन व वाहतुक करणेकामी खरेदी करण्यात आलेले एकुण ६२ मनपा घंटागाडया वाहने हे दिनांक ०१/०९/२०२० पासून ताब्यात देण्यात आलेले आहे.

संपुर्ण शहरातील कचरा संकलन व वाहतुक कामी प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदा क्र.२१४२४ मध्ये मनपाचे कचरा वाहने यशस्वी निविदाकार यांनी भाडेतत्वावर घेणे बंधनकारक आहे व त्या वाहनांचे वाहने भाडे आरटीओ दरानुसार भाडे देणे आवश्यक आहे असे नमुद आहे. त्याचप्रमाणे सदर ई- निविदेबाबत झालेल्या दिनांक ३१/०७/२०१९ रोजीची निविदा पुर्व बैठकीतील मुददा क्र.७ नुसार वाहनांचे भाडे हे आरटीओ दराप्रमाणे आहेत असे नमुद केलेले आहे.

त्यानुसार विभागामार्फत दिनांक २८/१२/२०२० रोजी भाडे निश्चिती करणेकामी संदर्भिय क्र. २ स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे यांच्या पत्रानुसार प्रस्तावीत करण्यात आले होते. सदरील प्रस्तावावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी दिनांक २७/०१/२०२१ रोजी Teander doecument and Agreement प्रमाणे करावे असे आदेशित केलेले होते. त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांना भाडे निश्चित बाबत घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.३९४ दि.०१/०२/२०२१ रोजी कळविण्यात आले होते. मात्र संदर्भिय

क्र.०४ च्या स्वयंभु ट्रान्सपोर्ट , पुणे यांनी दिनांक ०४/०२/२०२१ रोजी पत्र सादर करून सदरील मनपा वाहन भाडे दर निश्चितीतील दर मान्य नाही असे पत्र दिले आहे. त्यावर तत्कालीन मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी दि.०४/०२/२०२१ रोजी सदरील पत्रावर तपासुन सादर करावे असे सुचना केलेले आहे.

त्यानुसार याबाबत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांनी प्रादेशिक परिवहन प्राधिकरण अहमदनगर यांच्या कडील सोबत जोडलेल्या प्रस्ताव क्र.५/२०१९ मध्ये नमुद केलेले शासकीय कामासाठीचे वाहन भाडे खालील प्रमाणे भाडे दराबाबत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ई- निविदेत खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात आले होते.

| **वाहन प्रकार** | **मंजुर वाहन भाडे दर प्रती महा** |
|---|---|
| घंटागाडी | २४०००/- |
| ट्रॅक्टर | २८०००/- |
| कंटेनर प्लेसर | ३००००/- |
| कंटेनर | ५००/- |
| डंपर | ३००००/- |
| कॉम्पॅक्टर | ६००००/- |

वरील प्रमाणे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण अहमदनगर सदरचे वाहनास रू.२४०००/- प्रति माह दर निश्चित केलेल्या असुन प्रस्ताव क्र.५/२०१९ मध्ये नमुद केलेले शासकीय कामासाठीचे वाहन भाडे व त्यामध्ये इंधन खर्च आणि वाहन चालक मानधन हा वाहनांच्या मालकाने म्हणजे महानगरपालिकेने करावा असे नमुद केले आहे. परंतु मनपाकडे आवश्यक मनुष्यबळ (वाहन चालक) नसल्याने मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांनी इंधन व वाहन चालक यांचा मासिक खर्च करावा तत्कालीन वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा घनकचरा प्रमुख यांच्या सोबत झालेल्या चर्चेमध्ये निश्चित करण्यात आले व संदर्भ क्र.६ नुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी विभाग जा.क्र.५२१ दि.२७/०८/२०२० रोजी कार्यालयीन पत्रामध्ये आरटीओ दराप्रमाणे वाहन भाडे बाबत वाहन चालक व इंधन यांचे खर्च मनपास उपलब्ध करून दिल्यास वाहन भाडे निश्चित करण्यात येईल. त्याचप्रमाणे वाहन चालक व इंधनावर होणार खर्च नमुद आरटीओ दरातुन वजा करून उर्वरीत रक्कम भाडयापोटी देयकातून वजा करण्या येईल असे नमुद आहे.

अनुक्रमे-१] त्यानुसार स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांनी दिनांक २८/०८/२०२० रोजी पत्र सादर करून खालील प्रमाणे घंटागाडी साठी वाहन चालक व इंधन खर्च बाबत कळविले आहे. त्यानुसार प्रत्येक घंटा गाडीकरीता वाहन चालक व दैनंदिन इंधनाचा खर्च खालील प्रमाणे अंदाजे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रति वाहन प्रति दिन लागणारे इंधन व पगार | दर | ३० दिवसांचा खर्च |
|---|---|---|---|
| १ | ४.५० लिटर अंदाजे दररोज | इंधन रू.७९/- प्रति लिटर | रू. १०,६६५/- |
| २ | प्रति वाहन चालक दर | रू.३३५/- प्रति दिन प्रति वाहन चालक | रू. १०,०५०/- |
| | | एकुण रक्कम | रू. २०,७१५/- |

अनुक्रमे-२] त्यानुसार स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांनी दिनांक २७/०८/२०२० रोजी पत्र सादर करून खालील प्रमाणे मनपा कॉम्पॅक्टर साठी वाहन चालक व इंधन खर्च बाबत कळविले आहे. त्यानुसार प्रत्येक कॉम्पॅक्टरकरीता वाहन चालक व दैनंदिन इंधनाचा खर्च खालील प्रमाणे अंदाजे दर्शविण्यात येत आहे

| अ.क्र. | प्रति वाहन प्रति दिन लागणारे इंधन व पगार | दर | ३० दिवसांचा खर्च |
|---|---|---|---|
| १ | प्रति दिन १५ लिटर अंदाजे दररोज | इंधन रू.७९/- प्रति लिटर | रू. ३५,५००/- |
| २ | प्रति दिन प्रति वाहन चालक दर | रू. ४००/- प्रति दिन प्रति वाहन चालक | रू. १२,०००/- |
| | | एकुण रक्कम | रू. ४७,५५०/- |

वरीलप्रमाणे अनुक्रमे १ नुसार वस्तुस्थिती पाहाता मनपा घंटागाडीचे आरटीओ दर रक्कम रू.२४,०००/- मधुन वाहन चालक व इंधन खर्च एकुण रक्कम रू.२०,७१५/- वजा केल्यास एकुण वाहन भाडे रक्कम ३,२५८/- रूपये भाडे होते. त्याचप्रमाणे अनुक्रेम २ नुसार वस्तुस्थिती पाहाता मनपा घंटा गाडीचे आरटीओ दर रक्कम रूपये ६०,०००/- मधुन वाहन चालक व इंधन खर्च एकुण रक्कम रूपये ४७,५५०/- वजा केल्यास एकुण वाहन भाडे रक्कम रूपये १२,४५०/-प्रति महिना भाडे होते.

तरी प्रस्तावामध्ये सादर केलेनुसार मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांना भाडेतत्वावर देण्यात आलेल्या वाहनांचे प्रति महिना भाडे आकारणी करून ६२ घंटा गाडया व ०१ कॉम्पॅक्टर वाहने संबंधीताना ताब्यात देण्यात आलेल्या वाहनांची भाडे दर निश्चित कामी प्रस्तावातील अनुक्रमे १ व २ नुसार करणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र. स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यों कडून मनपाचे वाहन भाडे भाडे नमुद केलेल्या बाबी पाहता- १] उपायुक्त (कर) यांचे दि.३१/१२/२०२० रोजीच्या अभिप्रायानुसार मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे संयुक्तीक राहील.,२] टेंडर मध्ये पुष्ठ क्र.P-१७ वर मंजुर वाहन भाडे नमुद केलेले आहे. तथापी सदर वाहनाचे भाडे हे आर.टी.ओ. दराने आकारणे बाबत उल्लेख दिसुन येत नाही.,३] मनपाचे कॉम्पॅक्टर वाहन ठेकेदार संस्थेस भाडयाने पुरविल्याने दरमहा भाडे रक्कम रू.६२०००/- देयकातुन वसुल करण्यात येत होते. सदरची वसुली माहे सप्टेंबर २०२० पासून बंद करण्यात आली आहे., वरीलप्रमाणे सर्व बाबींच्या विचार करून Teander doecument and Agreement या आधारावर भाडे वसुली करणे संयुक्तीक होईल. तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मुलेप व मुलेअ यांच्या अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, आर.टी.ओ. ला पत्र देवुन फेरसादर करावे

०००

मा.फेरसादर,

उपरोक्त विषयानुनसार मा.मुलेप यांच्या दिनांक ०८/०३/२०२१ व मा.सहाय्यक आयुक्त यांच्या दिनांक ०९/०३/२०२१ रोजीच्या सुचनेनुसार फेरसादर करण्यात येते की, स्वयंभू ट्रान्सपोर्ट , पुणे यांना देण्यात आलेले मनपाचे ६२ घंटागाडी वाहने व एक कॉम्पॅक्टर यांचे वाहन भाडे दर निश्चिती कामी कार्यवाही चालु आहे. सदरील कचरा संकलन व वाहतूक करणेकामी ई- निविदा क्र.२१२४ मध्ये पृष्ठ क्र.१७ मधील अट क्र.१८ मध्ये मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकारण, अहमदनगर यांच्या कडील प्रस्ताव क्र. ५/२०१९ मंजूर प्रस्तावानुसार खालील प्रमाणे वाहन भाडे दर नमुद करण्यात आलेले आहे.

| **वाहन प्रकार** | **मंजुर वाहन भाडे दर प्रती महा** |
|---|---|
| घंटागाडी | २४०००/- |
| ट्रॅक्टर | २८०००/- |
| कंटेनर प्लेसर | ३००००/- |
| कंटेनर | ५००/- |
| डंपर | ३००००/- |
| कॉम्पॅक्टर | ६००००/- |

वरील प्रमाणे ई-निविदा क्र.२१२४ मध्ये भाडे दर नमुद केल्यावर सदर ई- निविदेमध्ये ठेकेदारास मनपा वाहन भाडेतत्वावर दिल्यावर वाहनाचे इंधन खर्च, वाहन चालक खर्च, अपघात व मेटेन्संस यांचे खर्च कोण करणार

याबाबत स्पष्ट नमुद नाही. त्यामुळे नमुद ई-निविदेतील वाहन भाडे हे मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकारण, अहमदनगर यांच्या कडील प्रस्ताव क्र.५/२०१९ मंजुर प्रस्तावानुसार असल्याने घनकचरा व्यवस्थापन विभाग जाक्र.४८१ दि.०९/०३/२०२१ अन्वये मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांना वाहन भाडे दराबाबत पत्र देण्यात येवुन मनपाने ठेकेदारांच्या ताब्यात वाहने दिल्यावर त्याकरिता इंधन खर्च व वाहन चालक खर्चाची जबाबदारी कोणाची राहील याबाबत अभिप्राय कामी पत्र देण्यात आलेले आहे. त्यानुसार स्वंयभू ट्रान्सपोर्ट,पुणे  यांना देण्यात आलेले मनपाचे ६२ घंटागाडी वाहने व एक कॉम्पॅक्टर यांचे वाहन भाडे दर निश्चिती कामी कार्यवाही चालू आहे. त्यानुसार मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांच्याकडून अभिप्राय मिळल्यावर मनपा वाहन भाडे दर निश्चिती करण्यात येईल त्याकरिता सध्या सदर बिलातून मनपा वाहन भाडे पोटी दरमहा रक्कम ५,००,०००/- रूपये कपात करण्यात येवुन उर्वरीत दर निश्चितीनुसार काही रक्कम बाकी राहिल्यास पुढील बिलातुन कपात करण्यात येणार आहे./अ

तथापी वरील मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांच्या कडील प्राप्त होणा-या अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल माहितीस सविनय सादर.

येणेप्रमणे प्र.मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल फेरसादर

यावर मा.घन कचरा व्यवस्थापन विभाग यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, घन कचरा व्यवस्थापन विभाग व घन कचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचे प्रस्तावानुसार "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

०००

मा.फेरसादर,

उपरोक्त विषयानुसार मा.मुलेप यांच्या दि.०८/३/२०२१ व मा.सहाय्यक आयुक्त यांच्या दिनांक ०९/०३/२०२१ रोजीच्या सुचनेनुसार फेरसादर करण्यात येते की, स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांना देण्यात आलेले मनपाचे ६२ घंटागाडी वाहने व एक कॉम्पॅक्टर यांचे वाहन भाडे दर निश्चिती कामी कार्यवाही चालू आहे. सदरील कचरा संकलन व वाहतूक करणेकामी ई- निविदा क्र.२१२४ मध्ये पृष्ठ क्र.१७ मधील अट क्र.१८ मध्ये मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकारण, अहमदनगर यांच्या कडील प्रस्ताव क्र. ५/२०१९ मंजूर प्रस्तावानुसार खालील प्रमाणे वाहन भाडे दर नमुद करण्यात आलेले आहे.

| **वाहन प्रकार** | **मंजुर वाहन भाडे दर प्रती महा** |
|---|---|
| घंटागाडी | २४०००/- |
| ट्रॅक्टर | २८०००/- |
| कंटेनर प्लेसर | ३००००/- |
| कंटेनर | ५००/- |
| डंपर | ३००००/- |
| कॉम्पॅक्टर | ६००००/- |

वरील प्रमाणे ई-निविदा क्र.२१२४ मध्ये भाडे दर नमुद आहे. त्यामुळे नमुद  ई- निविदेतील वाहन भाडे हे प्रादेशिक परिवहन प्राधिकारण, अहमदनगर यांच्या कडील प्रस्ताव क्र. ५/२०१९ मंजुर प्रस्तावानुसार असल्याने घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र. ४८१ दिनांक ०९/०३/२०२१ अन्वये मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांना वाहन भाडे दराबाबत पत्र देण्यात येवुन मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांनी सोबत जोडलेल्या पत्रानुसार कळविले आहे की, मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, अहमदनगर यांचे कडून प्रस्ताव क्र.५/२०१९ मध्ये शासकीय कामकाज निवडणूक / आकस्मिक / नैसर्गिक आपत्ती यासाठी वापरण्यात येणा-या वाहनाचे भाडे दर हे चालकासह ठरविण्यात आलेले आहे असे पत्रात नमुद आहे.

त्यानुसार स्वयंभू ट्रान्सपोर्ट , पुणे यांना देण्यांत आलेले मनपाचे ६२ घंटागाडी वाहने व एक कॉम्पॅक्टर यांचे वाहन भाडे दर निश्चिती करणे आवश्यक आहे.

तथापी वरीलप्रमाणे परिस्थितीनुसार स्वयंभू ट्रान्सपोर्ट , पुणे यांना भाडेतत्वावर देण्यात आलेल्या मनपा वाहन भाडे दर निश्चिती बाबत उचित निर्णयस्तव सविनय सादर

येणेप्रमाणे प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल फेरसादर

यावर मा.घन कचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, चर्चा करा, चर्चा केली Calculation सह Put up करा.

०००

मा.फेरसादर,

उपरोक्त विषयानुसार मा.मुलेप यांच्या दि.०८/३/२०२१ व मा.सहाय्यक आयुक्त यांच्या दिनांक ०९/०३/२०२१ रोजीच्या सुचनेनुसार फेरसादर करण्यात येते की, स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांना देण्यात आलेले मनपाचे ६२ घंटागाडी वाहने व एक कॉम्पॅक्टर यांचे वाहन भाडे दर निश्चिती कामी कार्यवाही चालू आहे. सदरील कचरा संकलन व वाहतूक करणेकामी ई- निविदा क्र.२१२४ मध्ये पृष्ठ क्र.१७ मधील अट क्र.१८ मध्ये मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकारण, अहमदनगर यांच्या कडील प्रस्ताव क्र. ५/२०१९ मंजूर प्रस्तावानुसार खालील प्रमाणे वाहन भाडे दर नमुद करण्यात आलेले आहे.

| **वाहन प्रकार** | **मंजुर वाहन भाडे दर प्रती महा** |
|---|---|
| घंटागाडी | २४०००/- |
| ट्रॅक्टर | २८०००/- |
| कंटेनर प्लेसर | ३००००/- |
| कंटेनर | ५००/- |
| डंपर | ३००००/- |
| कॉम्पॅक्टर | ६००००/- |

वरील प्रमाणे ई-निविदा क्र.२१२४ मध्ये भाडे दर नमुद आहे. त्यामुळे नमुद ई- निविदेतील वाहन भाडे हे प्रादेशिक परिवहन प्राधिकारण, अहमदनगर यांच्या कडील प्रस्ताव क्र. ५/२०१९ मंजुर प्रस्तावानुसार असल्याने घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र. ४८१ दिनांक ०९/०३/२०२१ अन्वये मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांना वाहन भाडे दराबाबत पत्र देण्यात येवुन मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांनी सोबत जोडलेल्या पत्रानुसार कळविले आहे की, मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, अहमदनगर यांचे कडून प्रस्ताव क्र.५/२०१९ मध्ये शासकीय कामकाज निवडणूक / आकस्मिक / नैसर्गिक आपत्ती यासाठी वापरण्यात येणा-या वाहनाचे भाडे दर हे चालकासह ठरविण्यात आलेले आहे असे पत्रात नमुद आहे.

त्यानुसार स्वयंभू ट्रान्सपोर्ट , पुणे यांना वापण्यास देण्यात आलेले मनपाचे ६२ घंटागाडी वाहने व एक कॉम्पॅक्टर यांचे वाहन भाडे दर निश्चिती करणे आवश्यक आहे.

मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांच्या कडील पत्रानुसार विचार केले असता तक्ता खालील प्रमाणे होतो.

| अ.क्र. | वाहन प्रकार | ई-निविदेतील वाहन भाडे दर | किमान वेतन नुसार वाहन चालक पगार | वाहन चालक पगार वजा जाता रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | टाटा एस (घंटागाडी) | प्रति महा रक्कम रू. २४,०००/- | प्रति महा प्रति वाहन चालक पगार रक्कम रू.११,६३२/- | रक्कम रू.१२,३६८/- |
| २ | कॉम्पॅक्टर | ६००००/- | प्रति महा प्रति वाहन चालक पगार रक्कम रू.११,६३२/- | रक्कम रू. ४८,३६८/- |

वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे

**"अ"**

मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांच्या कडील पत्रानुसार विचार केले असत मनपा एकुण ६२ टाटा एस (घंटागाडी) वाहने दिनांक ०१/०९/२०२० पासून प्रति टाटा एस (घंटागाडय) प्रति महा रक्कम रूपये १२,३६८/- प्रमाणे माहे ३१/१०/२०२१ अखेर एकुण १४ महिन्याचे एकुण ६२ वाहनांचे भाडे रक्कम रूपये १,०७,३५,४२४/- होत आहे. त्याचप्रमाणे वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मनपा एकुण ०१ कॉम्पॅक्टर वाहने दिनांक ११/११/२०१९ पासून प्रति कॉम्पॅक्टर प्रति महा रक्कम रूपये ४८,३६८/-प्रमाणे माहे ३१/१०/२०२१ अखेर एकुण २३ महिने १९ दिवसाचे महिन्याचे एकुण ०१ कॉम्पॅक्टर वाहनांचे भाडे रक्कम रू.११,४३,०९७/- असे दोन्ही मिळून एकुण रक्कम रू.१,१८,७८,५२१/- एवढे भाडे वसुल करणे होत आहे. त्याचप्रमाणे अद्याप भाडे दर निश्चिती झालेली नसल्याने स्वयंभू ट्रान्सपोर्ट ,पुणे यांच्या देयकातून दिनांक ३१/०९/२०२१ अखेर पर्यत एकूण रक्कम रूपये ७१,५७,०००/-वसुल करण्यात आलेले आहे.

तसेच सदरील कचरा संकलन व वाहतुक करणेकामी ई-निविदा क्र.२१२४ मध्ये पृष्ठ क्र.१७ मधील अट क्र.१८ मध्ये नमुद दरानुसार खालील प्रमाणे भाडे आकारणी होते.

**"ब"**

ई-निविदा क्र.२१२४ मध्ये भाडे दर नमुद नुसार मनपा एकुण ६२ टाटा एस (घंटागाडय) वाहने दिनांक ०१/०९/२०२० पासून प्रति टाटा एस (घंटागाडया) प्रति महा रक्कम रू.२४,०००/- प्रमाणे माहे ३१/१०/२०२१ अखेर एकुण १४ महिन्याचे एकुण ६२ वाहनांचे भाडे रक्कम रू.२,०८,३२,०००/- होत आहे. त्याचप्रमाणे वरील तक्त्या नमुद केल्याप्रमाणे मनपा एकुण ०१ कॉम्पॅक्टर वाहने दिनांक ११/११/२०१९ पासून प्रति कॉम्पॅक्टर प्रति महा रक्कम रूपये ६०,०००/- प्रमाणे माहे ३१/१०/२०२१ अखेर एकुण २३ महिने १९ दिवसाचे महिन्याचे एकुण ०१ कॉम्पॅक्टर वाहनांचे भाडे रक्कम रू.१४,१८,०००/- असे दोन्ही मिळुन एकुण रक्कम रूपये २,२२,५०,०००/-
एवढे भाडे वसुल करणे होत आहे. त्याचप्रमाणे अद्याप भाडे दर निश्चिती झालेली नसल्याने स्वयंभू ट्रान्सपोर्ट , पुणे यांच्या देयकातुन दिनांक ३१/०९/२०२१ अखेर पर्यत एकुण रक्कम रूपये ७१,५७,०००/- वसुल करण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे परिस्थिती नुसार सदरील **"अ" व "ब"** भाडे दर निश्चिती बाब उचित निर्णय होणे व सदरील बाब आर्थिक असुन त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. त्याकरीता सक्षम प्राधिकार यांची मान्यता घेणे कामी पुढील आदेशार्थ मंजुरीस्तव सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल फेरसादर

यावर मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.मुख्य लेखाअधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर

यावर मा. अंतर्गत लेखापरिक्षक यांची अभिप्राय की, सदर बाब धोरणात्मक असल्याने मा.स्थायी समिती / मा. महासभेची मंजुरी घेवुन विभागाने कार्यवाही करणे उचित राहील.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे पृ.क्र.१७ अट क्र.१८ (ई-निविदा क्र.२१२४) मध्ये बदल करणेस मान्यतेसाठी सादर. मा.स्थायी समितीने यापुर्वी या निविदेस मंजुरी दिली होती. त्यात बदल करणेस मा.स्थायी समिती सक्षम आहे. आर.टी.ओ. अहमदनगर यांनी ही भाडयाबाबत दुजोरा दिला आहे. मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन चर्चा-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या ६२ घंटागाडया व एक कॅाम्पॅक्टर मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडे भाडे तत्वावर देण्यात आलेल्या मनपा वाहनांची दर निश्चिती बाबत मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती सांगा.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- महानगरपालिकेच्या ६२ घंटागाडया १ सप्टेंबर २०१९ पासुन व एक कॉम्पॅट्र स्वयंभु ट्रन्सपोर्ट यांना कचरा संकलन व वाहतुक करणे कामी दिलेल्या आहेत.ठेकदार संस्था रक्कम रूपये २४०००/- प्रमाणे भाडे देण्यास तयार नाहीत.त्यांचे म्हणणे आहे की,वाहन चालका करीता देण्यात येणारा पगार कमी करून भाडे निश्चीती करण्यात यावी.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मधील "अ" नुसार मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- आर.टी.ओ.कार्यालयाकडील मागविण्यात आलेल्या मार्गदर्शन पत्रा नुसार ऑफिस रिपोर्ट मधील ".अ" मान्य करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या ६२ घंटागाडया व एक कॅाम्पॅक्टर मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडे भाडे तत्वावर देण्यात आलेल्या मनपा वाहनांचे दर मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांच्या कडील पत्रानुसार विचार करता, मनपा एकुण ६२ टाटा एस (घंटागाडी) वाहने दिनांक ०१/०९/२०२० पासून प्रति टाटा एस (घंटागाडया) प्रति महा रक्कम रूपये १२,३६८/- प्रमाणे व प्रति कॉम्पॅक्टर प्रति महा रक्कम रूपये ४८,३६८/-प्रमाणे, ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद " अ " प्रमाणे भाडे निश्चिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या ६२ घंटागाडया व एक कॅाम्पॅक्टर मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडे भाडे तत्वावर देण्यात आलेल्या मनपा वाहनांचे दर मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांच्या कडील पत्रानुसार विचार करता, मनपा एकुण ६२ टाटा एस (घंटागाडी) वाहने दिनांक ०१/०९/२०२० पासून प्रति टाटा एस (घंटागाडया) प्रति महा रक्कम रूपये १२,३६८/- प्रमाणे व प्रति कॉम्पॅक्टर प्रति महा रक्कम रूपये ४८,३६८/-प्रमाणे ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद "अ " प्रमाणे भाडे निश्चिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १८३ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता सार्वजनिक बांधकाम व उदयान विभागासाठी आवश्यक असणा-या साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभे पुढे सादर करणेस मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

**संदर्भ :-** ई-निविदा क्र.2021_ANMC_706750_1

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,सन.२०२१-२०२२ या आर्थिक वर्षा करिता अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम व उद्यान विभागासाठी आवश्यक असणा-या साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरी करिता मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग-४मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय,मुंबई-४०००३२ दिनांक.१ डिसेंबर२०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन दै.पुण्यनगरी व दै.सार्वमत दि.२४/०७/२०२१चे वर्तमानपत्रात संक्षिप्त जाहिरात तसेच **http://maharashtra.gov.in**या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन ई-निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक
२)तृष्णा सेल्स् कॉर्पोरेशन,अहमदनगर
३)राजेंद्र लक्ष्मण लोणकर,अहमदनगर
४)अंबादास रामदास चौधरी,अहमदनगर
याप्रमाणे चार (४) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

प्राप्त चारही निविदा ग्राहय असल्याने सर्व निविदांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले असून ग्राहय निविदादरांचा तुलनात्मक तक्ता पाहता -
अ.क्र.१ ते १८,२० ते ३२ व ३४ व ३६ चे दर तृष्णा सेल्स् कॉर्पोरेशन,अहमदनगर यांचे
अ.क्र.१९ चा दर अंबादास रामदास चौधरी,अहमदनगर यांचा व
अ.क्र.३३ चा दर श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला आहे.

मा.शहर अभियंता यांचेकडून अ.नं.- १ ते ३६ चे साहित्याचे सन.२०२१-२०२२ करिताचे उपलब्ध PWD (बांधकाम) मंजूर DSR दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद करुन घेवून निविदेमध्ये प्राप्त स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दराची सन.२०२१-२०२२ चे मंजूर DSR दराशी तुलना करता व सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता -
अ.नं.१ ते १०,१२ ते १६ व १८ चे DSR दर उपलब्ध आहेत.
अ.क्र.- ११,१७ व १९ ते ३६ चे DSR दर उपलब्ध नाहीत

सार्व.बांधकाम विभागाने कॉलम क्र.५ मध्ये नमुद केलेले मंजुर DSR दर + आवश्यक ठिकाणी रॉयल्टी + १२% GST सह एकूण दर नमुद केलेले आहेत.परंतू पुरवठादार हे सदरचे साहित्य फक्त पूरवठा करणार असल्याने कॉलम क्र.११ मध्ये मंजूर DSR दर + आवश्यक ठिकाणी रॉयल्टी + प्रचलित शासकिय मंजूर GST दरासह एकूण दर नमुद केलेले असून उपलब्ध मंजूर DSR दराशी निविदेतील प्राप्त स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दराची तुलना करता -

अ.क्र.- १०,१४ चे निविदा दर DSR दरापेक्षा कमी आहेत.

अ.क्र.- १ ते ९,१२ ते १३,१५ ते १६ व १८ चे निविदा दर DSR दरापेक्षा जास्त आहेत.

प्राप्त निविदांपैकी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दर असणारे संबंधित निविदाकार यांना निविदा दर निगोसिएशन करिता मा.प्रशासकिय खरेदी समितीच्या बैठकीत बोलविण्यात आले असता सदर वेळी निविदाकार श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक हे काही अपरिहार्य कारणास्तव समक्ष उपस्थित राहु शकले नाहीत परंतू त्यांनी दर निगोसिएशनबाबत दि.०८/१०/२०२१ रोजी सादर केलेल्या पत्राबाबत बैठकीत सांगोपांग चर्चा होवून त्यांनी अ.क्र.३३ लोखंडी ट्री गार्डचा निविदेमध्ये दिलेलाच रक्कम रुपये.१,६४५=०० / प्रती १ नग याप्रमाणे दर मंजुर करणेबाबत तसेच निविदाकार तृष्णा सेल्स् कॉर्पोरेशन,अहमदनगर व अंबादास रामदास चौधरी हे दोन निविदाकार समक्ष उपस्थित होते त्यांचेशी दर निगोसिएशनबाबत बैठकीमध्ये चर्चा होवून पुरवठादार यांनी

**१)**जे दर DSR दरापेक्षा कमी आहेत त्या दरामध्ये आणखी दर कमी करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.

**२)**अ.क्र.९ - सिमेंट आय.एस.आय.मार्क ५३ ग्रेड व्यतिरिक्त ज्या साहित्याचे दर DSR पेक्षा जास्त आहेत ते दर DSR दराप्रमाणे कमी करुन देण्यास सहमती दर्शविलेली आहे.

**३)**अ.क्र.९ - सिमेंट आय.एस.आय.मार्क ५३ ग्रेड व ज्या साहित्याचे DSR दर मंजुर नाहीत अशा साहित्याच्या निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये ३% दर कमी करुन देणेस अ.क्र.२६ ते २९ चे सिमेंट मेनहोल कव्हर्स फ्रेमसह शाकुंतल इंडस्ट्रीज,MIDC,अहमदनगर या उत्पादक कंपनीचे पुरवठा करण्यास सहमती दर्शविलेली असून सदरचे दर मंजुर करणेबाबत विनंती केलेली आहे.निविदाकार यांनी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार दर कमी करण्याबाबत लेखी संमतीपत्रे दिलेली आहेत.

अ.क्र.११,१७ व १९ ते ३६ चे PWD (बांधकाम) मंजूर DSR दर उपलब्ध नसल्याने निविदाकार यांनी दर निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेल्या अंतिम दराची बाजारातील प्रचलित दराशी तुलना करता अ.नं.९,३० ते ३१ व ३४ ते ३६ चे दर अवाजवी वाटत आहेत.

अ.नं.१ ते ८,१० ते २९,३२ ते ३३ करिता खालील तक्त्यातील कॉलम क्र.४ मध्ये नमुद संबंधित निविदाकार यांचे दरास मंजुरी देणेबाबत तसेच अ.नं.९,३० ते ३१ व ३४ ते ३६ चे दराची बाजारातील प्रचलित दराशी तुलना करता प्राप्त निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दरात कमी करुन दिलेले दर अवाजवी वाटत असल्याने सदरचे दर नामंजूर करुन सदरच्या साहित्याची खरेदी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक : भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये सोबतच्या सुधारित नियमपुस्तिकेतील निर्देशानुसार करणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

मा.प्रशासकिय खरेदी समितीने मंजुरी करिता शिफारस केलेले दर (कॉलम क्र.४ मध्ये नमुद) सर्व करासह आवश्यक त्या ठिकाणी प्रचलित रॉयल्टी दरासह व साहित्य प्रत्यक्ष ठिकाणी पोहोच पूरवठा करणेसहचे आहेत.

**निविदाकार - तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर**

| निविदेतील अ.क्र. | साहित्याचा तपशिल | निविदेमध्ये दिलेले दर | मा.प्रशासकिय खरेदी समितीने मंजुरी करिता शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १) | हातफोड खडी - साईज - १ १/२" x २" | ३,९८०=०० / प्रती १ ब्रास | ३,६२६=०० / प्रती १ ब्रास |
| २) | मशिन फोड खडी - साईज - १.१/२" | ३,९८०=०० / प्रती १ ब्रास | ३,९६८=०० / प्रती १ ब्रास |
| ३) | मशिन फोड खडी - साईज - १" | ३,९८०=०० / प्रती १ ब्रास | ३,९८०=०० / प्रती १ ब्रास |
| ४) | मशिन फोड खडी - साईज - ३/४" | ३,७८०=०० / प्रती १ ब्रास | ३,७५८=०० / प्रती १ ब्रास |
| ५) | मशिन फोड खडी - साईज - १/२" | ३,८६०=०० / प्रती १ ब्रास | ३,७५८=०० / प्रती १ ब्रास |
| ६) | मशिन फोड खडी - साईज - १/४" | ३,८६०=०० / प्रती १ ब्रास | ३,७५८=०० / प्रती १ ब्रास |
| ७) | राळा १/४" | ३,८६०=०० / प्रती १ ब्रास | ३,७५८=०० / प्रती १ ब्रास |
| ८) | डांबर मिश्रीत हॉट-मिक्स माल पॅचिंगसाठी ५.५० % Bitumen,६० % १२ mm metal, ४० % ६ mm metal. | ८,८५०=०० / प्रती १ मे.टन | ४,१४७=०० / प्रती १ मे.टन |
| १०) | चाळलेली वाळू कोल्हार / पैठण | ६,८००=०० / प्रती १ ब्रास | ६,८००=०० / प्रती १ ब्रास |
| ११) | पोयटा माती | ३,१८०=०० / प्रती १ ब्रास | ३,०८४=०० / प्रती १ ब्रास |
| १२) | हार्ड मुरुम PWD स्पेसिफिकेशन प्रमाणे. | २,६८०=०० / प्रती १ ब्रास | २,६६३=०० / प्रती १ ब्रास |
| १३) | सॉफ्ट मुरुम PWD स्पेसिफिकेशन प्रमाणे | २,६८०=०० / प्रती १ ब्रास | २,६५४=०० / प्रती १ ब्रास |
| १४) | तांबड्या विटा - साईज - ९" x ४" x ३" | ७,८८०=०० / प्रती १००० नग | ७,८८०=०० / प्रती १००० नग |
| १५) | सिमेंट विटा ४" | १२=८० / प्रती १ नग | ७०००=०० / प्रती १००० नग |
| १६) | क्रश सँण्ड | ५,४८०=०० / प्रती १ ब्रास | ३,५५०=०० / प्रती १ ब्रास |
| १७) | कुंड्या मातीच्या १' व्यास x २' उंच | २१८=०० / प्रती १ नग | २११=०० / प्रती १ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| १८) | डबर | ३,४८०=०० / प्रती १ ब्रास | २,८४१=०० / प्रती १ ब्रास |
| २०) | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>साईज - २' लांब x १' रुंद x ४" जाडी<br>स्टील ३.०० कि.ग्रॅ. | ५८०=०० / प्रती १ नग | ५६२=०० / प्रती १ नग |
| २१) | प्रिकास्ट आर.सी. सी.स्लॅब<br>साईज - ३' लांब x १' रुंद x ४" जाडी<br>स्टील ४.५० कि.ग्रॅ. | ६८०=०० / प्रती १ नग | ६५९=०० / प्रती १ नग |
| २२) | प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब<br>साईज - ४' लांब x १' रुंद x ४" जाडी | ९८०=०० / प्रती १ नग | ९५०=०० / प्रती १ नग |
| २३) | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>साईज - ५' लांब x १' रुंद x ४" जाडी | १,१८०=०० / प्रती १ नग | १,१४४=०० / प्रती १ नग |
| २४) | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब हेवी क्लॉलिटी<br>२० टन क्षमता<br>साईज - ४' लाब x १' रुंद x ५" जाडी | १,३८०=०० / प्रती १ नग | १,३३८=०० / प्रती १ नग |
| २५) | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब हेवी क्लॉलिटी<br>२० टन क्षमता<br>साईज - ५' लाब x १' रुंद x ५" जाडी | २,२८०=०० / प्रती १ नग | २,२११=०० / प्रती १ नग |
| २६) | सिमेंट मेनहोल कव्हर्स हेवी डयुटी गोल साईज फ्रेमसह<br>कव्हर - ६३० mm व्यास गोल x १०० mm जाडी<br>फ्रेम - ८००mm x १५० mm जाडी x ५४०mm निव्वळ<br>कंपनी - शाकुंतल इंडस्ट्रीज | २,३८०=०० / प्रती १ नग | २,३०८=०० / प्रती १ नग |
| २७) | सिमेंट मेनहोल कव्हर्स मेडीयम डयुटी गोल साईज फ्रेमसह<br>कव्हर - ६४५ mm व्यास गोल x ८० mm जाडी<br>फ्रेम - ८४०mmx१३०mm जाडी x ५४० mm निव्वळ<br>कंपनी - शाकुंतल इंडस्ट्रीज | १,५८०=०० / प्रती १ नग | १,५३२=०० / प्रती १ नग |
| २८) | सिमेंट मेनहोल कव्हर्स चौकोनी साईज हेवी डयुटी फ्रेमसह<br>कव्हर - १०१५ mm x ५१७ mm x १०० mm उंची,<br>फ्रेम - ११८० mm x ७३० mm जाडी १५०mm,<br>९०० mm x ४५०mm निव्वळ<br>कंपनी - शाकुंतल इंडस्ट्रीज | ३,१८०=०० / प्रती १ नग | ३,०८४=०० / प्रती १ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| २९) | सिमेंट मेनहोल कव्हर्स चौकोनी साईज मिडीयम डयुटी फ्रेमसह<br>कव्हर - ७३० mmx७३० mm x ६० mm उंची,<br>फ्रेम - ८२० mm x८२० mm जाडी ११५ mm, ६०० mm x ६०० mm निव्वळ<br>कंपनी - शाकुंतल इंडस्ट्रीज | १,५८०=०० / प्रती १ नग | १,५३२=०० / प्रती १ नग |
| ३२) | सिमेंन्ट कॉंक्रीट पोल<br>साईज - ६" x ४" x ५' फुट | ४२८=०० / प्रती १ नग | ४१५=०० / प्रती १ नग |

**निविदाकार - अंबादास रामदास चौधरी,अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | लालमाती | ३,८८०=०० / प्रती १ ब्रास | ३,२०१=०० / प्रती १ ब्रास |

**निविदाकार - श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| ३३) | **M.S.Tree Guard – Specification**<br>Tree Guard Total Size - .0.45 mtr x 2.25 mtr.<br>Flat 20 x 3 x 4 Nos Verticle Flat 20 x 4 x 5 Nos Horizontal (Round) Angle 20 x 3 x 3 Nos Verticle Weld mesh 50 mm x 50 mm x 12 guage M.S.Flat cleats - 20 x 3 = 12 Nos of 1"Nut bolts - 6 mm x 20 mm long = 6 Nos. M.S.sheet 0.30 mtr x 0.15 mtr (12" x 6") (For name plate अहमदनगर महानगरपालिका) Oil Paint Yellow Colour Total Weight of Treeguard 14.5 kgs ± 500 gms approx Above ground level 1.8 mtr (6') below groud 0.45 mtr (1'.6") | १,६४५=०० / प्रती १ नग | १,६४५=०० / प्रती १ नग |

तरी मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे अ.नं.१ ते ८,१० ते २९,३२ ते ३३ करिता उपरोक्त तक्त्यातील कॉलम क्र.४ मध्ये नमुद संबंधित निविदाकार यांचे दरास मंजुरी मिळणेबाबत तसेच अ.नं.९,३० ते ३१ व ३४ ते ३६ चे दराची बाजारातील प्रचलित दराशी तुलना करता प्राप्त निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दरात कमी करुन दिलेले दर अवाजवी वाटत असल्याने सदरचे दर नामंजूर करुन सदरच्या साहित्याची खरेदी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक : भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये सोबतच्या सुधारित नियमपुस्तिकेतील निर्देशानुसार करणेबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करणेस मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा. शाखा अभियंता प्रभाग क्र. १ ते ८ यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.शाखा अभियंता प्रभाग क्रमांक ९ ते १७ यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.शहर अभियंता यांची अभिप्राय की, सादर, स्टोअर विभाग प्रमुख्य यांचे वरील अहवालानुसार प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस हरकत नाही आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखा अधिकारी यांची अभिप्राय की, मान्यतेस्तव

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांची अभिप्राय की, मा. शहर अभियंता यांच्या अभिप्रायानुसार व स्टोअर विभाग प्रमुख यांनी प्रस्तावीत केलेप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता सार्वजनिक बांधकाम व उदयान विभागासाठी आवश्यक असणा-या साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभे पुढे सादर करणेस मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. नगरसेवक महापौर शहर विकास निधी ,उपमहापौर शहर विकास निधी,सभापती स्थायी समिती शहर विकास निधी नगरसेवक स्वेच्छा निधी ,नगरसेवक शहर विकास निधी या निधी अंतर्गत जेष्ठ नागरीक,महिला यांना बसण्या करीता बेंच ची मागणी करीत असतात.सध्या प्रशासनाने सर्व निधी मधील बेंच बसविण्याचे प्रस्ताव स्थगीत ठेवले आहेत.त्यामुळे प्रभागातील नागरीकांची गैरसोय होत असल्याने सदरील प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री. सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.बाकडयांच्या प्रस्तावांना तात्काळ मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता सार्वजनिक बांधकाम व उदयान विभागासाठी आवश्यक असणा-या साहित्याचे वार्षिक निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे.सर्व पदाधिका-यांच्या निधी मधून व नगरसेवक स्वेच्छा निधी मधील प्रभागामध्ये बाकडे बसविण्याचे प्रस्ताव मंजूर करण्यात यावेत.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता सार्वजनिक बांधकाम व उदयान विभागासाठी आवश्यक असणा-या साहित्याचे वार्षिक निविदा दरास मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे अ.नं.१ ते ८,१० ते २९,३२ ते ३३ करिता उपरोक्त तक्त्यातील कॉलम क्र.४ मध्ये नमुद संबंधित निविदाकार यांचे दरास मान्यता देण्यात येत आहे.तसेच ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद अ.नं.९,३० ते ३१ व ३४ ते ३६ चे दराची बाजारातील प्रचलित दराशी तुलना करता प्राप्त निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दरात कमी करुन दिलेले दर अवाजवी वाटत असल्याने सदरचे दर नामंजूर करुन सदरच्या साहित्याची खरेदी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक :भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये सोबतच्या सुधारित नियमपुस्तिकेतील निर्देशानुसार खरेदी करणेस मान्यता देत आहे.सर्व पदाधिका-यांच्या निधी मधून व नगरसेवक स्वेच्छा निधी मधील प्रभागामध्ये बाकडे बसविण्याचे प्रस्ताव मंजूर करण्यात यावेत.

ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १८४ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका बुरूडगांव स.नं. ३४ या मनपा कचरा डेपो मधील Bio-Methanation Plant (१० TPD = ५ TPD X २ no) प्रकल्प देखभाल व दुरूस्ती कामी प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घन कचरा व्यवस्थापन विभाग

संदर्भ- मा. तांत्रिक छाननी समिती दि.१४/१२/२०१९ रोजीच्या वाटाघाटी शिफारशीनुसार

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या बुरूडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी ५TPD Veg व ५TPD Nonveg Solid Wast Processing BIOMETHNATION PLANT तीन वर्षाकरीता प्रकल्प देखभाल व दुरूस्तीसह चालविणेकामी प्रति महिना दर निश्चितीनुसार खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी देय दराची जाहिर ई-निविदा सुचना क्र.१० (T.IDT.ID२०२१_ANMC_७३०७७८_१) ऑनलाईन दि.२१/१०/२०२० रोजी ई- निविदा मागविण्यात आले होते. त्यानुसार आपली एकच निविदा प्राप्त झालेली आहे. प्राप्त निविदेतील तांत्रिक लिफाफा व आर्थिक दराचा लिफाफा उघडण्यात येवुन निविदाधारक मे. ओम साई कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांच्या सोबत दि.१४/१२/२०२१ रोजी मा. छाननी समिती समोर वाटाघाटी होवुन निविदाकार यांनी खालील प्रमाणे दरास मान्य करून तसे लेखी पत्र सादर केलेले आहे.

| अ.नं. | ई- निविदेत दाखल दर | वाटाघाटीत मान्य केलेले दर |
|---|---|---|
| १ | १] अहमदनगर महानगरपालिकेस Veg ५TPD क्षमतेचे BIO-METHNATION PLANT देखभाल व दुरूस्ती बाबत प्रति महिना दर रक्कम रू. १,४६,९००/- | वाढती महागाईचा विचार करता मागील वर्षीच्या दरामध्ये १०% वाढ देउन २,६०,०००/- + १०% (पर्यत) वाढ नुसार दोन्ही प्रकल्प मिळुन रक्कम रू. २,८६,०००/- |
| | २] Nonveg ५TPD क्षमतेचे BIOMETHNATION PLANT देखभाल व दुरूस्ती बाबत प्रति महिना दर रक्कम रू. २,५१,९००/- | |

वरीलप्रमाणे मा. तांत्रिक छाननी समितीने Bio-Methanation Plant (१० TPD = ५ TPD X २ no) प्रति महिना देखभाल व दुरूस्ती कामी रक्कम रू. २,८६,०००/- दरास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार निविदाकार मे. ओम साई कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांनी वाटाघाटीत ठरलेले दरानुसार लेखी पत्र देवुन मान्य केलेले आहे.

त्यानुसार सदरील ई-निविदा अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या बुरूडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी ५TPD Veg व ५TPD Nonveg Solid Wast Processing BIOMETHNATION PLANT तीन वर्षाकरिता प्रकल्प देखभाल व दुरूस्तीसह चालविणेकामी प्रति महिना दर निश्चितीनुसार निविदाकार मे. ओम साई कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर या निविदाकार यांच्या सोबत मा. छाननी समितीने वाटाघाटी करून सदरील दरा शिफारस केलेली आहे. राबविणेकामी प्राप्त निविदतील वाटाघाटी प्रति महिना रक्कम रू.२,८६,०००/- प्रमाणे एकुण ३६ महिन्याकरीता अंदाजे रक्कम रू.१,०२,९६,०००/- खर्च अपेक्षित आहे. तसेच विभागाकडील प्रस्तावीत दिनांक ०३/१२/२०२१ रोजीच्या दर पत्रक उघडणेकामी प्रस्तावावर मा.उपायुक्त (कर) यांनी दिनांक ०६/१२/२०२१ रोजी अभिप्राय नोंदविले की, प्रथम ०६ महिने मुदत करीता व सदरील ठेकेदार यांचे काम पाहाता पुढील २ वर्ष ६ महिने यासाठी काम देण्यात यावे असे उल्लेख आहे. त्यानुसार सदरील अभिप्राय व प्रति महिना रक्कम रू.२,८६,०००/- दराबाबत मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब वरील प्रमाणे प्रस्तावीतनुसार मंजुरीस्तव व मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी सादर करणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक तथा डेपो ईन्चार्ज यांचा अहवाल असे

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांची अभिप्राय की, मा. तांत्रिक छाननी समितीच्या शिफारशीनुसार प्रस्तावीत "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीच्या मान्यता घेणे करिता कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, मा.स्थायी समिती कडे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका बुरूडगांव स.नं. ३४ या मनपा कचरा डेपो मधील Bio-Methanation Plant (10 TPD = 5 TPD X 2 no) प्रकल्प देखभाल व दुरूस्ती कामी प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या बुरूडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी ५TPD Veg व ५TPD Nonveg Solid Wast Processing BIOMETHNATION PLANT तीन वर्षाकरीता प्रकल्प देखभाल व दुरूस्तीसह चालविणेकामी प्रति महिना दर ई-निविदा सुचना क्र.१० (T.IDT.ID२०२१_ANMC_७३०७७८_१) ऑनलाईन दि.२१/१०/२०२० नुसार प्रकल्प देखभाल व दुरूस्ती कामी प्रति महिना दर निश्चितीनुसार निविदाकार मे. ओम साई कंन्स्ट्रक्शन, यांच्या दराबाबत मा. छाननी समितीने वाटाघाटी अंती वाढती महागाईचा विचार करता मागील वर्षीच्या दरामध्ये १०% वाढ करून केलेल्या शिफारसी प्रमाणे मंजुर दरास व येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

<u>**ठराव :-**</u> ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या बुरूडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी ५TPD Veg व ५TPD Nonveg Solid Wast Processing BIOMETHNATION PLANT तीन वर्षाकरीता प्रकल्प देखभाल व दुरूस्तीसह चालविणेकामी प्रति महिना दर ई-निविदा सुचना क्र.१० (T.IDT.ID२०२१_ANMC_७३०७७८_१) ऑनलाईन दि.२१/१०/२०२० नुसार प्रकल्प देखभाल व दुरूस्ती कामी प्रति महिना दर निश्चितीनुसार निविदाकार मे. ओम साई कंन्स्ट्रक्शन, यांच्या दराबाबत मा. छाननी समितीने वाटाघाटी अंती वाढती महागाईचा विचार करता मागील वर्षीच्या दरामध्ये १०% वाढ करून केलेल्या शिफारसी प्रमाणे मंजुर दरास व येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- १०**

विषय क्रमांक- १८५ मंगळवार दि.११/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्यावरील हॉल क्र.२ निविदा धारक श्री. विठ्ठल सुर्यभान लांडगे यांना भाडेतत्वार देणे बाबतच्या निविदे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.२ ची निविदा दैनिक सार्वमत या वर्तमान पत्रात प्रसिध्द केली होती सदर निविदा अर्जाची विक्री दि.८/१२/२०२१ ते १६/१२/२०२१ पर्यत होती तसेच सदर निविदा बयाना रक्कम भरून घेउन दि.१७/१२/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत निविदा अर्ज स्विकारण्याची मुदत होती सदर मुदतीमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ क्र | निविदाधारकांचे नाव | मा.सहा.संचालक नगररचना यांनी प्रमाणित केलेले दरमहा भाडे | निविदाधारकाने निविदेत नमुद केलेले दरमहा भाडे | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री गणेश बाळासाहेब परभाने | ११०००/- (कराविरहित) | ११०००/- | ६६०००/- |
| २ | श्री विठठल सुर्यभान लांडगे | ११०००/- (कराविरहित) | १११०१/- | ६६०००/- |

वरील विषयांकित व्यापारी संकुलातील हॉल क्र.२ करिता मुदतीत दोन निविदा अर्ज प्राप्त झाले आहेत त्यापैकी श्री. विठठल सुर्यभान लांडगे, अहमदनगर या निविदाधारकांनी मा.सहाय्यक संचालक नगररचना मनपा यांनी प्रमाणित केलेल्या दरमहा भाडे रू. ११०००/- पेक्षा जास्त दरमहा भाडे रू.१११०१/- देण्याचे निविदा अर्जात नमुद केले आहे.

तरी श्री. विठठल सुर्यभान लांडगे, अहमदनगर यांनी निविदा स्पर्धेत जास्तीत जास्त दरमहाभाडे रू.१११०१/- व अनामत रक्कम रू.६६०००/- देण्याचे नमुद केले आहे. त्यामुळे त्यांची निविदा मंजुर करणेस शिफारस आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.२ चे क्षेत्र ७७.७६ चौ.मी. इतके असुन त्याचे दरमहा भाडे रू.१११०१/- (कराविरहित) व अनामत रक्कम रू.६६०००/- घेउन ११ वर्षे कराराने भाडयाने देणेकामी मा.दुय्यम निबंधक, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडेस निविदेच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार १५ दिवसाच्या आत अनामत रक्कम रू.६६०००/- मार्केट विभागात रोखीने भरणा करून स्वखर्चाने करारनामा नोंदणीकृत करून इकडेस सादर करावा असे श्री. विठठल सुर्यभान लांडगे, अहमदनगर यांस कळविणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र. मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी सादर

यावर मा. आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, रू. ५०००/- पेक्षा दरमहा भाडे जास्त असल्याने मा.स्थायी समितीकडे पाठविणेसाठी मान्यतेस सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्यावरील हॉल क्र.२ निविदा धारक श्री. विठ्ठल सुर्यभान लांडगे यांना भाडेतत्वार देणे बाबतच्या निविदे बाबतचा प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री. श्याम नळकांडे :- मार्केट विभाग प्रमुख माहिती सांगा.

मार्केट विभाग प्रमुख श्री. सोनवणे :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.२ ची निविदा प्रसिध्द करण्यात आली करिता मुदतीत दोन निविदा अर्ज प्राप्त झाले आहेत त्यापैकी श्री. विठठल सुर्यभान लांडगे, अहमदनगर यांनी निविदा स्पर्धेत जास्तीत जास्त दरमहाभाडे रू.१११०१/- व अनामत रक्कम रू.६६०००/- देण्याचे नमुद केले आहे. त्यामुळे त्यांची निविदा मंजुर करणेस शिफारस आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.२ निविदा धारक श्री. विठ्ठल सुर्यभान लांडगे यांना ११ वर्षा करीता अटी व शर्तीनुसार भाडेतत्वार देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुस-या मजल्या वरील हॉल क्र.२ निविदा धारक श्री. विठ्ठल सुर्यभान लांडगे यांना ११ वर्षा करीता अटी व शर्तीनुसार भाडेतत्वार देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १८६ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- जुन्या मालमत्ता (०१/०४/२००५ पुर्वीच्या) खरेदी - विक्री मधील नांव नोंदणी फी करीता चालु वर्षाचे रेडीरेटनर दरा नुसार १% आकारणी करणे व विलंब शुल्क रक्कम खरेदी दस्तऐवजाच्या तीन महिन्यानंतर रू.५० ऐवजी रू. १००/- दंडामध्ये वाढ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मालमत्ता हस्तांतरण विभाग

अहमदनगर महापालिका क्षेत्रात इमारत व जमीनीची खरेदी विक्री व्यवहार सतत होत असतात. इमारती व जमीनीचे खरेदी व विक्री झाल्यानुसार महानगरपालिका अभिलेख्यांमध्ये मिळकत धारकांचे नावाची नोंद होणे आवश्यक असते. त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ८ कराधान नियम २(३) नुसार मा.स्थायी समिती ठरविल अशा विहीत केलेली फी भरणे आवश्यक आहे त्यानुसार सन २०१३-१४ या अंदाजपत्रकीय महासभे्त खरेदी खतातील किंमत भाव किंवा बाजार भाव मुल्य यापैकी जे जास्त असेल त्या किंमतीवर १ टक्का या दराप्रमाणे किंमतीवर नाव नोंदणी शुल्काची आकारणी सुरू केली आहे. तसेच वारसपत्र, बक्षीसपत्र, हिबानामा, हक्क सोडपत्र राजापत्र, नोंदप्रमाणे हडकोचे घरांचे वाटपपत्र, मुत्युपत्र, वाटणीपत्र, इ. प्रकरणामधील नावाची नोंद करताना एक ठराविक रक्कम रू.३०००/- प्रत्येकी प्रकरणाकरिता मालमत्ता हस्तांतरण फी ची आकारणी करून नावाची नोंद घेण्यात येते व विलंब शुल्क रक्कम रूपये ५०/- त्यानुसार ३१मार्च २०२१अखेर ३.५३ कोटी इतकी नाव नोंदणी फी वसुल झालेली आहे.

तसेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिका उत्पन्न स्त्रोत वाढ होण्याच्या दृष्टीने जुनी खरेदी- विक्री झालेल्या प्रकरणांमध्ये जुन्या खरेदी खतात खरेदीची किंमत कमी दर्शविलेली असते. सन २०२१-२२ मध्ये नाव नोंदणीसाठी सदर प्रकरणामध्ये त्या खरेदी किंमती फार कमी असल्याने ती किंमत फी आकारणीसाठी न धरता ती चालु वर्षाचे रेडीरेटनर मधील जमिनी किंवा इमारतीचा प्रती चौ.मी. चा दर लावुन त्या किंमतीवर १ टक्का चालु वर्षाचा रेडीरेकनर दर आकारावा व विलंब शुल्क रक्कम खरेदी दस्तऐवजाच्या तीन महिन्यानंतर रूपये १००/- केल्यास उत्पन्नात जास्त वाढ होईल. असा फि वाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ नुसार मा.स्थायी समितीपुढे सादर करणे आवश्यक आहे./अ

येणेप्रमाणे सहा. कर निर्धारक व संग्राहक यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, १ एप्रिल २००५ पुर्वी पासून 'अ' प्रमाणे मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- जुन्या मालमत्ता (०१/०४/२००५ पुर्वीच्या) खरेदी - विक्री मधील नांव नोंदणी फी करीता चालु वर्षाचे रेडीरेटनर दरा नुसार १% आकारणी करणे व विलंब शुल्क रक्कम खरेदी दस्तऐवजाच्या तीन महिन्यानंतर रू.५० ऐवजी रू. १००/- दंडामध्ये वाढ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- विषयाची सविस्तर माहिती सांगा.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिका उत्पन्न स्त्रोत वाढ होण्याच्या दृष्टीने जुनी खरेदी- विक्री झालेल्या प्रकरणांमध्ये जुन्या खरेदी खतात खरेदीची किंमत कमी दर्शविलेली

असते. सन २०२१-२२ मध्ये नाव नोंदणीसाठी सदर प्रकरणामध्ये त्या खरेदी किंमती फार कमी असल्याने ती किंमत फी आकारणीसाठी न धरता ती चालु वर्षाचे रेडीरेटनर मधील जमिनी किंवा इमारतीचा प्रती चौ.मी. चा दर लावुन त्या किंमतीवर १ टक्का चालु वर्षाचा रेडीरेकनर दर आकारावा व विलंब शुल्क रक्कम खरेदी दस्तऐवजाच्या तीन महिन्यानंतर रूपये १००/- केल्यास उत्पन्नात जास्त वाढ होईल.माझ्या कडे महानगरपालिकेमध्ये मालमत्ता हस्तांतरण करण्याकरीता सन १९८८ मधील प्रस्ताव आला होता.सदर प्रस्तावामध्ये सन १९८८ मधील मालमत्तेची किंमत रक्कम रूपये १०,०००/- होती.सध्या या मालमत्तेची चालू रेडीरेकनर नुसार किंमत ७लाख रूपये आहे.जर रक्कम रूपये १० हजारावर १ टक्का हस्तांतरण फि घेतल्यास रू.१००/- होते. परंतु ७ लाखावर १ टक्का हस्तांतरण फि आकारणी केल्यास रू. ७०००/- होते.महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत असल्याने चालू रेडीरेकनर नुसार दर आकारणी करणे आवश्यक आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशी नुसार अखेर मंजूरीस्तव मा.महासभे समोर सादर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मालमत्ता हस्तांतरण आकारणी करीता सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिका उत्पन्न स्त्रोत वाढ होण्याच्या दृष्टीने जुनी खरेदी- विक्री झालेल्या प्रकरणांमध्ये जुन्या खरेदी खतात खरेदीची किंमत कमी दर्शविलेली असते. जुन्या मालमत्तेच्या सन २००५ पुर्वीच्या खरेदी किंमती फार कमी असल्याने ती किंमत फी आकारणीसाठी न धरता ती चालु वर्षाचे रेडीरेटनर मधील जमिनी किंवा इमारतीचा प्रती चौ.मी. चा दर लावुन त्या किंमतीवर १ टक्का चालु वर्षाचा रेडीरेकनर दर आकारावा व विलंब शुल्क रक्कम खरेदी दस्तऐवजाच्या तीन महिन्यानंतर रूपये १००/- वाढ करण्याचा असल्याने सदर फि वाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ नुसार अखेर मंजूरीस्तव मा.महासभे समोर सादर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार मालमत्ता हस्तांतरण आकारणी करीता खरेदी- विक्री झालेल्या प्रकरणांमध्ये मालमत्तेच्या ०१/०४/२००५ पुर्वीच्या खरेदी किंमती फार कमी होत्या. या किंमत फी आकारणीसाठी न धरता ती चालु वर्षाचे रेडीरेटनर मधील जमिनी किंवा इमारतीचा प्रती चौ.मी. चा दर लावुन त्या किंमतीवर १ टक्का चालु वर्षाचा रेडीरेकनर दर आकारणी करण्यास व विलंब शुल्क रक्कम खरेदी दस्तऐवजाच्या तीन महिन्यानंतर रूपये १००/- वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर फि वाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ नुसार अखेर मंजूरीस्तव मा.महासभे समोर सादर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १८७ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता करामध्ये शास्ती माफीच्या घेतलेल्या निर्णयाची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(ड) नुसार सादर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मालमत्ता कर आकारणी विभाग

विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण- ८ नियम ५१ नुसार अंशतः किंवा पुर्णतः २% शास्तीमध्ये सुट देण्याचे स्वेच्छा अधिकार मा.आयुक्त साहेब यांना आहेत त्यानुसार मा.आयुक्त साहेब यांनी खालील निर्देशित केलेल्या मंजुरी अन्वये २% शास्तीमध्ये ७५% शास्तीची सुट दिलेली आहे.

१] मा.आयुक्त साहेब यांचे दि.१९/७/२०२१ च्या मान्यतेने मा. न्यायालयात दि.०१/०८/२०२१ रोजी लोकअदालतचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एकुण रूपये ७०,३३,५१४/- (सत्तर लाख तेहतीस हजार पाचशे चौदा) इतक्या मालमत्ता कराची वसुली करण्यात आलेली आहे.

२] मा.आयुक्त साहेब यांचे दि.०३/०९/२०२१ च्या मान्यतेने महालोक अदालत मा. न्यायालयात दि.२५/०९/२०२१ रोजी आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये २% शास्तीमध्ये ७५% सुट देण्यांत आलेली होती त्यामध्ये रूपये ३,८४,३५,९२४/- (तीन कोटी चौ-यांशी लाख पस्तीस हजार नउशे चोवीस) इतक्या मालमत्ता कराची वसुली करण्यात आलेली आहे व त्यावर रू. १,९६,९१,४७५/- इतकी २% शास्तीमध्ये ७५% सुट देण्यात आलेली आहे. तसेच मा.आयुक्त साहेब यांचे दि.२८/०९/२०२१ च्या मान्यतेने दि.२८/०९/२०२१ ते ३०/०९/२०२१ पर्यत शास्तीमध्ये वाढीवमुदत दिलेली होते त्यानुसार रू.९१,०५,९६५/- इतक्या मालमत्ता कराची वसुली करण्यात आलेली आहे.

३] मा.आमदार श्री. संग्रामभैय्या जगताप साहेब यांचे दि.१२/१०/२०२१ च्या २% शास्तीमध्ये ७५% सुट देण्याबाबतच्या पत्रानुसार मा.आयुक्त साहेब यांचे दि.१२/१०/२०२१ च्या मान्यतेने दि.१३/१०/२०२१ ते ३१/१०/२०२१ पर्यत २% शास्तीमध्ये ७५% सुट देण्यात आलेली होती त्यामध्ये रूपये १,६७,२३,६३३/-(एक कोटी सदुसष्ट लाख तेवीस हजार सहाशे तेहतीस ) इतक्या मालमत्ता कराची वसुली करण्यात आलेली आहे व त्यावर रू. ४२,०१,५०१/- इतकी २% शास्तीमध्ये ७५% सुट देण्यात आलेली आहे.

४] मा.आमदार श्री. संग्रामभैय्या जगताप साहेब यांचे दि.१६/११/२०२१ च्या २% शास्तीमध्ये ७५% सुट देण्याबाबतच्या पत्रानुसार मा.आयुक्त साहेब यांचे दि.१७/११/२०२१ च्या मान्यतेने दि.१६/११/२०२१ ते ३०/११/२०२१ पर्यत २% शास्तीमध्ये ७५% सुट देण्यात आलेली होती त्यामध्ये रूपये १,५१,२३,०८०/- (एक कोटी एकावन्न लाख तेवीस हजार ऐंशी ) इतक्या मालमत्ता कराची वसुली करण्यात आलेली आहे व त्यावर रू. २९,४२,५९९/- इतकी २/- शास्तीमध्ये ७५% सुट देण्यात आलेली आहे.

५] मा.आयुक्त साहेब यांचे दि.२५/११/२०२१ च्या मान्यतेने मा.न्यायालयात लोकअदालत दि.११/१२/२०२१ रोजी आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये २% शास्ती ७५% सुट देण्यात आलेली होती त्यामध्ये रूपये ७३,२१,२४७/- (पंच्याहत्तर लाख सत्तेचाळीस हजार दोनशे सत्तेचाळीस) इतक्या मालमत्ता कराची वसुली करण्यात आलेली आहे व त्यावर रू.४५,५८,८१९/- इतकी २% शास्ती ७५% सुट देण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे झालेल्या निर्णयाची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) नुसार मा.स्थायी समितीकडे मान्यतेसाठी पाठविणे बाबत आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे सहा. मुल्य निर्धारक व संग्राहक यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्येसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मुलेप / मुलेअ

यावर मुख्य लेखाधिकारी यांची अभिप्राय की, "अ" मान्येस्तव

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांची अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची ड प्रकरण-८ कराधान नियम ५१ मध्ये आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ खाली शास्ती किंवा नियम ५० खालील की किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अशंतः माफ करता येईल अशी तरतुद आहे. तथापी विभागाने प्रस्तावीत केलेनुसार तसेच मुख्यलेखाअधिकारी यांचे अभिप्रायानुसार उचित कार्यवाहीस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता करामध्ये शास्ती माफीच्या घेतलेल्या निर्णयाची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(ड) नुसार सादर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता करामध्ये शास्ती माफीच्या घेतलेल्या निर्णयाची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(ड) नुसार मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता करामध्ये शास्ती माफीच्या घेतलेल्या निर्णयाची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(ड) नुसार अवलोकन झाले आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- १०

विषय क्रमांक- १८८ मंगळवार दि.११/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग आत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्यास्वरूपात श्री.रमेश साहेबराव चौधरी,सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक यांची मानधनावर नियुक्ती करण्यास कार्यौत्तर मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग

**संदर्भ-** श्री. रमेश साहेबराव चौधरी, सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक यांचा दि.२३/१२/२०२१ रोजीचा अर्ज

विनंती रिपोर्ट सादर की, शहर पाणी पुरवठा मुख्यालयाकडील श्री. रमेश साहेबराव चौधरी, वरिष्ठ लिपिक हे दि.३०/११/२०२१ रोजी म.न.पा.सेवेतून निवृत्त झालेले आहेत या निवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे संदर्भिय अर्ज इकडेस प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी मानधनावर काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, शहर पाणी पुरवठा विभाग (मुख्यालय) कडील सर्व कामासाठी सद्यस्थितीत ०१ वरिष्ठ लिपिक , ०२ लिपिक टंकलेख व ०२ मदतनीस कार्यरत होते. परंतु दि.३०/११/२०२१ रोजी या विभागाकडील वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असलेले श्री. रमेश चौधरी हे सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत या विभागाकडे फक्त ०२ लिपिक टंकलेखक व ०२ मदतनीस कार्यरत आहेत.

त्यासाठी एक मुख्य लिपिक / हेडक्लार्क व किमान तीन लिपिक टंकलेखक संवर्गातील कर्मचारी लवकरात उपलब्ध करून देणे बाबत मंजुर प्रस्तावाअन्वये आस्थापना विभागाकडे मागणी करण्यात आलेली आहे. परंतु अद्याप आस्थापना विभागाकडून वरील मागणी प्रमाणे कर्मचारी उपलब्ध करून दिलेले नाहीत.पर्यायाने कर्मचा-या अभावी आज मितीस विभागाकडील दैंनदिन कामा व्यतिरिक्त बारनिशी आवक / जावक, माहितीचा अधिकार, शहर पाणी योजनेवरील वीज वितरण कंपनीचे दरमहाचे उच्चदाबाचे वीजबील अदा करणे, मानधनावरील कर्मचारी यांचे प्रस्तावाबाबत कार्यवाही करणे, वार्षिक अर्थसंकल बाबत कार्यवाही करणे, शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरिता तांत्रिक / अतांत्रिक कर्मचा-यासह अभियंते उपलब्ध करणे कामी नेमणूक केलेल्या ठेकेदाराचे देयक अदा करणे इत्यादी कार्यालयीन कामे कर्मचा-या अभावी पुर्णतः थांबलेली आहेत.व या बाबी कडे वेळीच लक्ष न दिल्यास (कर्मचा-यांच्या नेमणूका न झाल्यास) गंभीर परिस्थिती निर्माण होवून म.न.पा. प्रशासनास त्यास सामोरे जावे लागणार आहे. असे वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.

त्यासाठी महानगरपालिकेडून शहर पाणी पुरवठा विभाग (मुख्यालय) करीता आस्थापना विभागाकडून कायम स्वरूपी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होईपर्यत पाणीपुरवठा विभागाकडील हेडक्लार्क पदाचा कामाचा
अनुभव असलेले व महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले श्री. रमेश साहेबराव चौधरी , सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक कामाचा उत्तम अनुभव आहे.श्री. रमेश साहेबराव चौधरी यांनी रक्कम रू.२५,०००/- इतकी मानधन मिळणेबाबत संदर्भिय पत्रामध्ये अपेक्षा केलेली आहे.

यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार शहर पाणीपुरवठा विभाग (मुख्यालय) करीता हेडक्लार्कची आवश्यकता व निकड लक्षात घेता या विभागाकडील सेवानिवृत्त झालेले श्री. रमेश साहेबराव चौधरी, सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक यांची पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेणे संयुक्तीक राहील. तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग आत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्यास्वरूपात श्री.रमेश साहेबराव चौधरी,सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक यांची मानधनावर नियुक्ती करण्यास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.मनोज कोतकर :- केडगांव येथील व्यवसायीक अवधून सिलेक्शन यांनी मला समक्ष पत्र देवून कळविले आहे की,मी गेल्या वीस वर्षापासून येथे माझे मोबाईल व होम ॲप्लायन्सचा व्यवसाय करीत आहे.माझ्या दुकाना समोर मा.यशवंत चव्हाण व मा.महात्मा ज्योतीबा फुले या थोर व्यक्तींचे पुतळे आहेत.सदर पुतळयासमोरील व आजूबाजूचा परिसर सुशोभित करण्यातस मला परवानगी देण्यात यावी.जेणे करून हा सर्व परिसर सुंदर व स्वच्छ होईल.तरी अवधूत सिलेक्शन यांना याच सभेमध्ये परवानगी मिळणे बाबतचा ठराव करावा.या करीता महानगरपालिकेला कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार नाही.व महापुरूषांच्या पुतळया सभोवताली सुशोभिकरण झाल्याने परिसर स्वच्छ होणार आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- या बाबत परिसरातील नागरीकांच्या तक्रारी येणार नाही याची दक्षता अवधून सिलेक्शन यांना घ्यावी लागेल.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच केडगांव येथील मा.यशवंत चव्हाण व मा.महात्मा ज्योतीबा फुले या थोर व्यक्तींच्या पुतळयांभोवतालच्या परिसरामध्ये सुशोभिकरण करण्यास सदर फर्म यांना मान्यात देण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.अवधूत सिलेक्शन यांना पुतळा सभोवताली सुशोभिकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग आत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार श्री.रमेश साहेबराव चौधरी,सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक यांची तात्पुरत्यास्वरूपात सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्तीस कायोत्तार री देण्यात येत आहे. केडगांव येथील व्यवसायीक मे.अवधूत सिलेक्शन यांच्या अर्जानुसार त्यांनी मागणी केल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील केडगांव येथील महात्मा ज्यातीबा फुले व मा.यशवंतराव चव्हाण या महापुरूषांच्या पुतळयासभोवतालच्या परिसरामध्ये सुशोभिकरणास व महापुरूषांच्या पुतळयांना बाधा न होता या अटीवर फर्म ची जाहिरात करण्यातस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग आत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार श्री.रमेश साहेबराव चौधरी,सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक यांची तात्पुरत्यास्वरूपात सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्तीस कार्योत्तम मंजूरी मिळणे बाबतच्या ऑफिस रिपार्टास मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर. सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार केडगांव येथील व्यवसायीक मे.अवधूत सिलेक्शन यांच्या अर्जानुसार त्यांनी मागणी केल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील केडगांव येथील महात्मा ज्योतीबा फुले व मा.यशवंतराव चव्हाण या महापुरूषांच्या पुतळयासभोवतालच्या परिसरामध्ये सुशोभिकरणास व महापुरूषांच्या पुतळयांना बाधा न होता या अटीवर फर्म ची जाहिरात करण्यातस मान्यता देण्यात येत आहे.पुतळा परीसर सुशोभीकरणाचे काम, त्याची देखभाल दुरूस्ती मे.अवधूत सिलेक्शन यांनी स्वखर्चाने करावी. या ठरावाची कार्यवाही करणे कामी संबंधीत विभागांनी आवश्यक ते कार्यालयीन सोपस्कार पार पाडावेत.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका